# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ / अग्रहायण ९, १९४० (शके)**

| | |
|---|---|
| (१) वित्त व नियोजन, वने मंत्री<br>(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री<br>(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री<br>(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १३२**

---

### शासकीय सेवेत माहे नोव्हेंबर, २००५ नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(१) * ४५२१८ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विक्रम काळे, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय सेवेत माहे नोव्हेंबर, २००५ नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी यासाठी राज्यातील शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांनी आंदोलने केली असून दि महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेच्यावतीने मागणीही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने लागू केलेल्या नवीन पेन्शन योजनेत कर्मचाऱ्यांच्या वेतनातून १० टक्के स्वत:ची व शासनाची रक्कम जमा केली जात असून या रकमेचा कुठलाही हिशेब शासनाकडे नसल्याची बाब समोर येऊन या रक्कमेत कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भविष्य निर्वाह निधीमध्ये ज्याप्रमाणे आवश्यकता असल्यास परतावा किंवा ना-परतावा रक्कम काढता येते, त्याचप्रमाणे परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजनेमधूनही अशाप्रकारे रक्कम काढण्यासाठी शासनाची भूमिका काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर पेन्शन योजनेमध्ये झालेला कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन राज्यातील कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी, संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे ही बाब खरी आहे.
(२) हे खरे नाही.
(३) परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना ही दिनांक २७/०८/२०१४ पासून राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत समाविष्ट करण्यात आली आहे. निवृत्तीवेतन निधी विनियामक आणि विकास प्राधिकरण यांच्या दिनांक १०/०१/२०१८ च्या परिपत्रकान्वये राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतून Partial withdrawal ची सुविधा उपलब्ध असून सभासदाच्या संपूर्ण सेवा कालावधीत तीन वेळा जमा रकमेच्या २५ टक्केच्या मर्यादेत (कर्मचाऱ्यांचे जमा अंशदान लाभासह) रक्कम काढण्याची तरतूद आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय, निमशासकीय कर्मचारी तसेच शिक्षक यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(२) * ४४४०१ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ४१२७४ ला दिनांक ५ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय, निमशासकीय कर्मचारी तसेच प्राथमिक, माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक यांना गणपतीनंतर आणि दिवाळीपूर्वी सातवा वेतन आयोग लागू करावा यासह अन्य महत्वाच्या मागण्यांसाठी शासकीय कर्मचारी संघटनेने तीन दिवस संप केल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शासनाच्या विविध विभागातील कंत्राटी कर्मचारी आणि अनुदानित शाळांमधील कंत्राटी शिक्षक यांनाही सातवा वेतन आयोग लागू करुन अशा कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे किमान वेतन रुपये २१०००/- लागू करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांनी संप केल्याने राज्यातील शासकीय कामांवर मोठा परिणाम होऊन शासकीय रुग्णालयांतील रुग्णांची मोठी गैरसोय झाली, तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनांच्या मागण्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० व पाच दिवसांचा आठवडा करण्याबाबत तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाची अंमलबजावणी लागू करण्याबाबत व अन्य मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनाच्या विविध विभागातील कंत्राटी कर्मचारी आणि अनुदानित शाळांमधील कंत्राटी शिक्षक यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबतचा व केंद्राप्रमाणे किमान वेतन रुपये २१,०००/- लागू करण्याचा कोणताही निर्णय शासनाने घेतलेला नाही.

(३) हे खरे नाही.

दिनांक ७ ते ९ ऑगस्ट, २०१८ रोजी शासकीय कर्मचारी संघटनेने सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी लागू करण्याबाबत व अन्य मागण्यांसाठी तीन दिवस केलेल्या संपामध्ये केवळ २० टक्के कर्मचाऱ्यांनीच सहभाग घेतला होता. त्यामुळे शासकीय रूग्णालयीन कामांवर त्याचा विपरीत परिणाम झालेला नाही व शासकीय रूग्णालयात रूग्णांची गैरसोय झाली नाही. सर्व रूग्णालयीन यंत्रणा सुरळीत सुरू होती.

सदर संपात केंद्र शासनाप्रमाणे सातवा वेतन आयोग लागू करणे, जानेवारी, २०१८ पासूनचा महागाई भत्ता व मागील महागाई भत्त्याची थकबाकी देणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीचे वय ६० करणे, ५ दिवसांचा आठवडा करणे, रिक्त पदे तात्काळ भरणे, अनुकंपा तत्वावरील सेवाभरती विना अट करणे, कंत्राटी धोरण रद्द करणे, महिला कर्मचाऱ्यांना बाल संगोपन रजा देणे, शिक्षण क्षेत्रातील विनाअनुदान धोरण रद्द करणे, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक, कर्मचारी यांचे १०० टक्के समायोजन होईपर्यंत वेतन सुरू ठेवणे इ. प्रमुख मागण्यांसह एकूण २४ मागण्यांचा समावेश होता.

(४) व (५) शासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी लागू करण्याबाबत नेमलेल्या श्री.के.पी.बक्षी समितीचा अहवाल शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० करण्याबाबत नेमलेल्या खट्टुआ समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनस्तरावर याबाबत निर्णय घेण्यात येईल.

केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना ५ दिवसांचा आठवडा लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

कर्मचारी संघटनांच्या मागण्यांपैकी महिला अधिकारी कर्मचाऱ्यांना दिनांक २३/०७/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार १८० दिवसांची बालसंगोपन रजा मंजूर करण्यात आली आहे.

तसेच राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ व दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये जानेवारी, २०१८ पासूनचा महागाई भत्ता व जानेवारी, २०१८ ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीतील महागाई भत्त्याची थकबाकी मंजूर करण्यात आली आहे.

संघटनेच्या अन्य मागण्यांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## पुणे येथील खडकवासला धरणाच्या मुठा उजवा कालव्याची भिंत फुटल्याबाबत

**(३) * ४४५६९ आर्कि.अनंत गाडगीळ, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील खडकवासला धरणाच्या मुठा उजवा कालव्याची भिंत फुटल्याने कालव्यातील प्रचंड प्रमाणात पाणी दांडेकर पूल परिसर, जनता वसाहत, सिंहगड रोड आणि दत्तवाडी भागातील झोपडपट्ट्यांमध्ये व दुकानांमध्ये शिरल्याने नागरिकांचे व मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडकवासला धरणातून कालव्याद्वारे दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजी सकाळपासून १२७७ क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला होता, तसेच दुर्घटना घडली त्या ठिकाणी कालव्याच्या पायापासून गळती होत होती त्यामुळे हा प्रकार घडला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कालवा फुटल्यामुळे किती लोकांचे व मालमत्तेचे नुकसान झाले आहे, तसेच त्यांना शासनातर्फे किती व कोणत्या प्रकारे मदत व नुकसान भरपाई देण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कालवा फुटण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन कालव्याच्या सुरक्षिततेसाठी व दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) दांडेकर पुलाजवळ खडकवासला प्रकल्पाचा नवीन मुठा उजवा कालवा सा.क्र. १२/६९७ येथे फुटला आहे. उपरोक्त कालवा फुटीमुळे परिसरातील घरामध्ये पाणी शिरुन ७३० कुटुंबे बाधित झाली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) याबाबत पुणे महानगरपालिका व महसूल विभागामार्फत पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, शा.नि.क्र.सीएलएस-२०१८/प्र.क्र.२७५/म-०३, दिनांक ०४/१०/२०१८ अन्वये ७३० कुटुंबे बाधित झालेली असून यापैकी ९० घरे पूर्णत: व ६५० घरांचे अंशत: नुकसान झाल्याचे निदर्शनास येते. शासनाने विशेष बाब म्हणून बाधित झालेल्या आपद्‍ग्रस्तांना मदतीचे वाटप करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांना रुपये ३.०० कोटी रक्कम मंजूर केलेली आहे.
(४) कालवा फुटीची प्राथमिक चौकशी करणेसाठी अधीक्षक अभियंता, पुणे, पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे यांची नियुक्ती मुख्य अभियंता (जसं), पुणे कार्यालयामार्फत केलेली आहे. तसेच शासनाने शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३७९/१८/सिंव्य कामे, दिनांक ०५/११/२०१८ अन्वये पाच सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत केलेली आहे. कालव्याच्या सुरक्षिततेसाठी फुटलेल्या ठिकाणाची तातडीची दुरुस्ती करुन उर्वरित १४ धोक्याच्या ठिकाणांची दुरुस्ती (भरावाचे मजबुतीकरण) यांत्रिकी विभागाचे मशिनरी मार्फत करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग पर्यटन विकासाचा 'सी वर्ल्ड' प्रकल्पाच्या प्रलंबित कामाबाबत

**(४) * ४४४०३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून राज्यात सी वर्ल्ड प्रकल्प साकारण्यासाठी सन २००७ पासून मुंबईसह कोकणातील अनेक ठिकाणे तपासण्यात आल्यानंतर हा प्रकल्प सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील तोंडवली-वायंगणी या गावांमध्ये राबविण्याचे निश्चित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन मुख्यमंत्री यांचे समवेत दिनांक १८ ऑक्टोबर, २०११ रोजी सादरीकरण झाल्यानंतर या प्रकल्पाच्या कामास प्रत्यक्षात चालना मिळाली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्प हा आशिया खंडातील पहिलाच प्रकल्प ठरणार असून दरवर्षी १० लाख पर्यटकांचे उद्दिष्ट ठेऊन सुरुवातीला १३९० एकरमध्ये हा प्रकल्प उभारण्याचे नियोजन होते मात्र इतकी जमीन संपादित करण्यास स्थानिकांनी विरोध केल्याने हा प्रकल्प प्रलंबित राहिला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन आघाडी सरकार जाऊन ऑक्टोबर, २०१४ मध्ये युतीची सत्ता आल्यानंतर युती शासनाने १३९० एकरावरील हा प्रकल्प ३५० एकरामध्ये होऊ शकतो असा निष्कर्ष काढूनही सदर प्रकल्प राबविण्याचे निश्चित केले असतानाही या प्रकल्पाच्या उभारणीच्यादृष्टीने शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सी वर्ल्ड प्रकल्पाच्या उभारणीचे काम कार्यान्वित होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१), (२) व (३) होय.

(४) व (५) समुद्र विश्व प्रकल्प ३५० ते ४०० एकर जागेमध्ये राबविण्याचे निश्चित केल्यावर उपअधीक्षक भूमी अभिलेख, मालवण यांचेमार्फत जागेची मोजणी करण्यात आली. मोजणीनंतर या जागेवरील बांधकामे, मांगर, विहीरी, बोअरवेल, फळझाडे, वनझाडे व कांदळवन इत्यादीची संयुक्त मोजणी संबंधित

(१) सा.बां.विभाग, (२) कृषी विभाग, (३) वन विभाग व (४) कांदळवन विभाग यांचे अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्याचे काम सुरु आहे.

याबाबत जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी प्राधिकृत केलेल्या उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांचेमार्फत या जागेतील जमिनीचा दर व मोबदला निश्चित करण्याचे काम सुरु आहे. त्यासाठी आवश्यक असलेले मौ.तोंडवली व वायंगणी या गावाचे (१) सद्य:स्थितीतील रेडीरेकनरचे दरपत्रक, (२) मागील तीन वर्षाचे तेथील जमीन खरेदी विक्री व्यवहाराबाबतची माहिती संबंधित विभागाकडून घेवून जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली.

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, कुडाळ यांच्याकडून सी वर्ल्ड प्रकल्पासाठी संपादन होणाऱ्या जमिनीचे सन १९५० ते २०१८ या सालातील ७/१२ उतारे, सर्व फेरफार नोंदीचे उतारे, तसेच गत तीस वर्षातील नोंदणीकृत दस्ताऐवजांच्या प्रती (खरेदी खत, बक्षिस पत्र, दान पत्र, मृत्यू पत्र, दत्तक पत्र, हक्क सोड पत्र, गहाण खत) वगैरे दुय्यम निबंधक कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन, तसेच गाव नमुना नं. ६ (वारसा रजिस्टर) वरुन वारसांची सखोल पडताळणी करुन कायदेशीर शोध अहवाल (Legal Search Report), तसेच कायदेशीर शोध अहवालाचा प्रारुप मसुदा तयार करुन त्यास सरकारी वकील/संपादन संस्थेच्या पॅनलवरील वकील यांची मान्यता घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाबाबत

**(५) * ४४२९७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९५ मध्ये संजय गांधी नॅशनल पार्क हे कृष्णगिरीचे जंगल या नावाने प्रसिध्द असून त्याचे क्षेत्रफळ २० चौरस स्क्वेअर कि.मी. होते, सन १९७६ मध्ये मुंबई उपनगरात ४४.४५ कि.मी. आणि ठाणे जिल्ह्यात ५८.६४ कि.मी. म्हणजेच एकूण १०३.०९ स्क्वेअर कि.मी. क्षेत्र वाढवून १९८१ साली त्यास संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे नाव देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालाड सर्व्हे नं. (जुना) २३९ (एकूण नगर भु क्रमांक ८२७ क्षेत्रफळ १६९३.३२) याबाबत वसलेवार बुक यामध्ये एकूण क्षेत्रफळ १६९४ एकर अशी लेखी नोंद घेतली असून त्यापैकी दिनांक १० सप्टेंबर, १९७५ रोजी ८४१ एकर २९ गुंठे या क्षेत्राचा ताबा वन खात्याकडे हस्तांतरीत करण्यात आला आणि मा.उच्च न्यायालयात संकिर्ण याचिका क्र. १४६५/१९७५ दाखल करुन महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम १९७५ नुसार आव्हान दिले होते या याचिकेनंतर समझोता करारा (Consent Term) प्रमाणे मौजे मालाड स.क्र. २३९/१ चे शासन विहित झालेले ८४८ एकर २० गुंठे १२ आणे क्षेत्र राष्ट्रीय उद्यान म्हणून दिनांक १६ जानेवारी, १९९६ च्या अधिसूचनेनुसार अधिसुचित झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, I) शासकीय राजपत्र, II) संपादनाची नोटीस, III) तहसिलदार, बोरीवली यांचा अहवाल, IV) जिल्हाधिकारी उपनगरे कार्यालयातील नोंदी, V) अप्पर जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातील दिनांक ४ सप्टेंबर, १९९० यातील पान क्र. ५ व ९ मधील नोंद २३९ मौजे मालाड या जमिनीचे मूळ क्षेत्र घेऊन मोजणी न करता, जिल्हाधिकाऱ्यांचे अहवाल न घेता या जमिनीचा परस्पर कागदावर ताबा घेतला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन १९७९ च्या न्यायालयीन समझोता कराराप्रमाणे ५७२ एकर जमीन वन कायदा १९२७ चे कलम ३५(३) अन्वये काढलेल्या संपादनाच्या नोटीसीमध्ये सामील केली, मुंबई महानगरपालिकेने तबेले निष्कासित करण्यासाठी भूमी संपादनाचे काम तहकुब करुन नंतर रद्द करण्यात आले, अशा परिस्थितीत वन खात्याने सदर ५७२ एकर जमीन मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय अथवा महाराष्ट्र खाजगी वने संपादन कायदा १९७५ चे कलम २१ अन्वये राखीव वन म्हणून पुन्हा संपादन करण्याची कारवाई केली नसल्याचा अहवाल शासनाकडे सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ५७२ एकर जमिनीचा ताबा कोणाकडे आहे, तसेच ही जमीन पुन्हा वन विभागाकडे का वर्गीकृत करण्यात आली नाही याबाबत शासनस्तरावर चौकशी केली आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) पुर्वीच्या बोरीवली नॅशनल पार्कचे सन १९९१ मध्ये "संजय गांधी राष्ट्रीय उद्यान" असे नामकरण करण्यात आले.

सद्य:स्थितीत संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभागाचे एकूण क्षेत्र १०४.४४ चौ.कि.मी. असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यात ४२.३२ चौ.कि.मी, पालघर जिल्ह्यात १६.९३ चौ.कि.मी. व मुंबई उपनगर जिल्ह्यात ४४.४२ चौ.कि.मी एवढे क्षेत्र आहे. सदर क्षेत्रात कृष्णागिरी उपवनाच्या क्षेत्राचा समावेश आहे.

(२) मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. १४६५/७५ मध्ये दिनांक ०३/१२/१९७९ रोजी झालेल्या समझोता करारानुसार मौजे मालाड, सर्वे क्र. २३९/१ मधील ८४८ एकर २० गुंठे १२ आणे क्षेत्राचा ताबा संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभागास देण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानुसार ८४१ एकर २९ गुंठे व ८ आणे इतकी जमीन वन विभागाच्या ताब्यात देण्यात आले. उर्वरीत ६ एकर ३१ गुंठे ४ आणे इतकी जमीन काही कब्जेदारांच्या ताब्यात असल्याने वन विभागाच्या ताब्यात देण्यात आलेली नव्हती. त्यानंतर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील दिनांक १६/०३/२००५ चे निर्णयाप्रमाणे दिनांक ३०/०३/२००५ रोजी उर्वरित ६ एकर ३१ गुंठे क्षेत्राचा ताबा वन विभागास देण्यात आला. दिनांक ०३/१२/१९७९ रोजीच्या समझोता कराराच्या आधारे मौजे मालाड, सर्वे क्र. २३९/१ मधील ८४८ एकर २० गुंठे १२ आणे क्षेत्राचा समावेश संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या दिनांक १६/०१/१९९६ च्या अधिसूचनेत करण्यात आला आहे.

(३) मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. १४६५/७५ मध्ये दिनांक ०३/१२/१९७९ रोजी झालेल्या समझोता करारानुसार मौजे मालाड सर्वे क्र. २३९/१ बाबत मोजणी रजिस्टर क्र. ५३५/१९८० नुसार एफ.ई.दिनशॉ ट्रस्ट यांच्याकडून ताब्यात देण्यात आलेल्या ८४१ एकर २९ गुंठे ८ आणे क्षेत्राची हद्द निश्चित करण्याकरीता मोजणी करण्यात आलेली आहे.

(४) व (५) मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. १४६५/७५ मध्ये दिनांक ०३/१२/१९७९ रोजी झालेल्या समझोता करारानुसार १४८८ एकर क्षेत्रापैकी वन विभागास वर्ग करण्यात आलेल्या ८४८ एकर २० गुंठे १२ आणे क्षेत्राव्यतिरिक्त उर्वरीत क्षेत्रात शासन आपला हक्क सांगू शकत नाही व हे क्षेत्र वनक्षेत्र राहणार नाही असे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे तबेल्यासाठी मुंबई महानगरपालिकेस दिलेल्या ५७२ एकर क्षेत्रावर वन विभाग

दावा करु शकलेले नाही. तसेच सदरचे उर्वरित क्षेत्र 'वने', 'खाजगी वने' या संज्ञेत मोडू शकत नसल्याने महाराष्ट्र खाजगी वने संपादन अधिनियम, १९७५ च्या तरतूदी लागू ठरत नसल्याचे समझोता करारात नमूद केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ चे कलम २१ अंतर्गत संपादनाची कार्यवाही करण्यात आली नाही.

-----------------

## राज्यात बालमृत्यूचे प्रमाण रोखण्याबाबत

**(६) * ४४०८८ श्री.जगन्नाथ शिंदे, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विलास पोतनीस, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भात मेळघाट मधील धारणी व चिखलदरा तसेच पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागात गेल्या २५ वर्षात सन १९९३ ते २०१८ याकाळात १४,२५५ बालमृत्यू तर २३६ मातांचा व ६९ मुलींचा कुपोषणामुळे मृत्यू झाल्याचे व हे प्रमाण ६० टक्क्यांनी कमी झाले तरी इतर समाजाच्या तुलनेत हे प्रमाण ४८.८ टक्क्यांनी अधिक असल्याचे केंद्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालात नमूद आहे तसेच सन २०१८ मध्ये ० ते १ वर्षे वयोगटातील १००५ व १ ते ५ वर्षे वयोगटातील २५६ बालकांचा मृत्यू झाल्याचे तसेच सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकात्मिक बालविकास विभागाकडील नोंदीनुसार जून, २०१८ या एका महिन्याच्या कालावधीत राज्यात ६ लाख ६९ हजार १४० बालके कमी वजनाची असून त्यापैकी १ लाख २२७ बालके तीव्र कमी वजनाची आणि ५ लाख ६८ हजार ९१३ बालके मध्यम कमी वजनाची आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी भागातील मुले व स्तनदा मातांसाठी शासनाकडून देण्यात येणाऱ्या सकस आहार व आरोग्य सुविधा आणि शैक्षणिक सुविधांचा लाभ मेळघाट या अतिदुर्गम भागातील आदिवासींना मिळत नसल्याबाबत न्यायालयात याचिका दाखल झालेली असून त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, कुपोषण व बालमृत्यूवर आळा घालण्याच्यादृष्टीने राज्यात महिला व बालविकास प्रकल्प कार्यालयांतर्गत बालविकास प्रकल्प अधिकारी ३०० पदे, पर्यवेक्षिका ८२७, अंगणवाडी सेविका २३८५, अंगणवाडी मदतनिस ६३०१ रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, कुपोषण अणि बालमृत्यूच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी शासनाने नेमलेल्या गाभा समितीच्या अभिप्रायानुसार वाढत्या बालमृत्यूच्या प्रमाणात आळा घालण्यासाठी तसेच कुपोषणाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी शासनाकडून आजतागायत कोणते धोरण प्रस्तावित केले आहे,

(६) असल्यास, कुपोषणाला आळा घालण्यासाठी शासनाने विविध उपाययोजना राबवूनही कुपोषण कमी न होण्याची कारणे कोणती व शासनाने यावर कोणती प्रभावी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

देशातील आदिवासी भागातील आरोग्याची सद्य:स्थिती त्यातील उणिवा व त्या उणिवा भरण्यासाठी नियोजन सुचविणेकरीता केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण व आदिवासी विकास मंत्रालय यांच्या एकत्रितपणे डॉ.अभय बंग यांच्या अध्यक्षतेखाली माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये १२ सदस्यीय समितीची स्थापना केली.

तसेच, १६ आदिवासी जिल्हयांकडील प्राप्त नवसंजीवनी अहवालानुसार सन २०१८-१९ मध्ये माहे सप्टेंबर अखेर ० ते १ वर्षे वयोगटात ९५० व १ ते ६ वर्षे वयोगटात २३३ असे एकूण ११८३ बालमृत्यू झाले आहेत. तसेच सन २०१८-१९ मध्ये माहे सप्टेंबर अखेर अमरावती व पालघर जिल्हयात ० ते ६ वर्षे वयोगटात अनुक्रमे २०८ व १०९ बालमृत्यू झाले आहेत.

सदर बालमृत्यू हे कुपोषणामुळे झालेले नसून जन्मत: कमी वजन, कमी दिवसाची प्रसूती, न्युमोनिया व जन्मत: श्वसावरोध इत्यादी विविध कारणांमुळे झालेले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

माहे जुलै, २०१८ च्या मासिक प्रगती अहवालावरुन बालकांची श्रेणीनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| एकूण वजन घेतलेली बालके | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|
| ५८८३३६५ | ५२१९३२६ | ५७०२५६ | ९३७८३ |

(३) मेळघाट कुपोषणासंबंधी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका क्रमांक १३३/२०१० दाखल करण्यात आली असून सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालयात सुनावणी होत आहे.

या याचिकेवर मा.उच्च न्यायालय मुंबई येथे सुनावणीची पुढील तारीख २४/११/१८ आहे.

(४) रिक्त पदे भरण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

बालविकास प्रकल्प अधिकारी (गट-अ) व (गट-ब) यांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

नागरी प्रकल्पातील मुख्य सेविका भरतीबाबत महाराष्ट्र प्रशासकीय लवादासमोर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने सद्य:स्थितीत भरती प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद आस्थापनेवरील ग्रामीण/आदिवासी प्रकल्पातील मुख्यसेविकांच्या भरतीबाबत जिल्हा परिषदस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

तसेच, अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/मदतनीस या मानधनी पदांची रिक्त पदे भरणेबाबतच्या प्रक्रियेस शासन पत्र क्र. एबावि-२०१६/प्र.क्र.१८०/का-६, दिनांक ०७/०९/२०१७ अन्वये स्थगिती देण्यात आलेली आहे. मात्र दिनांक ०८/१०/२०१८ च्या शासन निर्णयानुसार नंदुरबार, वाशिम, गडचिरोली, उस्मानाबाद, पालघर संपूर्ण जिल्हा व अमरावती मधील मेळघाट, धारणी, चिखलदरा प्रकल्प तसेच गोंदिया, चंद्रपूर, भंडारा जिल्ह्यातील डावी कडवी विचारणी अंतर्गत असणारे भागात अंगणवाडी सेविका/अंगणवाडी मदतनीस/मिनी अंगणवाडी सेविका या भरतीस मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(५) व (६) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर स्तनदा माता यांना नियमित पूरक पोषण आहार देण्यात येतो. या व्यतिरीक्त SAM बालकांसाठी राज्यातील आदिवासी तसेच बिगर आदिवासी भागांमध्ये ग्राम बालविकास केंद्र (VCDC) सुरु करण्यात आली आहेत. आदिवासी प्रकल्पामध्ये अमृत आहार योजना सुरु असून हया योजनेंतर्गत गरोदर स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो. तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी व केळी पुरविण्यात येतात. या अंतर्गत प्रतिदिन शाकाहारी बालकांना २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडी देण्यात येतात.

-----------------

## गणेशनगर (जि.सांगली) येथील चौगुले मॅटर्निटी व सर्जिकल हॉस्पिटलमध्ये बेकायदा महिलांचा गर्भपात करुन भ्रूणांची हत्या केल्याबाबत

**(७) * ४४१९७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, अॅड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गणेशनगर (जि.सांगली) येथील चौगुले मॅटर्निटी व सर्जिकल हॉस्पिटलमध्ये बेकायदा महिलांचा गर्भपात करुन भ्रूणांची हत्या केल्याची घटना दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत डॉ.चौगुले दांम्पत्यासह डॉ.स्वप्नील जमदाडे यांनाही अटक करण्यात आली आहे काय, तसेच या प्रकरणी कोल्हापूर जिल्ह्यातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांची नावेही निष्पन्न झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणातील तपासाचे स्वरुप काय आहे व आतापर्यंत किती जणांना कोणत्या कलमान्वये अटक करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

चौगुले दांम्पत्य अटकेत असून डॉ.जमदाडे फरार आहेत.

(३) व (४) पोलीस यंत्रणेमार्फत सखोल तपास चालू आहे गुन्हयातील संबंधित ६ आरोपीविरुध्द वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ च्या कलम ४ (ब), ५(३)(४) व भा.दं.वि.सं. कलम ३१२,२०१,३४ नुसार सांगली शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ५ आरोपीना अटक करण्यात आली आहे. एक आरोपी फरार आहे व ५ आरोपींना न्यायालयीन कोठडी देण्यात आली असून त्यापैकी १ आरोपीचा आजारपणाने मृत्यू झाला आहे. उर्वरित आरोपी सध्या

न्यायालयीन कोठडीत असून संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना निलंबित केले असून वैद्यकिय व्यवसाय नोंदणी रद्द करण्याबाबत महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल यांना दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणातील जुन्या घरांच्या दुरुस्ती/पुनर्बांधणी करण्याबाबत

**(८) * ४४२४० श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील जुन्या घरांच्या दुरुस्ती/पुनर्बांधणीचे अधिकार शासनाने ग्रामपंचायतीकडून काढून तहसिलदारांना बहाल केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत कोकणातील जुन्या घरांच्या दुरुस्ती / पुनर्बांधणीच्या परवानगीसाठी लागणारे विविध विभागांचे ना-हरकत प्रमाणपत्र, विविध विषयाची प्रतिज्ञापत्रे, सातबारावरील सर्व सहहिस्सेदारांची संमत्तीपत्रे वगैरे अशा अनेक प्रकारची कागदपत्रे जमा करावी लागत असून अनेक गावातील जुनी घरे मोडकळीस आलेली असून त्यांच्या दुरुस्ती/पुनर्बांधणीसाठी परवानगी मिळत नसल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोकणातील जुन्या मोडकळीस आलेल्या घरांच्या दुरुस्ती/पुनर्बांधणीसाठी विना अट परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४३) दिनांक २९ डिसेंबर, २०१४ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील बांधकाम परवानगीबाबतचे कलम ५२ मध्ये सुधारणा करण्यात आली असून राज्यातील प्रादेशिक योजना असलेल्या प्रदेशातील

गावाच्या गावठाणाबाहेरील क्षेत्रात बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी प्राधिकृत करतील अशा तहसिलदार या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या अधिकाऱ्यांना आहेत. तसेच, ग्रामीण भागातील गावठाण हद्दीतील बांधकाम परवानगी ही नगररचना अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेने देण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना आहेत.

कलम ५२(२-ड) नुसार इमारती उभारण्यासाठी किंवा पुन्हा उभारण्यासाठी परवानगी देण्याच्या संबंधात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम १९६६ याच्या कलम २० च्या पोट कलम (४) अन्वये तयार केलेले महाराष्ट्र प्रादेशिक योजनांच्या संबंधातील प्रमाणिकृत विकास नियंत्रण व प्रवर्तन विनियम लागू आहेत.

बांधकाम किंवा पुनर्बांधकामासंदर्भात पंचायतीकडे मागणी करण्यात आलेली परवानगी ही त्याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांमध्ये द्यावयाची आहे अन्यथा सदर ६० दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीनंतरच्या लगेचच पुढच्या दिवशी सदर परवानगी दिली असल्याचे मानण्यात येईल, अशी तरतूद आहे.

उपरोक्त सुधारणा दिनांक १५ मे, २०१५ च्या अधिसूचनेद्वारे अंमलात आणण्यात आल्या आहेत.

राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये प्रारुप/अंतिम प्रादेशिक योजना लागू असल्याने ग्रामीण भागातील गावठाण हद्दीबाहेर बांधकाम परवानगीबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम लागू आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणा व नागपूर ग्रामीणमधील ग्रामपंचायतीनी एल.ई.डी. बल्ब खरेदीमध्ये गैरव्यवहार केल्याबाबत

**(९) * ४४७८४ श्री.गिरीशचंद्र व्यास** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेंतर्गत चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीत विशेषत: हिंगणा व नागपूर ग्रामीणमधील ग्रामपंचायतीनी खरेदी केलेले एल.ई.डी. बल्ब

मार्केटपेक्षा अधिक भावाने खरेदी करून त्यात लाखो रूपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने किती ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय, चौकशी करण्यात आली. चौकशीअंती ज्या ग्रामपंचायतीनी वाजवी दरापेक्षा जास्त दराने खरेदी केलेली आहे, त्या ग्रामपंचायतीचे सरपंच व सचिव यांचेकडून वसूलपात्र रकमेची वसुली करण्याबाबतची तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ अन्वये प्रशासकीय कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हा परिषदेतील आरोग्य सेवेतील रिक्त पदे असल्याबाबत

**(१०) * ४४२०२ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेतील आरोग्य सेवेमधील ६११ कर्मचाऱ्यांची रिक्त पदे असल्याने जिल्ह्यातील रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) वित्त विभागाच्या दिनांक १६ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पद भरतीवर घालण्यात आलेले निर्बंध उठविण्यात आलेले असून जुन्या आकृतिबंधानुसार गट-क व गट-ड संवर्गातील १०० टक्के पद भरती करण्यास प्रशासकीय विभागांना मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार पद भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी भागात कार्यरत डॉक्टरांना सेवेत कायम करणेबाबत

**(११) * ४४९६३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयंत पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गडचिरोली व नंदुरबार यासारख्या नक्षलग्रस्त भागात तसेच राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यातील दुर्गम व ग्रामीण भागात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ७३८ बीएएमएस वैद्‌यकीय अधिकारी भरारी पथकाच्या माध्यमातून गेल्या १२ वर्षापासून अस्थायी स्वरुपात काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वैद्‌यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा निर्णय घेवूनही त्याची अंमलबजावणी न झाल्याने या अस्थायी वैद्‌यकीय अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र राज्य अस्थायी मानसेवी वैद्‌यकीय अधिकारी संघटनेच्या माध्यमातून त्यांना सेवेत कायम करण्याबाबत तसेच इतर मागण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना सविस्तर निवेदन माहे जुलै, २०१८ मध्ये व तत्पूर्वी मागील दोन वर्षापासून सातत्याने सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक वर्षांच्या संघर्षानंतर दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठक क्र. १४४ अन्वये आरोग्य संचालनालयातील ७३८ अस्थायी वैद्यकीय अधिकारी हे रिक्त असलेल्या पदावर विशेष बाब म्हणुन कायमस्वरूपी समावेश करण्यास मंत्रिमंडळाने मंजूरी दिली आहे, तसेच या वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम न केल्यास प्रथम काम बंद आंदोलन व नंतर सामुदायिक राजीनामे देण्याची भूमिका घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर डॉक्टरांनी सामुहिक राजीनामे दिल्यास ग्रामीण व दुर्गम भागातील जनतेच्या आरोग्य सेवेवर परिणाम होणार असल्याने या डॉक्टरांना सेवेत कायम करुन घेण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग व सचिव, आदिवासी विकास विभाग यांना माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर ७३८ अस्थायी वैद्यकीय अधिकारी हे सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत गट-ब संवर्गात कार्यरत आहेत. सदरहू अस्थायी वैदयकीय अधिकारी हे भरारी पथकाच्या माध्यमातून काम करीत नसून ते आयुर्वेदिक दवाखाना, प्राथमिक आरोग्य पथकांमध्ये काम करीत आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा निर्णय घेवूनही त्याची अंमलबजावणी करण्याबाबत काही मा.लोकप्रतिनिधींच्यामार्फत मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदने सादर केली आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आरोग्य सेवा संचालनालयांतर्गत कार्यरत असलेल्या ७३८ अस्थायी वैदयकीय अधिकाऱ्यांना एकवेळचे विशेष बाब म्हणुन कायमस्वरूपी समावेश

करण्याबाबत मा.मंत्रिमंडळाने मंजूरी दिली आहे. तसेच सदर वैद्यकिय अधिकारी महासंघाने मा.मुख्यमंत्री महोदयांना वैदयकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम न केल्यास प्रथम काम बंद आंदोलन व नंतर सामुदायिक राजीनामे देण्याबाबतचे निवेदन सादर केले आहे.

(४) अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करुन घेण्याबाबतची निवेदने मा.मुख्यमंत्री महोदयांना व इतर मान्यवरांना वैद्यकीय अधिकारी महासंघाच्यामार्फत सादर करण्यात आली आहेत.

(५) दिनांक २९/०८/२०१७ रोजी मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत ७३८ अस्थायी वैद्यकीय अधिकारी यांच्या समावेशनाबाबतचा निर्णय झाला असून त्याबाबतची अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (मेडीकल), नागपूर येथे व्हेंटिलेटर उपलब्ध करून देण्याबाबत

**(१२) * ४५३५८ श्री.प्रकाश गजभिये, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (मेडीकल) येथे १५०० बेड असून केवळ २२ व्हेंटिलेटर उपलब्ध आहेत त्यापैकी ५ व्हेंटिलेटर बंद असल्याचे दिनांक १८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेडिकलमध्ये दररोज ४ ते ५ गंभीर रूग्णांना तातडीने व्हेंटिलेटरची गरज असून व्हेंटिलेटरची कमतरता असल्यामुळे रूग्णाला खाजगी रूग्णालयाशिवाय पर्याय नसतो अशावेळी खाजगी रुग्णालयात व्हेंटिलेटरचा एक दिवसाचा खर्च १५ हजार रूपयांपेक्षा अधिक असतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेडीकल येथे गंभीर आजाराचे रूग्ण मोठ्या प्रमाणात सापडत असून व्हेंटिलेटर अभावी बऱ्याच रूग्णांना ऑक्सीजन वेळेत उपलब्ध न झाल्याने कित्येकांचे मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, अपघातात गंभीर जखमी रूग्णांना तातडीने उपचार उपलब्ध व्हावा याकरीता ७२ बेडचे ट्रामा केअर सेंटर सुरू करण्यात आले असून तेथे २५ व्हेंटिलेटरची गरज असताना केवळ १७ व्हेंटिलेटर उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रूग्णालयात तातडीने व्हेंटिलेटर उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) सद्य:स्थितीत उपलब्ध ७२ बेडच्या तुलनेत १७ व्हेंटिलेटरची संख्या पुरेशी आहे.
(५) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेत सन २०१८-१९ मध्ये एकूण ३३ व्हेंटिलेटर खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

-----------------

## तारापूर (जि.पालघर) येथील रुग्णांची गैरसोय लक्षात घेऊन नवीन इमारत बांधण्याबाबत

**(१३) * ४५४५४ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर (जि.पालघर) येथील २० वर्ष जुनी असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीमध्ये पाणी जमा होत असल्याने औषधांचा साठा पाण्याने भिजून खराब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णांची गैरसोय होत असल्याने नवीन इमारतीकरीता लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांची गैरसोय लक्षात घेऊन नवीन इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) तारापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांनी दिनांक ९/१/२०१८ रोजी पाहणी करुन सदर इमारतीत पावसाळ्यात पाणी जमा होत असल्याने इमारत वापरणे अयोग्य असल्याचा अहवाल त्यांनी दिला. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांनी दिनांक ७/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर इमारत पाडण्याची शिफारस केली आहे.

या अनुषंगाने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्या कार्यालयामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्र, तारापूर येथील नवीन इमारतीसाठी आराखडे व अंदाज पत्रकास प्रशासकीय मान्यता घेण्याची व निधीची मागणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पडघा (जि.ठाणे) परिसरातून खैर लाकडांची तस्करी होत असल्याबाबत

**(१४) * ४४४२६ श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पडघा (जि.ठाणे) परिसरात दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास खैर लाकडांची तस्करी करणारा ट्रक पकडण्यात आला असून खैराची तस्करी व बेकायदेशीर वाहतुकीत गुटखा माफियांचा सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या वर्षभरात अशाप्रकारे खैराची तस्करी वा बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या किती जणांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) पडघा (जि.ठाणे) परिसरात तासकाम केलेली खैराची लाकडे भरलेला ट्रक क्र. MH-०८/W-८२८३ हा दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी पाठलाग करुन तो कोलाड नाका, रोहा वन विभाग, मुंबई गोवा हायवे येथे पकडण्यात आले असून यामध्ये खैराची तस्करी करणाऱ्यांचा व चिपळूण येथील कात भट्टीधारक व्यापारी यांचा सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) गेल्या वर्षभरात खैर तस्करी संदर्भात कारवाई केली असून ४ गुन्हे प्रकरणामध्ये पाच खैर लाकडाचे ट्रक पकडले असून सदर गुन्हयात सामील असलेले ४० आरोपीवर न्यायालयीन कारवाई चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा शहराला (जि.पालघर) लागून असलेल्या सोनारपाडा शाळेची दुरुस्ती करण्याबाबत

**(१५) * ४४८८४ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा शहराला (जि.पालघर) लागून असलेल्या सोनारपाडा येथील शाळेची माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान वादळात पडझड होवून मोठे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद शिक्षण विभागाने या शाळेची दुरुस्ती केलेली नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांना मंदिरात बसून अभ्यास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, शाळेची दुरुस्ती न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेता या शाळेची दुरुस्ती करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे सोनारपाडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या २ वर्गखोल्या असून एका वर्गखोलीचे नुकसान झाले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

सुस्थितीत असलेल्या वर्ग खोलीत इयत्ता १ ली व इयत्ता २ री वर्गातील विद्यार्थी अध्यापनाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, इयत्ता ३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यांसाठी अध्यापनाची व्यवस्था सुरक्षिततेच्यादृष्टीने सार्वजनिक मंदिराच्या सभागृहात करण्यात आलेली आहे.
(३) व (४) जिल्हा परिषद शाळा सोनारपाडा येथील एक वर्ग खोली दुरुस्तीसाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रुपये १,३८,८४९/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक २६/१०/२०१८ रोजी देण्यात आहेत. त्यानुसार शाळांची दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिपरी दिक्षीत (ता.मुल, जि.चंद्रपूर) येथील मा.मा.तलाव नहर फुटल्याबाबत

**(१६) * ४४३१७ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिपरी दिक्षीत (ता.मुल, जि.चंद्रपूर) येथील मा.मा.तलावाचा नहर (कालवा) अतिपाण्यामुळे फुटल्याने पाण्या अभावी ३०० हेक्टर शेती सिंचनापासून वंचित राहत असल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नहराच्या (कालव्याच्या) दुरूस्तीबाबत लघु पाटबंधारे विभागाकडे शेतकऱ्यांनी निवेदन देवूनही नहराची (कालव्याची) दुरूस्ती केली गेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर नहराची (कालव्याची) दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) पिपरी दिक्षीत लघु पाटबंधारे तलावाचा मुख्य कालवा खरीप सिंचन २०१८-१९ सुरु असताना सा.क्र. ७०० मी. मध्ये भरावाच्या ठिकाणी दिनांक २९/०७/२०१८ ला पाण्याच्या अतिदाबामुळे कालव्याच्या निरीक्षण पथाच्या बाजूने फुटला. तथापि, पाण्या अभावी शेती सिंचनापासून वंचित राहिली नाही.
(२) नाही, सदर कालवा तातडीने दुरुस्त करुन कालवा फुटल्याच्या तारखेपासून ३ दिवसातच सिंचन सुरळीत करण्यात आले व एकूण २८० हे. क्षेत्रास सिंचन करण्यात आले.
(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. कालव्याची दुरुस्ती करुन ३ दिवसात आवर्तन सुरु केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे रूग्णांची नोंदणी करण्याकरीता टोकन सिस्टीम बंद असल्याबाबत

**(१७) * ४३९६२ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे रूग्णांची नोंदणी करण्याकरीता टोकन सिस्टीम लावण्यात आली असून त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या फंडातून किती निधीचा वापर करण्यात आला,

(२) असल्यास, सदर टोकन सिस्टीम सुरळीतपणे चालू राहण्यासाठी एएमसी किंवा सीएमसीचा करार करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर टोकन सिस्टीम किती दिवसापासून बंद पडलेली आहे व त्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बंद असलेली टोकन सिस्टीम पुन्हा सुरु करण्यासाठी कोणती उपाययोजना केली व यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन** : (१) सदर टोकन सिस्टीम यंत्रणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या फंडातून रुपये ११,००,०००/- (रुपये अकरा लक्ष) एवढया निधीचा वापर करण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदरहू टोकन सिस्टीम पूर्णपणे बंद पडलेली नसून त्यातील काही भाग सुरळीतपणे सुरु आहे. काही भाग दिनांक ११/१०/२०१८ पासून बंद पडलेला आहे. बंद पडलेला भाग दुरुस्तीसाठी संबंधित पुरवठादार कंपनीस संस्थेने कळविले आहे. बंद पडलेल्या भागामुळे रुग्णसेवेवर दुष्परिणाम झालेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासनाच्या अखत्यारीतील रुग्णालयात शवविच्छेदन केंद्रातील कर्मचाऱ्यांचा क्षयरोगाने मृत्यू झाल्याबाबत

**(१८) * ४४७१३ श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्रीमती स्मिता वाघ, श्री.प्रविण दरेकर** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शासनाच्या अखत्यारीतील जे.जे., जीटी, सेंट जॉर्ज आदी प्रमुख रुग्णालयातील शवविच्छेदन केंद्रातील २५ कर्मचाऱ्यांचा मागील दहा वर्षात क्षयरोगाने मृत्यू झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृतदेहाचे शवविच्छेदन करताना अपुरे साहित्य, मास्कचा अभाव, अस्वछता अशा विविध कारणांमुळे कर्मचाऱ्यांना विविध संसर्गजन्य रोगांची लागण झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना अद्यावत साधन सामुग्री पुरविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) मागील दहा वर्षात सर ज.जी. समुह रुग्णालय, मुंबई येथील शवविच्छेदन केंद्रातील एका कर्मचाऱ्याचा दिनांक २७/०७/२०१८ रोजी क्षयरोगाने मृत्यू झाल्याचे आढळून आले आहे.
(२) खरे नाही.
(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना मास्क, ग्लोव्हज व साफसफाईकरीता साहित्य वेळोवेळी पुरविण्यात येते. तसेच दरवर्षी त्यांच्या वैद्यकीय तपासण्या करण्यात येतात.
(४) लागू नाही.

-----------------

## विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रासाठी जाहीर केलेल्या पॅकेजबाबत

**(१९) * ४३९७७ श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र विभागात विविध योजना राबविण्यासाठी दिनांक २० जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.वित्तमंत्री यांनी २२ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पॅकेजनुसार निधीचे वितरण करण्यात आले आहे काय, केव्हा व कशाप्रकारे करण्यात आले आहे,

(३) असल्यास, जाहीर केलेल्या उक्त पॅकेजनुसार निधीचे वितरण करण्यात आले नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व प्रत्यक्षात निधी केव्हा वितरीत करण्यात येणार आहे ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) मा.मंत्री (वित्त) यांनी दिनांक २० जुलै, २०१८ रोजी २१ हजार २२२ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले असून त्या अनुषंगाने दिनांक २० ऑक्टोबर, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(२) व (३) "विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्राच्या जलद विकासासाठी राबवावयाच्या उपाययोजनांचा विशेष कार्यक्रम, २०१८" या कार्यक्रमांतर्गत नमूद कामांसाठी सन २०१८-१९ व २०१९-२० या दोन वर्षात निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. सन २०१८-१९ करीता संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या निधीमधून सदर कार्यक्रमांतर्गत नमूद केलेल्या कामांसाठी प्रथमत: निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर सन २०१८-१९ करीता निधी अपुरा पडत असेल तर आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे प्रस्ताव सादर करावयाचे आहेत. त्यानुसार सादर झालेल्या प्रस्तावांकरीता हिवाळी अधिवेशन, २०१८ मध्ये पुरवणी मागण्यांद्वारे अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच, सन २०१९-२० या आर्थिक वर्षात सदर पॅकेज अंतर्गत असलेल्या कामांसाठी आवश्यक तो निधी राखून ठेवण्याबाबत वार्षिक कार्यक्रम २०१९-२० च्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचनांद्वारे सर्व प्रशासकीय विभागांना कळविण्यात येत आहेत.

-----------------

## महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विकास महामंडळाच्यावतीने खरेदी केलेल्या हाऊसबोट नादुरुस्त असल्याबाबत

**(२०) * ४५४२६ ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्यावतीने सुमारे दिड कोटी रुपये खर्च करून खरेदी केलेली हाऊसबोट नादुरुस्त झाल्याने माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तारकर्ली (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) खाडी किनारी आणण्यात

आली असून तीची दुरुस्ती करण्यासाठी पर्यटन महामंडळ अगर एमटीडीसीकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापुर्वीही अशा प्रकारे एका बोटीला आग लागल्याने तिलाही जलसमाधी मिळाली होती, यामुळे एमटीडीसीच्या स्थानिक प्रशासनाच्या दक्षतेवर आणि कार्यवाहीवर अनेक प्रश्न उभे राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने तारकर्ली, ता.मालवण येथील खाडीत पर्यटकांसाठी हाऊसबोटी उपलब्ध करुन दिल्या. सदरच्या हाऊसबोटी ह्या ड्रायडॉक नसल्याने पावसाळी हंगामात देखील पाण्यामध्ये असतात. हाऊसबोटीच्या तळभागाला छिद्रे पडून बोटींमध्ये पाणी येण्याचे प्रमाण वाढल्याने या बोटी दुरूस्तीकरीता पाण्याबाहेर काढल्या होत्या. त्याकरीता स्थानिकस्तरावर दरपत्रे मागविण्यात आली होती. परंतु, दुरुस्तीकरणावर मोठ्या प्रमाणात खर्च अपेक्षित असल्याने महामंडळाने सदरच्या हाऊसबोटी “जश्या आहेत त्या स्थितीत” खाजगी उद्योजकांच्या सहकार्याने दुरुस्ती करुन सुरु करण्याबाबत निर्णय घेतला. त्यानुसार स्थानिक स्तरावर निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन खाजगी संस्थेची नेमणूक करण्याकरीता निविदा जाहिरात प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) व (३) यापूर्वी सन २०१२ मध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळ व बाणकोट खाडीकरीता हाऊसबोटीचे बांधकाम करुन हाऊसबोट पुरविण्याचे कंत्राट विहित निविदा प्रक्रिया राबवून मे.युनिकेअर एमरजेन्सी इक्युपमेंट प्रा.लि. या संस्थेस दिले होते. सदर संस्थेमार्फत तारकर्ली, ता.मालवण येथे हाऊसबोटींचे काम सुरु असताना

हाऊसबोटींना आग लागली होती. त्यावेळी हाऊसबोटी संस्थेच्या ताब्यात असल्यामुळे महामंडळाच्या प्रशासनाच्या दक्षता आणि कार्यवाहीबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत किशोरवयीन मुलींना देण्यात येणारा पोषण आहार बंद केल्याबाबत

**(२१) * ४४६०३ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिकेत तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत ११ ते १८ या वयोगटातील किशोरवयीन मुलींना देण्यात येणारा पोषण आहार शासनाने दिनांक १ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास बंद केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन योजना सुरु होण्यापूर्वी सद्य:स्थितीतील योजना बंद झाल्यामुळे राज्यातील किशोरवयीन मुली पोषण आहारापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, राज्यातील कुपोषित, आरोग्याच्या तक्रारी असलेल्या अनेक मुलींना शारिरीक वाढीच्यादृष्टीने सदर योजना सुरु ठेवण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे पत्राव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने किशोरवयीन मुलींना देण्यात येणारा पोषण आहार पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

११ ते १४ वयोगटातील इयत्ता ८ वी पर्यंतच्या किशोरवयीन मुलींना शालेय पोषण आहार या योजनेंतर्गत भोजनाचा लाभ मिळत आहे. तथापि, या

वयोगटातील शाळाबाहय मुलींना पोषण आहार देण्यासंबंधी मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मान्यतेनंतर ११ ते १४ या वयोगटातील शाळाबाहय मुलींना पोषण आहार सुरु करण्यात येणार आहे.

(३) यापूर्वी राज्यातील ११ जिल्हयामध्ये राबविण्यात येत असलेली केंद्र पुरस्कृत राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण (सबला) योजना व किशोरी शक्ती योजना बंद करुन किशोरवयीन मुलींसाठी योजना (Scheme for Adolescent Girl) ही योजना संपूर्ण राज्यात सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडून प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात येत आहे. प्रस्तावास मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर सदर योजना संपूर्ण राज्यात सुरु करण्यात येईल.

(४) याविषयी विभागाकडे सन्माननीय लोकप्रतिनिधींचे पत्र प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) राज्यातील संपूर्ण जिल्हयांसाठी ११ ते १४ या वयोगटातील शाळाबाहय किशोरवयीन मुलींसाठी योजना (Scheme for Adolescent Girl) सुरु करण्यासाठीच्या प्रस्तावावर मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर योजना सुरु करण्यात येईल.

-----------------

## पालव ते थेरोंडा आगल्याचीवाडी (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील साकव जीर्ण झाल्याबाबत

**(२२) * ४५०३१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालव ते थेरोंडा आगल्याचीवाडी (ता.अलिबाग, जि.रायगड) दरम्यान सुमारे ७० वर्षापूर्वी उभारण्यात आलेला साकव जीर्ण झालेला असून वाहतुकीस धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जीर्ण झालेल्या साकवावरून दररोज वाहने ये-जा करत असल्याने अपघात होवून मोठी जिवित हानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर साकवाचा जोड रस्ताही नादुरूस्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने साकव व जोडरस्ता बांधण्याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) सदरील साकवाची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे. पालव, थेरोंडा, आगल्याचीवाडी या ग्रामीण मार्ग क्र. ८१ वर साखळी क्र. १/३०० वर जुना अरुंद पुल नादुरुस्त झालेला आहे. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे जिवित हानी होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सदर पुलाची पुनर्बांधणी करणे आवश्यक असल्याने जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव पाठविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वृक्ष लागवड योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) * ४४८६४ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यात १३ कोटी वृक्ष लागवडीची योजना ग्रामपंचायत पातळीवर राबविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत अनेक ठिकाणी गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१८ च्या पावसाळयात १३ कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम वन विभाग, इतर विभाग, केंद्र शासनाची राज्यातील कार्यालये तसेच लोक सहभागातून राबविण्यात आला आहे. त्यामध्ये ग्रामविकास विभागांतर्गत ग्रामपंचायतींचासुध्दा एक यंत्रणा म्हणून समावेश आहे.

(२), (३) व (४) सन २०१८ च्या पावसाळ्यात राज्यात १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत १५.८८ कोटी रोपे लागवड करण्यात आली असून सदर प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत

**(२४) * ४४६२३ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन बँक खात्यात जमा करण्याबाबतची माहिती पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी प्रमाणित करून वरिष्ठस्तरावर पाठवली नसल्याने सुमारे ६० हजार कर्मचाऱ्यांचे वेतन गत ६ महिन्यांपासून प्रलंबित असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी याची दखल घेत जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामसेवकांचे मासिक वेतन रोखण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील २८ हजार ग्रामपंचायतींमधील सुमारे ६० हजार कर्मचाऱ्यांचे वेतन कधीपर्यंत बँक खात्यात वर्ग करण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) ग्रामपंचायत ही स्वायत्त संस्था असून, शासन निर्णय, दिनांक २१/१/२००० नुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना देय असलेले किमान वेतन हे ग्रामपंचायतींनी प्रथम दरमहा अदा करावयाचे असून त्यानंतर सदर किमान वेतनातील शासनाच्या हिश्श्याच्या अनुदानाच्या रकमेची प्रतिपुर्ती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत करण्यात येते. त्यानुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन अदा करण्यात आलेले आहे.

शासन निर्णय, दिनांक ०६/०१/२०१८ अन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनलाईन पध्दतीने थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार या प्रयोजनार्थ विकसित करण्यात आलेल्या किमान वेतन प्रणालीवर ग्रामसेवकांनी माहिती भरल्यानंतर सदरची माहिती ही गटविकास अधिकारी यांनी प्रमाणित करावयाची आहे. सदर माहिती प्रमाणित केल्यानंतर संबंधित ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे मासिक किमान वेतन बील ग्रामसेवकांनी प्रणालीवरच सादर करावयाचे आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची ही वेतन विषयक बाब असल्याने सदर प्रणालीमधील तांत्रिक अडचणी विचारात घेता माहे ऑक्टोबर, २०१७ ते मार्च, २०१८ पर्यंतचे राज्य शासनाच्या हिश्श्याच्या अनुदानाच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यास विलंब झालेला आहे.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन प्रणालीमधील तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्यानंतर वर नमूद केल्यानुसार ग्रामसेवकांनी माहिती भरणे व ती गटविकास अधिकारी यांनी प्रमाणित करणेबाबतची कार्यवाही संथगतीने होत असल्याने व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन विनाविलंब ऑनलाईन देण्याच्या अनुषंगाने सदरची कार्यवाही तातडीने पूर्ण व्हावी या उद्देशाने शासनाच्या दिनांक १८/०८/२०१८ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामसेवकांचे मासिक वेतन रोखण्याचे आदेश देण्यात आले हे खरे आहे.

(३) राज्यातील २७,८४० ग्रामपंचायतींमध्ये मंजूर आकृतिबंधानुसार सुमारे ५३,००० ग्रामपंचायत कर्मचारी कार्यरत असून २५,६२९ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे माहे एप्रिल, २०१८ ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीचे किमान वेतनाच्या शासनाच्या हिश्श्याच्या अनुदानाची रक्कम ऑनलाईन पध्दतीने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या खात्यात दिनांक ०६/११/२०१८ रोजी जमा करण्यात आली आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांचे सदर कालावधीतील तसेच त्यापुढील मासिक किमान वेतन त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी येथील स्त्री रूग्णालय बंद असल्याबाबत

**(२५) * ४५०१० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील स्त्री रूग्णालय १२ वर्ष बंद असल्याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी ऑल इंडिया युथ फेडरेशने केल्यावर उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली माहे मार्च-एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान त्रिसदस्यीय समिती नियुक्ती करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने चौकशी करून आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्यात कोणते मुद्दे समाविष्ट केले आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व यंत्रणा यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर समितीने चौकशी अहवाल सादर केला असून त्यात अर्जदाराने मागणी केलेल्या सर्व मुद्‌यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(३) परभणी येथे जिल्हा रुग्णालयासह ६० खाटांचे स्त्री रुग्णालय सुरु आहे. जिल्हा रुग्णालयातच स्त्री रुग्णालयही सुरु आहे. स्त्री रुग्णालयासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध न झाल्यामुळे जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीत दोन्ही रुग्णालयाचे काम संयुक्तपणे सुरु आहे. आता स्त्री रुग्णालय परभणीच्या स्वतंत्र इमारतीसाठी दर्गा रोड येथे २.५ एकर जागा उपलब्ध झाली असून रुपये २०.०० कोटी अंदाज आराखड्यांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. बांधकामाच्या निविदा अंतिम करुन कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. चौकशी अहवालानुसार, कोणतेही अधिकारी व यंत्रणा जबाबदार नसल्याचे दिसून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोहुल वाडी, हरकुल येथील परब/राणेवाडी तसेच सौंदाळे गावठाण (ता.देवगड) येथील ओहोळावर असलेले पुल जिर्ण झाल्याबाबत

**(२६) * ४३९८१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहुल वाडी, हरकुल येथील परब/राणेवाडी तसेच सौंदाळे गावठाण (ता.देवगड) येथील जिल्हा परिषद शाळेजवळील रस्त्यातील ओहोळावर असलेले पुल अत्यंत जिर्ण झाले असून वाहतुकीस धोकादायक बनले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गावरुन अन्य वाहतुकीबरोबर शालेय विद्यार्थी ये-जा करीत असल्याने त्यांच्या जिवितास धोका असून उक्त पुलांचे काम तात्काळ हाती घेण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे सातत्याने मागणी करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुलाचे काम तात्काळ हाती घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्य मार्ग क्र. १८१ हरकुळ खुर्द मोहुळ तेलीवाडी टेंबवाडी या ग्रामीण मार्ग क्र. १५० या रस्त्यावरील सा.क्र. ३/५०० मध्ये परब/राणेवाडी जवळ कॉजवे असून पावसाळ्यामध्ये अतिवृष्टीमुळे या कॉजवेवरुन पाणी गेल्याने काही वेळ वाहतूक बंद राहते. सदर रस्त्यावर बारमाही एस.टी. वाहतूक सुरु आहे.

तसेच सौंदाळे गावठाण येथील जिल्हा परिषद शाळेजवळील रस्त्यावरील ओहोळावर असलेल्या साकवाच्या स्लॅबच्या तळाकडील भागामधील अंतर्गत सळई उघडी पडून गंजल्याचे निदर्शनास आल्याने सदर साकवाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हा परिषदेने शासनाकडून प्राप्त निधी अखर्चित ठेवल्याबाबत

**(२७) * ४४४७७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेला सन २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षाकरीता शासनाकडून एकूण २४३ कोटी ३९ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने जून अखेरपर्यंत केवळ २१ कोटी ९१ लाख रुपयांचा निधी खर्च केला असून प्राप्त निधीपैकी केवळ ९ टक्केच निधी खर्च झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी अखर्चित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) वित्त विभागाचा दिनांक ६ जून, २०१८ चा शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय नुसार परवानगी प्राप्त असलेला निधी माहे मार्च, २०१९ पर्यंत खर्च करण्यात परवानगी असल्याने कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## अरुणावती धरण (ता.दिग्रस, जि.यवतमाळ) पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्याबाबत

**(२८) * ४५१६१ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरुणावती धरण (ता.दिग्रस, जि.यवतमाळ) पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धरणात बोटींची व्यवस्था केल्यास महसूल वाढवण्यास तसेच नजीकच्या गावांमध्ये प्रवास करणे नागरिकांना सोयीस्कर होवून तुटलेल्या गावांचा संपर्क पूर्ववत करता येणार असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अरुणावती धरणाचा पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) अशाप्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) अरुणावती धरणात बोटीची व्यवस्था नाही. अरुणावती धरणामुळे बाधित पुनर्वसित गावांमध्ये जाण्याकरीता रस्ते बांधण्यात आले असून तालुक्याला जोडण्यात आले आहेत.

(३) यवतमाळ जिल्हयाच्या पर्यटन विकास बृहद् आराखड्यामध्ये अरुणावती धरण येथील विकास कामांचा समावेश करण्यात आलेला असून, सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माजरे कोंढर चिवेली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील रस्त्याच्या कामाबाबत

**(२९) * ४३९९३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ४३१५० ला दिनांक १२ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोंढर चिवेली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या १०.२० कि.मी. लांबीच्या रस्त्याला शासन निर्णय, दिनांक ०८/०२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देऊन ६६४.१६ लक्ष इतकी रक्कम प्रदान करण्यात आली असून उक्त कामास सुरुवात झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णय, दिनांक ८/२/२०१८ च्या अनुषंगाने उपरोक्त रस्त्याचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, तसेच, हे काम किती कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर रस्त्याच्या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ११/१०/२०१८ रोजी देण्यात आला आहे. सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर असून काम पूर्ण करण्याचा कालावधी ९ महिने आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) उपजिल्हा रुग्णालयातील बाल उपचार केंद्रात सोई सुविधांचा तसेच बालरोग तज्ञाचा अभाव असल्याबाबत

**(३०) * ४४९५५ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) उपजिल्हा रुग्णालयातील बाल उपचार केंद्रात अपुऱ्या सुविधा व खाटा तसेच बालरोग तज्ञ उपलब्ध नसून गरीब आदिवासी बालकांवर जमिनीवरच उपचार करावे लागत असल्याचे दिनांक २ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बाल उपचार केंद्रात बालरोग तज्ञांची नियुक्ती व खाटांची संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय, शहापूर येथे बाल उपचार केंद्राकरीता मानकांप्रमाणे २० खाटा कार्यान्वित आहेत.

दिनांक २/९/२०१८ रोजी १३ बालरुग्ण, ०३ कुपोषित बालके आणि बालरोग शस्त्रक्रिया शिबीराकरीता १२ बालके अशी एकूण २८ बालके बाल उपचार केंद्राच्या कक्षात दाखल झालेली होती.

काही बाल रुग्णांसाठी खाटा कमी पडल्यामुळे तातडीची बाब म्हणून व अपवादात्मक परिस्थितीत सदर बाल रुग्णांची स्वतंत्रपणे गादी टाकून व्यवस्था करण्यात आली होती.

सदर रुग्णालयामध्ये बालरोग तज्ञचे नियमित पद रिक्त असल्यामुळे इंडियन पेडियाट्रीक असोसिएशनच्या बालरोग तज्ञांना दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी आणि दर महिन्याच्या ११ तारखेला बालकांची तपासणी व बालकांवर विविध शस्त्रक्रिया करण्याकरीता बोलाविण्यात येते.

(२) सदर बाल उपचार केंद्रात मानकांप्रमाणे २० खाटा कार्यान्वित आहेत. तसेच बाहययंत्रणेव्दारे बालरोगतज्ञ भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु बालरोगतज्ञ उपलब्ध झाले नाहीत. बालरोग तज्ञाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या शाळांमधील गैरव्यवहाराबाबत

**(३१) * ४५१४४ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २० लाख विद्यार्थी शिकत असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या ९७० आश्रम शाळांमध्ये होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत चौकशीचे आदेश इतर मागास प्रवर्ग विभागाचे मा.मंत्री यांनी माहे जुलै, २०१८ च्या अधिवेशनात दिले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालाच्या अनुषंगाने दोषी ठरलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) व (३) सदरहू चौकशी अहवाल शासनास नुकताच प्राप्त झाला असून सदर अहवालावर योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## कोंडमाळा (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(३२) * ४५०९६ श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंडमाळा (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील १९० पटसंख्या असलेल्या शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्यामुळे विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून शिक्षण घ्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या शाळा बंद होण्याच्या अनेक कारणांपैकी शाळा मोडकळीस येणे हे देखील एक महत्वाचे कारण असून गत काही वर्षापासून शाळांची दुरुस्ती करण्यास टाळाटाळ केल्याने अनेक शाळा बंद अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत कोंडमाळा शाळेच्या सहा वर्ग खोल्यांमध्ये जास्त विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागत असल्याने त्यांच्या शिक्षणावरही परिमाण होत आहे, तसेच सावर्डे बीटमध्ये पटसंख्येने व वर्ग खोल्यांनी सर्वात मोठी शाळा म्हणून सदर शाळेकडे पाहिले जात असून या शाळेला महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने मोठी प्रयोगशाळाही दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत दोन वर्षापासून शाळा दुरुस्तीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठवून व सतत पाठपुरावा करूनही शाळा दुरुस्तीबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त शाळेच्या दुरुस्तीचे काम विनाविलंब हाती घेवून पूर्ण करण्याचेदृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) प्रयोग शाळा दिली आहे, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

निर्लेखन मागणी प्रस्तावानुसार चार वर्ग खोल्यांचे निर्लेखन मंजूर करण्यात आले आहे.

(५) मंजूर निर्लेखन तीन नवीन वर्ग खोल्या मंजूर करण्यात आल्या आहेत.

-----------------

## अकृषी विद्यापीठातील कक्ष अधिकारी संवर्गास सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(३३) * ४४१३२ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालयातील कक्ष अधिकारी संवर्गास वित्त विभागाच्या दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिनांक १ जानेवारी, २००६ पासून रुपये ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रुपये ४८०० आणि चार वर्षाच्या नियमित सेवेनंतर १५६००-१९१०० अधिक ग्रेड वेतन रुपये ५४०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच विधी व न्याय विभागाच्या दिनांक १० मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार उच्च न्यायालयातील कक्ष अधिकारी संवर्गास देखील हीच सुधारित वेतनश्रेणी लागू केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याच धर्तीवर अकृषी विद्यापीठातील कक्ष अधिकारी संवर्गास देखील रुपये ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रुपये ४८०० आणि चार वर्षाच्या नियमित सेवेनंतर रुपये १५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन रुपये ५४०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी विविध विद्यापीठे, संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने मंत्रालयातील आणि उच्च न्यायालयातील कक्ष अधिकारी संवर्गास लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी अकृषी विद्यापीठातील कक्ष अधिकारी संवर्गास लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) अकृषी विद्यापीठातील कक्ष अधिकारी संवर्गास दिनांक ०१/०१/२००६ रोजीपासून रुपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रुपये ४८०० आणि चार वर्षांच्या नियमित सेवेनंतर रुपये १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रुपये ५४०० ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचे निवेदन राज्य वेतन सुधारणा समितीकडे प्राप्त झाले आहे. समितीचे काम प्रगतीपथावर असून समिती आपला अहवाल शासनास सादर करणार आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर समितीच्या शिफारशीनुसार पात्र कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत शासनस्तरावर उचित निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर येथील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अपहार झाल्याबाबत

**(३४) * ४४६७२ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ४२२०४ ला दिनांक १९ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकूण ९२१ प्रकरणांमध्ये रुपये १०,८९,१६,२१२.९६/- इतक्या रकमेचा अपहार झाला असल्याची बाब स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाने केलेल्या लेखापरिक्षणातून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरी स्थानिक संस्थांशी संबंधित ७७ प्रकरणांसंदर्भात नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना नगरविकास विभागामार्फत निदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अपहारित रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाने केलेल्या लेखापरिक्षण अहवालानुसार एकूण ९२१ प्रकरणांपैकी ८४४ प्रकरणे जिल्हा परिषद विभागाशी व ७७ प्रकरणे नगरपालिका विभागाशी संबंधित आहेत.

(२) हे ही खरे आहे.

(३) उपरोक्त अपहार प्रकरणी जिल्हा परिषदेकडून चौकशी करुन, निलंबन, कोर्ट केस/पोलीस केस, बडतर्फ, सक्तीने सेवानिवृत्त, मूळ वेतनावर आणणे, वेतनवाढी बंद करणे, कोर्टातर्फे शिक्षा, सेवानिवृत्त वेतनातून कपातची कारवाई करण्यात आली आहे. तसेच नगरपालिकांशी संबंधित प्रकरणांबाबत अपहारीत रक्कम वसुल करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाचोरा (जि.जळगांव) येथे ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी रुग्णांना खाजगी रुग्णालयात पाठवित असल्याबाबत

**(३५) * ४५०२३ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगांव) येथे ग्रामीण रुग्णालयात दाखल केलेली गर्भवती स्त्री नैसर्गिकरीत्या प्रसूती होत असताना आर्थिक लाभासाठी तिला खाजगी रुग्णालयात पाठविल्याचा प्रकार माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी खाजगी रुग्णालयाकडून संदर्भ फी घेत असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यानंतरही जिल्हा वैद्‌यकीय अधीक्षक यांच्याकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला शहरातील स्त्री रुग्णालयात खाटांची व्यवस्था करण्याबाबत

**(३६) * ४४३९१ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ४०३५१ ला दिनांक २० मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील अत्यंत जुन्या अशा स्त्री रुग्णालयात सद्य:स्थितीत फक्त ३०० खाटांची व्यवस्था असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोट, तेल्हारा, मूर्तिजापूर, पातुर व बाळापूर येथे स्त्री रुग्णालयाची व्यवस्था नसल्यामुळे बहुतांश स्त्री रुग्ण अकोला स्त्री रुग्णालयात उपचाराकरीता येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला जिल्ह्यातील अकोट येथे १०० खाटांचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच अकोला शहरातील स्त्री रुग्णालयातील खाटांची संख्या ३०० वरुन ५०० करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रस्तावावर केव्हापर्यंत अंमलबजावणी होणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

अकोला जिल्ह्यातील अकोट, तेल्हारा, मुर्तिजापूर, पातुर व बाळापूर येथील सर्व स्त्री रुग्णांवर तालुकास्तरावरील रुग्णालयात उपचार करण्यात येतात. तालुकास्तरावर स्त्री रूग्णांना विशेषोपचार लागल्यास त्यांना जिल्हा

स्त्री रुग्णालय अकोला किंवा वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे संदर्भित करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय अकोट चे श्रेणीवर्धन ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात करण्यास दिनांक १७/०१/२०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

(४) हे खरे आहे.

अकोला येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाचे ३०० खाटांवरुन ५०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्यास दिनांक २२/०३/२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे व त्याबाबतचे बांधकाम प्रगतीपथावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील सिध्दार्थ प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांच्या देखभालीबाबत

**(३७) * ४४६६२ श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात सिध्दार्थ प्राणिसंग्रहालयातील पाच हरणांचा मागील चार महिन्यांमध्ये मृत्यू झाला असून “सचिन” हा १५ वर्षाचा पांढरा वाघ गंभीर आजारी असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्राण्यांची महानगरपालिकेच्या डॉक्टरांकडून योग्यप्रकारे देखभाल केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राण्यांची देखभाल न करणाऱ्या संबंधित डॉक्टरांवर तसेच अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) सिध्दार्थ प्राणिसंग्रहालय, औरंगाबाद येथे चार महिन्यामध्ये काळवीट-२ व निलगाय-१ असे ३ वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला आहे. तसेच सचिन हा १५ वर्षीय पांढरा वाघ आजारी असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे धुमका (ता.जि.वाशिम) येथील कालव्याकरीता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(३८) * ४४८१२ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धुमका (ता.जि.वाशिम) येथील ल.पा. योजनेंतर्गत धुमका लघु पाटबंधारे योजनेतील धरणाचे उजव्या मुख्य कालव्याकरीता सन २००३-०४ पासून जमीन संपादित केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीचा मोबदला, भूभाडे, व्याज व पिकांची नुकसान भरपाई संबंधित शेतकऱ्यांना व नागरिकांना देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००३-०४ पासून मोबदला भूभाडे, व्याज व नुकसान भरपाई न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जमिनीचा मोबदला व नुकसान भरपाई न देणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

(२) धुमका लघु पाटबंधारे योजनेच्या उजव्या मुख्य कालव्यासाठी मौजे धुमका, मौजे कापसी व मौजे उकळीपेन येथील जमीन संपादित करावी लागते. यापैकी मौजे धुमका व मौजे कापसी येथील शेतकऱ्यांना भूसंपादन कायद्यानुसार जमिनीचा मोबदला प्रदान करण्यात आला आहे.

मौजे उकळीपेन येथील शेतकऱ्यांना भूसंपादन कायद्यानुसार जमिनीचा मोबदला देण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रकरणात उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, वाशिम यांचे मागणीप्रमाणे रुपये ३७,१६,०४५/- एवढ्या ५०% अग्रिम रक्कमेचा भरणा दिनांक १०/०४/२०१८ रोजी धनादेशाद्वारे करण्यात आला आहे.

(३) उपरोक्त मौजे उकळीपेन येथील उजव्या कालव्यासाठी बाधित ६.२१ हे. जमिनीचा मोबदला कास्तकारांना प्रदान करणेस्तव भूसंपादन प्रस्ताव तयार करुन दिनांक २३/१२/२००३ रोजी जिल्हाधिकारी, वाशिम यांचेकडे सादर करण्यात आला होता. तथापि, दरम्यानचे कालावधीत सदर प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नस्तीबध्द करण्यात आल्याने मोबदला देणे प्रलंबित होते.

सदर प्रस्ताव दिनांक ०३/०५/२०१६ रोजी नव्याने सादर करण्यात आला असून महसूल विभागामार्फत भूसंपादनाबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाढती भ्रुणहत्या रोखण्याबाबत

**(३९) * ४४३४७ श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाढत्या भ्रूणहत्यांना रोखण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्यानुसार अल्ट्रासाऊंड सोनोग्राफी करण्याचा अधिकार यापूर्वी केवळ रेडिओलॉजीमध्ये प्राविण्य मिळविलेल्या डॉक्टरांना होता सद्य:स्थितीत हा निर्णय शिथिल करुन अन्य शाखांतील वैद्यकीय तज्ञांनी सहा महिन्यांचे रेडिओलॉजीचे प्रशिक्षण घेतल्यास सोनोग्राफी करण्याची मुभा देण्याचा विचार केंद्र शासन करीत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्ट्रासाऊंड सोनोग्राफी हे रेडिओलॉजीमधील वैशिष्टयपूर्ण तंत्रज्ञान त्याचा वापर रेडीओलॉजीमध्ये प्राविण्य मिळविलेल्या डॉक्टरांना करण्याचे अधिकार भारतीय वैद्यकीय परिषदेने दिले आहेत, परंतु केंद्र शासनाच्या नवीन प्रस्तावित निर्णयाचा गैरवापर होण्याची शक्यता लक्षात घेता राज्य शासनाने याबाबत केंद्र शासनास सूचित करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

सद्य:स्थितीत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ मार्च, २०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार अल्ट्रासाऊंड सोनोग्राफी करणाऱ्या एम.बी.बी.एस. डॉक्टरांनी सहा महिन्यांचे सोनोग्राफी प्रशिक्षण घेणे व कॉम्पीटन्सी परीक्षा देणे अत्यावश्यक असून त्यानुसार राज्यामध्ये अंमलबजावणी सुरु आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुलुंड, मुंबई येथील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांनी औषध घोटाळा केल्याबाबत

**(४०) * ४५२५७ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलुंड, मुंबई येथील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.गणेश जाधव यांनी औषधपत्रिकेवर खाडाखोड करुन जादा औषधे दाखवून औषध घोटाळा केल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औषधपत्रिकेवर खाडाखोड करुन वाढीव औषधे परस्पर बाहेर नेऊन काही खाजगी डॉक्टर अथवा मेडिकल दुकानांना विकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी आढळून आलेल्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

राकावियो रूग्णालय मुलुंड येथे दिनांक ०१/०१/२०११ ते दिनांक ३०/०९/२०१७ या कालावधीत सुमारे साडे तीन लाख विमा रूग्णांच्या prescriptions वर खाडाखोड करून डोस वाढवून सुमारे १ कोटी ६२ लाख रुपये इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे व त्याची पोलीस विभागामार्फत चौकशी सुरू आहे. डॉ.गणेश जाधव हे राकावियो रूग्णालय मुलुंड येथे दिनांक २३/०७/२०१८ रोजी रूजू झाले असून त्यापूर्वी ते या रूग्णालयात कार्यरत नसल्याने याविषयी त्यांचा प्रत्यक्ष संबंध नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

सदर रूग्णालयाच्या विमा रूग्णांच्या prescriptions वर खाडाखोड करून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक १७/११/२०१७ रोजी त्रिसदस्यीय समिती गठीत करून सदर गैरव्यवहाराची प्राथमिक चौकशी करण्यात आली असून त्यानुषंगाने सदर रूग्णालयातील ०९ मिश्रक व ०२ निवासी वैद्यकीय अधिकारी अशा एकूण ११ कर्मचाऱ्यांविरूध्द दिनांक ११/०८/२०१८ रोजी पोलीस स्टेशन मुलुंड येथे भादंवि कलम ४६५, ४६८, ४७१, ४२० व ३४ खाली FIR No. ३०६/२०१८ दाखल करण्यात आला आहे. FIR च्या अनुषंगाने पोलीस स्टेशनमार्फत पुढील कार्यवाही सुरू असून सदर वाढीव औषधे परस्पर बाहेर खाजगी डॉक्टर अथवा मेडिकल दुकानांना विकण्यात आले किंवा कसे ? ही बाब FIR चा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच स्पष्ट होईल.
(३) होय, सदर प्रकरणाबाबत प्राथमिक चौकशी करण्यात आली असून FIR च्या अनुषंगाने पोलीस स्टेशन मुलुंड मार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत सदर ०९ मिश्रकांपैकी ०८ मिश्रक व ०२ निवासी वैद्यकीय अधिकारीपैकी ०१ निवासी वैद्यकीय अधिकारी सेवानिवृत्त झाले असून कार्यरत ०१ मिश्रक व ०१ निवासी वैद्यकीय अधिकारी या दोघांना निलंबन करण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित आहे. तसेच संबंधित सर्व ११ कर्मचाऱ्यांकडून वसूलीची कार्यवाही करण्यात येत असून सदर सर्व ११ कर्मचाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्याबाबत राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांचेकडून प्रस्तावित करण्यात आले आहे.
(४) FIR दाखल केला असल्याने व FIR अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याने विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हा परिषद कृषी विभागात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४१) * ४५३०२ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हा परिषद कृषी विभागात गत २० वर्षापासून अतिरिक्त कारभाराच्या नावाखाली नियमबाह्यरित्या तीन कर्मचारी काम करत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तीन कर्मचारी पशुसेवा करणारे असूनही उक्त विभागात एकाच टेबलावर काम करीत असल्यामुळे सदर ठिकाणी गैरव्यवहारात वाढ झाली असून या तीन कर्मचाऱ्यांनी इंजेक्शन गैरव्यवहार केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना कार्यमुक्त न केल्याबाबत

**(४२) * ४४०६१ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग श्री.मोहोड यांची दीड वर्षापूर्वी भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथे गटविकास अधिकारी म्हणून बदली केल्याचे शासनाच्या आदेशानंतरही श्री.मोहोड यांना कार्यमुक्त करण्यात न आल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, दीपक सिंगला व विद्‌यमान मुख्य कार्यकारी अधिकारी, जजल शर्मा यांनी श्री.मोहोड यांची बदली होऊन सुध्दा त्यांना कार्यमुक्त केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने श्री.मोहोड यांची त्वरित बदली करुन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्या दिनांक ०१/११/२०१८ च्या आदेशान्वये श्री.अरुण मोहोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) यांना दिनांक ०५/११/२०१८ रोजी कार्यमुक्त करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) यवतमाळ जिल्हा परिषदेमधील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) ही दोन पदे रिक्त असल्यामुळे श्री.मोहोड यांच्याकडे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविण्यात आलेला होता. तसेच, श्री.मोहोड यांच्या ठिकाणी पदस्थापना

दिलेला अधिकारी रुजू न झाल्यामुळे त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी कार्यमुक्त केले नव्हते. श्री.मोहोड यांना दिनांक ०१/११/२०१८ च्या आदेशान्वये दिनांक ०५/११/२०१८ पासून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) या पदावरुन कार्यमुक्त करण्यात आले आहे.

-----------------

## नंदुरबार शहरात एन.यु.एच.एम. योजनेंतर्गत रुग्णालये त्वरीत सुरु करण्याबाबत

**(४३) * ४५३७९ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार शहरात शासनाच्यावतीने एन.यु.एच.एम. योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात निधी खर्च करुन रुग्णालये तयार झालेली असताना ती सुरु करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रुग्णालये सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.दीपक सावंत :** (१) नाही.
(२) व (३) नंदुरबार शहरात एन.यु.एच.एम. अंतर्गत बांधण्यात आलेली दोन्ही आरोग्य केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत.

-----------------

## राज्यात एचआयव्ही रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याबाबत

**(४४) * ४४८९६ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८०१२ ला दिनांक २० मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एचआयव्ही रुग्णांचे प्रमाण जास्त असून सन २०१७-१८ च्या आकडेवारीनुसार २८,०३० रुग्ण असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात एचआयव्ही रुग्णांच्या संख्येत वाढ होणे ही गंभीर बाब असून शासनाने एचआयव्हीचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१७-१८ मध्ये राज्यात २७,९६३ इतके रुग्ण निदर्शनास आले आहेत.

(२) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेमार्फत दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार विविध उपक्रम राबविल्याने महाराष्ट्र राज्यात एच.आय.व्ही. संसर्गाच्या प्रमाणाची टक्केवारी गेल्या ३ वर्षापासून कमी होत आहे. शासनाच्या “Treat All Policy” अंतर्गत सर्व संसर्गीत एच.आय.व्ही. रुग्णांना तातडीने एआरटी औषध सुरु करण्यात येते.

१) सर्व गर्भवती महिलांचे समुपदेशन करुन रक्त तपासणी केली जाते.

२) संसर्गीत गरोदर महिलांना तसेच संसर्गीत नवजात बालकांना एआरटी औषध दिले जाते.

३) राज्यातील ३४ जिल्हयांत एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्रे कार्यरत असून पीपीटीसीटी उपक्रम राबविला जात आहे. एआरटी औषधांमुळे भविष्यात संसर्गीत व्यक्तींमध्ये संधीसाधू आजारांचे प्रमाण कमी करुन मृत्यूचे प्रमाण देखील कमी करणे शक्य आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माहूर तालुक्यात (जि.नांदेड) बंधाऱ्याची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(४५) * ४४९८२ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर तालुक्यात (जि.नांदेड) लघु पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) यांच्यामार्फत बांधण्यात आलेले बंधारे हे निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहूर तालुक्यातील मच्छिंद्र पार्डी येथील बंधारा हा निकृष्ट दर्जाचा बांधला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

माहुर तालुक्यातील मौजे मच्छिंद्र पार्डी येथे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत ३ सिमेंट बंधारे बांधण्यात आले असून तिन्ही बंधारे चांगल्या दर्जाचे आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सेनगांव (जि.हिंगोली) येथील जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(४६) * ४४६१५ श्री.विप्लव बाजोरिया, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगांव (जि.हिंगोली) येथील ५ कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात येत असलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या दुमजली इमारतीचे काम संथगतीने सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीचे काम प्रलंबित असल्याने १३३ गावच्या गरिब विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असल्याने पालकांमध्ये नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, पानकनेर (ता.सेनगाव) गावातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेच्या इमारतीची अत्यंत दुरवस्था झाल्याने शाळेत शिकत असलेल्या ६०० विद्यार्थ्यांना पावसाळयामध्ये पाण्यात बसावे लागत असल्याने त्यांची संख्या कमी होत चालली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त शाळेच्या इमारतीचे काम पूर्ण करुन दुरुस्ती करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय हे अंशत: खरे आहे.

सदर माध्यमिक शाळेच्या बांधकामास रुपये ४४६.६५ लक्ष किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिनांक १९/०६/२०१५ रोजी प्रदान करण्यात आली.

सदर बांधकामास तांत्रिक मान्यता दिनांक १०/०२/२०१६ रोजी रुपये ३२४.०० लक्ष किंमतीस प्रदान करण्यात आली. त्यानुसार निवादा प्रक्रिया पूर्ण करुन कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक २३/१२/२०१६ रोजी रुपये ३२४.०० लक्ष किंमतीस ६.६७ % कमी दराने २४ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

पानकनेर गावातील माध्यमिक शाळा बांधकामाकरीता जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर केला आहे.

सदरहू माध्यमिक शाळेतील विद्यार्थी पटसंख्या ४५१ इतकी आहे.

इंग्रजी माध्यमाकडे शिक्षणाचा वाढलेला कल तसेच शहरी भागात पालकाचे स्थंलातरण होणे यामुळे विद्यार्थी संख्येत घट झालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम वन विभागातील वनक्षेत्रपाल यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(४७) * ४५३१९ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४३५५१ ला दिनांक १९ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम वन विभागातील वनक्षेत्रपाल श्री.नांदुरकर यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत मुद्देनिहाय चौकशी करण्याकरीता वन विभागाने एफ.एस.टी.०६/१७प्र.क्र.३३४/फ-४ दिनांक २०/०६/२०१७ व दिनांक ११/०१/२०१८ नुसार झालेल्या तक्रारीबाबत अहवाल मागितला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनक्षेत्रपालांवर कारवाई करण्यासाठी श्री.वसंतराव घावडे यांनी दिनांक १२ मार्च, २०१८ रोजी आत्मदहनाची नोटीस दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने श्री.नांदुरकर यांची चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) महिला वनरक्षकाशी गैरकृत्य केल्याच्या तक्रारीबाबत महिला अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. सदर प्रकरणात श्री.नांदुरकर, वनक्षेत्रपाल (प्रा.), वाशिम हे दोषी नसल्याचे आढळून आले आहे.

तथापि, जलतनाच्या ट्रक वाहतुकीचे प्रकरण योग्य प्रकारे न हाताळणे व अधिनस्त कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन न करणे इत्यादी बाबत श्री.नांदुरकर, वनक्षेत्रपाल व अन्य संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अंतर्गत दोषारोप पत्र बजावण्यात आले असून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

-----------------

## सॅनिटरी नॅपकीन संदर्भात अस्मिता योजनेबाबत

**(४८) * ४४७७८ श्री.अनिकेत तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सॅनिटरी नॅपकीन संदर्भात अस्मिता योजना सुरु केली असून ती प्रभावीपणे राबविता येत नसून महिलांकडून सुध्दा या योजनेला अत्यल्प प्रतिसाद मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला बचत गटामार्फत सदर योजना राबविण्यात येत असून या योजनेसाठी तयार करण्यात आलेल्या ऑनलाईन लॉगिनसाठी अनेक ठिकाणी इंटरनेट सुविधा नसल्यामुळे तसेच मोबाईल नेट चालत नसल्याने या योजनेचा वापर होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही. हे खरे नाही.

योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून महिलांकडून या योजनेस चांगला प्रतिसाद मिळत आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## करवाडी (जि.हिंगोली) गावातील रस्ते दुरुस्त करण्याबाबत

**(४९) * ४५४७८ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करवाडी (जि.हिंगोली) गावातील पांडुरंग कऱ्हाळे यांच्या अडीच वर्षाच्या मुलीची प्रकृती बरी नसल्यामुळे तिला रुग्णालयात घेऊन जाण्याकरीता वाहन नसल्याने व रस्ते अतिशय खराब असल्याने सहा किलोमीटरवरील नांदापूर आरोग्य रुग्णालयात पायी चालत जावे लागल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून राज्यातील अनेक ग्रामीण भागात रस्त्या अभावी सर्वसामान्याची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर गावात रस्ते बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) करवाडी वस्तीस दोन रस्ते असून सदर रस्ते योजनाबाह्य आहेत.

अ) हारवाडी ते करवाडी असा २.६०० कि.मी. लांबीचा रस्ता असून सदर लांबीपैकी सा.क्र. ०/०० ते २/२०० कि.मी. पर्यंत आदिवासी उपयोजनेंतर्गत काम करण्यात आले आहे. सा.क्र. २/२०० ते २/४०० कि.मी. पांदण आहे व सा.क्र. २/४०० ते २/६०० गायरान आहे.

आ) नांदापूर ते करवाडी रस्त्याची लांबी ३.२०० कि.मी. आहे सदरचा संपूर्ण रस्ता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून करण्याचे प्रस्तावित असून एकूण लांबीपैकी पहिल्या १ कि.मी. अंतराच्या रस्त्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

सदरचे रस्ते योजनाबाह्य असल्याने शासनाच्या योजनेमधून सदरच्या रस्त्यासाठी निधी उपलब्ध करुन देता येत नाही. त्यामुळे सदर दोन्ही रस्त्यांचा समावेश रस्ते विकास आराखड्यामध्ये करण्यासाठी जिल्हा परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत लोकप्रतिनिधींनी सदरचे काम स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सूचविल्यास सदरचे काम करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(५०) * ४५५६४ श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील लिंगदरी व गोंडाळा सेनगाव ते आजेगाव व फाळेगाव येलदरी या रस्त्यांची माहे जुलै-ऑगस्ट, २०१८ मध्ये झालेल्या पावसामुळे दुरवस्था झाली असून सेनगाव शहरासह अनेक गावांतील रस्त्यामध्ये खड्डे पडून रस्ते चिखलमय झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील रस्त्यांवर साचलेला चिखलमय गाळ काढण्याबाबत ग्रामस्थानी शासनाकडे मागणी करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, तालुक्यातील सवना पुलाचे बांधकाम गत ५ वर्षापासून संथगतीने सुरु असून ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्यांची दुरुस्ती व सवना पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

रा.मा. २१४ ते लिंगदरी गोंडाळा जामदया या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सवना पुलाचे बांधकाम भौतिकदृष्ट्या पूर्ण झाले आहे.

सेनगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली हे अंशत: खरे असून रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी विशेष दुरुस्ती कार्यक्रम व जिल्हा नियोजन रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत निधी उपलब्धतेनुसार रस्ते दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्हयातील कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाला भरीव निधी मिळण्याबाबत

**(५१) * ४५८५८ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील महत्वाकांक्षी असलेल्या कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाला भरीव निधी मिळण्यासाठी त्याचा नाबार्ड अंतर्गत पॅकेजमध्ये समावेश करण्याचा निर्णय जलसंपदा विभागाच्या दिनांक ४ सप्टेंबर २०१८ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महत्वकांक्षी निर्णयाची अंमलबजावणी करुन उस्मानाबाद जिल्हयातील जमीन व प्रत्यक्ष निश्चित केलेली जमीन ओलीताखाली येण्यासाठी साधारणत: किती अवधी लागणार आहे तसेच या प्रकल्पातून किती कालावधीत हे पाणी उपलब्ध होऊ शकेल,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाचा नाबार्डच्या रुपये १०,००० कोटीच्या पॅकेजमध्ये समावेश करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मा.मंत्री, जलसंपदा यांनी दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत दिले आहेत.

(२) नाबार्ड अंतर्गत उपसा सिंचन योजना क्र. १ व्दारे ४९३५ हेक्टर व उपसा सिंचन योजना क्र. २ व्दारे २२३० हेक्टर अशी एकूण ७१६५ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मितीसाठी रुपये २२२९.५६ कोटी अर्थसहाय्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी पत्र दिनांक १८/०८/२०१८ अन्वये मुख्य अभियंता, नागपूर यांना सादर करण्यात आला असून त्यासाठी तीन वर्षाचे नियोजन सादर करण्यात आले आहे.

निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यात येऊन पाणीसाठा निर्मिती साध्य करता येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(५२) * ४६०९९ श्री.रमेश पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यात जिल्हा परिषद बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागांकडून कोने-तुसे रस्ता, तुसे-कोयना वसाहत रस्ता, मोहोट्याचा पाडा-उसर रस्ता, मेट-घोणसई व तानसा फार्म रस्ता या रस्त्यांची कामे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली असून सदरहू रस्त्यांच्या निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे रस्त्यांवर खड्डे पडून रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे दिनांक २९ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांच्या कामाची चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरीकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करुन रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्नांकित कोने-तुसे व तुसे-कोयना वसाहत हा एकच रस्ता असून तो इतर जिल्हा मार्ग क्र. ९१ असा आहे. या रस्त्याची एकूण लांबी ११.०० कि.मी. आहे. त्यापैकी सा.क्र. ०/३०० ते ००/७०० व ३/५०० ते ४/२६५ या लांबीचे खडीकरण व डांबरीकरण लेखाशीर्ष ५०५४ अंतर्गत मे, २०१८ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

मेट घोणसई व तानसा फार्म हा इतर जिल्हा मार्ग क्र. ९५ असून या रस्त्याची एकूण लांबी ८.५० कि.मी. आहे. त्यापैकी सा.क्र. ०/०० ते ०/४५०, ६/०० ते ६/१२६ व ६/२५२ ते ६/५३२ या लांबीचे खडीकरण व डांबरीकरण लेखाशीर्ष ५०५४ अंतर्गत मे, २०१८ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे, अवजड वाहतुकीमुळे, तसेच लोखंडी रिंग असलेल्या ट्रॅक्टरच्या वाहतुकीमुळे सदर रस्त्यांवर काही ठिकाणी खड्डे पडले आहेत. पावसाळ्याचा कालावधी हा निरीक्षण कालावधी असल्याने तसेच रस्ता सुस्थितीत केल्यानंतरच ठेकेदारास देयक अदा करण्यात येणार आहे.

तसेच मोहोट्याचापाडा-उसर या इतर जिल्हा मार्ग क्र. ९५ या रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर आहे. सदर कामास अद्याप सुरुवात केलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ अद्यावत करण्याबाबत

**(५३) * ४६२६७ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सर्वच कामांमध्ये डिजिटायझेशनवर भर दिलेला असताना उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ मागील दोन ते अडीच वर्षापासून अद्यावत झाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या (झेडपी) शाळा, अंगणवाड्या डिजिटल करण्यात येत असताना जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ अद्यावत करण्यास वेळ लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

या पुर्वीचे संकेतस्थळ अधिकृत नसल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर शासनाच्या gov.in या डोमेनवर अधिकृत संकेतस्थळ करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) काही तांत्रिक कारणांमुळे उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ अद्ययावत करण्यास वेळ लागला असून त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

I. संकेतस्थळ विकसित करणे तसेच Maharashtra.gov.in या डोमेन अंतर्गत नोंदणी तसेच होस्टींग करण्यासाठी तांत्रिक अडचणीमुळे विलंब झाला.

II. संकेतस्थळाचे Security Audit करण्याच्या प्रक्रियेतील तांत्रिक अडचणीमुळे विलंब झाला.

III. Virtual Private Network व स्टेट डाटा सेंटरकडे सादर करण्याच्या तांत्रिक अडचणीमुळे विलंब झाला.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यामध्ये पाणीपुरवठा करण्याबाबत

**(५४) * ४६३३४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यामध्ये यावर्षी फक्त ३० टक्केच पाणी शिल्लक असून ते पुढील साडेआठ महिने पुरवावे लागणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासंदर्भात निर्णय घेण्यास शासनस्तरावरुन विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, दुष्काळग्रस्त मराठवाड्याच्या हक्काचे पाणी जायकवाडी धरणात सोडावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाड्याच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) मराठवाडा विभागात दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी २९.७३ टक्के उपयुक्त पाणीसाठा होता. तसेच जायकवाडी धरणामध्ये ३६.६३ टक्के उपयुक्त पाणीसाठा होता. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम-२००५ अंतर्गत अनुच्छेद ११(ग) मधील समन्यायी पाणी वाटपाच्या तत्वानुसार तसेच जनहित याचिका क्र. १७३/२०१३ संदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २३/०९/२०१६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार जायकवाडी धरणात उर्ध्व भागातील धरणामधुन ८.९९ T.M.C पाणी सोडण्याचे आदेश कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक २३/१०/२०१८ रोजी निर्गमित केले. त्यानंतर याप्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल याचिका क्र. IA १५३२८७/२०१८ मधील दिनांक ३१/१०/२०१८ रोजीच्या आदेशानुसार दिनांक ०१/११/२०१८ पासून पाणी सोडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे विलंब झालेला नाही.

(२) जायकवाडी धरणाकरीता पाणी सोडण्याची कार्यवाही करणेसाठी निर्धारित कालावधीत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा पाणी आरक्षण समिति व कालवा सल्लागार समिती यांचेकडून पाण्याचे योग्य ते नियोजन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी आरोग्य अहवालातील शिफारशींनुसार उपाययोजना करण्याबाबत

**(५५) * ४५२३० डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विक्रम काळे, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी आरोग्याचा अहवाल जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधत डॉ.अभय बंग यांच्या नेतृत्वाखालील समितीने दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास सादर केला असून सदरील अहवालात आदिवासी हे बालमृत्यू, कुपोषण, मातेचे आरोग्य, मलेरिया, क्षयरोग, संसर्गजन्य रोग, मानसिक आरोग्य आणि व्यसन अशा तिहेरी तणावाखाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी समितीने आदिवासी आरोग्यासाठीचे बजेट आणि खर्च वाढविण्याबाबत तसेच आरोग्य मित्र नेमणे, पारंपारिक उपचार पध्दती उपयोगात आणणे, व्दितीय आणि तृतीयस्तराच्या आरोग्यसेवेसाठी आर्थिक संरक्षण देणे व इतर शिफारशी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीने सूचविलेल्या शिफारशींबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) सदरहू समितीने केलेल्या शिफारशीनुसार खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

१. आदिवासी भागात मलेरिया आजाराचे नियंत्रण करणे.
२. आदिवासी जनतेमधील कुपोषण कमी करणे.
३. आदिवासी भागामधील बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे.
४. आदिवासी महिलांमधील सुरक्षित मातृत्व आणि आरोग्य विषयक सुधारणा करणे.
५. कुटुंब नियोजन तसेच वंध्यत्व सेवा पुरविणे.
६. व्यसनाधिनता आणि मानसिक आरोग्य विषयक सेवा पुरविणे.
७. सिकलसेल आजाराचे नियंत्रण करणे.
८. सर्प/प्राणीदंश आणि अपघात विषयी योग्य वेळी उपचार पुरविणे.
९. आदिवासी भागात आरोग्य विषयक बाबींचा प्रचार व प्रसार करणे.
१०. आश्रमशाळांमधील बालकांची आरोग्य विषयक तपासणी करणे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्याच्या काही भागात साथीच्या रोगांची लागण झाल्याबाबत

**(५६) * ४४५७६ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.नरेंद्र दराडे, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्याच्या नागपूर, पुणे, सोलापूर, यवतमाळ, उस्मानाबाद, नाशिक व इतर भागात माहे जुलै-ऑगस्ट व सप्टेंबर, २०१८ या महिन्यात डेंग्यू, लेप्टो, मलेरिया, गॅस्ट्रो, हेपेटायटिस, कॉलरा, चिकनगुनिया, स्वाईन फ्ल्यू इत्यादी रोगांची लागण झाल्याने काही रुग्णांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २९ जुलै, २०१८ रोजी कांदिवली (मुंबई) येथे लेप्टोस्पायरोसिसमुळे एका १६ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाल्याचे तसेच स्वाईन फ्ल्यूमुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील जेवळी (ता.लोहारा) येथील ६० वर्षीय महिलेचा, नारंगवाडी (ता.उमरगा) येथील ५९ वर्षाच्या व्यक्तीचा आणि गवळेवाडी (ता.तुळजापुर) येथे ४ वर्षीय बालकाचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले त्याचप्रमाणे सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात स्वाईन फ्ल्यूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे ३ रुग्ण दगावल्यामुळे कोनांबे येथील पालकांनी भितीने मुलांना शाळेत पाठविणे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, भंडारा व गोंदिया या सहा जिल्ह्यात दिनांक १ जानेवारी ते १४ सप्टेंबर या कालावधीत ३५७ डेंग्यू ग्रस्त रूग्णांची नोंद होवून व एकाचा मृत्यू झाल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक प्रशासनाने उक्त संसर्गजन्य रोगावर नियंत्रण आणण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रतिबंधक औषधांची खरेदी केली नसल्याने रुग्णांना खाजगी दुकानातून औषधांची खरेदी करावी लागत आहे तसेच राज्यात शासकीय रुग्णालयांमध्ये डॉक्टर व परिचारिकांची हजारो पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांना पुरेशा प्रमाणात सोयी-सुविधा, उपचार देण्यास अडचणी निर्माण झाल्याने गरीब रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर रोगांचा फैलाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक, डॉक्टर व परिचारिकांची रिक्त पदे भरण्यासाठी तसेच रुग्णांना पुरेशा प्रमाणात सोयी-सुविधा, उपचार देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

| आजाराचे नाव | उद्रेक | लागण | मृत्यू |
|---|---|---|---|
| गॅस्ट्रो | ७ | ३६१ | ० |
| कॉलरा | ५ | २४७ | ४ |
| जलजन्य काविळ | २ | ४१ | ० |

(२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा नाशिक तालुका सिन्नर मौ.कोनांबे येथील पालकांनी मुलांना शाळेत पाठवणे बंद केलेले नाही.

(३) हे खरे आहे.

३४७ डेंग्यू बाधित रुग्ण आढळून आले आहे.

(४) हे खरे नाही.

औषधासाठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून उपलब्ध वैद्यकीय अधिकारी, परिचारीका तसेच कंत्राटी तत्वावर राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूका करुन जनतेला आरोग्य सुविधा दिली जात आहे.

(५) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

साथरोग प्रतिबंधक व नियंत्रणासाठी खालील उपाययोजना केल्या आहेत.

- नियमित साथरोग सर्वेक्षण.
- डेंग्यू, मलेरियासाठी किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
- सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये साथरोग उपचाराची सुविधा.
- प्रयोगशाळा निदानाची व्यवस्था.
- अतिजोखमीच्या व्यक्तींना मोफत व ऐच्छिक फ्ल्यू लसीकरण.
- मलेरिया नियंत्रणासाठी संवेदनशील भागात किटकनाशक फवारणी.
- एकात्मिक किटक व्यवस्थापन.
- वर्षातून दोन वेळा स्वच्छता सर्वेक्षण.
- पाणी गुणवत्ता संनियंत्रण.
- पाणी शुध्दीकरणासाठी स्थानिक स्वराज्य संस्था पातळीवरील यंत्रणेचे प्रशिक्षण.
- साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी डॉक्टर्स आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे नियमित प्रशिक्षण.
- साथरोग संदर्भात जनतेचे विविध माध्यमातून प्रबोधन.

डॉक्टर व परिचारीकांची रिक्त पदे भरण्यासाठी सुयोग्य पावले उचलण्यात येत असून उपसंचालकस्तरावर वैद्यकीय अधिकारी कंत्राटी स्वरुपात भरण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

## खेड-शिरगाव (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील पिंपळवाडी धरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(५७) * ४४४०७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड-शिरगाव (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील पिंपळवाडी धरणाचे काम मागील ३५ वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे या प्रकल्पाचा खर्च ५ कोटी रुपयावरून १०५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून धरणाचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदरहू धरणाचे काम कार्यारंभ आदेशानंतर ३ वर्षात ठेकेदाराने पूर्ण करावयाचे होते, परंतु आजपर्यंत पिंपळवाडी प्रकल्पासाठी मागील ३५ वर्षात अनेक ठेकेदार बदलले असल्याने प्रकल्पाचे काम अतिशय संथगतीने सुरु, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू धरणाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे, तसेच आतापर्यंत किती व कोणकोणती कामे पूर्ण झाली आहेत व किती शिल्लक आहेत आणि किती कालावधीत धरणाचे काम पूर्ण होणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने धरणाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) सन १९८१ मध्ये पिंपळवाडी (डुबी) लघु पाटबंधारे योजनेच्या रुपये ५.२१ कोटी अंदाजपत्रकास मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून मंजूर तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत रुपये ८७.४८ कोटी आहे. धरणाचे काम १००% पूर्ण झाले असून कालव्याची कामे ९५% पूर्ण झाली आहेत.

(२) भूसंपादनातील अडचणी, प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या मागण्या पूर्ण करुन घेण्यासाठी वारंवार प्रकल्पाचे काम बंद पाडणे, भूप्रपात, अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्ती, प्रकल्पाच्या विविध घटकांसाठी संकल्पने प्राप्त करुन घेणे, अपुरे अनुदान इत्यादीमुळे प्रकल्पाचे काम बराच काळ प्रलंबित राहिले आहे.

(३) धरणाचे काम १००% पूर्ण झाले असून कालव्याची कामे ९५% पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामांची निविदा अंतिम करण्यात आली असून जून, २०१९ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) होय.

चौकशी अहवालानुसार प्रकल्पाच्या खर्चात झालेल्या वाढीची कारणे पाहता ही वाढ व विलंब हा अपरिहार्य कारणांमुळे झाला असून समर्थनीय आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील रिक्त पदे व खाटांची संख्या वाढविण्याबाबत

**(५८) * ४४३५८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये डॉक्टर, परिचारिका, वॉर्ड बॉईज, आयाबाई, सफाई कामगार यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयामध्ये रुग्णांची वाढती संख्या पाहता एकूण किती खाटांची तरतुद करण्यात आली आहे, तसेच त्यापैकी अतिदक्षता विभागाकरीता दैनंदिन अत्यवस्थ रुग्णाच्या गुणोत्तरात खाटांची संख्या किती आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत व खाटांची संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्यात आरोग्य विभागात गट-अ ते गट-ड संवर्गात एकूण ५६५२२ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४००८९ पदे भरलेली असून १६४३३ पदे रिक्त आहेत.

(२) महाराष्ट्र राज्यात आरोग्य सेवा संचालनालयामार्फत एकूण ५०४ आरोग्य संस्था कार्यरत असून त्यामध्ये एकूण ३३४५० इतकी खाटांची संख्या आहे. तसेच २३ जिल्हा रुग्णालये व ३ सामान्य रुग्णालये अशा एकूण २६ ठिकाणी प्रत्येकी ६ खाटांचे (आयसीयु) अतिदक्षता विभाग असून एकूण १५६ खाटा उपलब्ध आहेत. अत्यवस्थ रुग्णांची सरासरी दैनंदिन संख्या १९७ इतकी आहे व उपलब्ध आयसीयु खाटांची संख्या १६८ आहे. त्यामुळे अतिदक्षता विभागाकरीता दैनंदिन अत्यवस्थ रुग्णांच्या गुणोत्तरात खाटांची संख्या १.२६ येते.

(३) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रुपये ६६००/-) मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रुपये ५४००/-) मधील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने संचालनालयाच्या दिनांक ०४/१०/२०१८ च्या पत्रान्वये सर्व उपसंचालकस्तरावर वैद्यकीय अधिकारी कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच राज्यस्तरीय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एकूण ७२३ रिक्त पदांची जाहिरात दिनांक १३/०७/२०१८ रोजी प्रसिध्द होवून पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. गट-क व ड मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

बृहत आराखडा दिनांक १७/०१/२०१३ व ०२/०६/२०१४ च्या बृहत आराखड्यात नवीन संस्था व श्रेणीवर्धन करण्यात आलेल्या संस्था अशा एकूण १८४ संस्था मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सैनिक पाल्यांच्या कोट्यावर परप्रांतीय विद्यार्थ्यांकडून अतिक्रमण होत असल्याबाबत

**(५९) * ४४५८४ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूमिपुत्र सैनिकांच्या मुलांकरीता एम.बी.बी.एस. आणि बी.डी.एस. अभ्यासक्रमात राखीव असलेल्या जागा परप्रांतीय सैनिक आपल्या मुलांकरीता खोट्या आणि सदोष अधिवास प्रमाणपत्रांच्या आधारे बळकावत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय अभ्यासक्रमाकरीता प्रवेश प्रक्रिया राबविणाऱ्या वैद्यकीय आरोग्य संचालनालयाचे संचालक यांनी दोन उमेदवारांची अधिवास प्रमाणपत्रे बनावट असल्याचे आढळून आल्याने त्यांचे प्रवेश रद्द केले असून, ज्या विद्यार्थ्यांबाबत तक्रारी आल्या आहेत त्यांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यासंदर्भात संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आदेशित करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अधिवास प्रमाणपत्र बनावट असल्याचे आढळल्यास संबंधित उमेदवारांचे प्रवेश रद्द करण्यात येतात. दोन उमेदवारांच्या पालकांचे अधिवास प्रमाणपत्र बनावट असल्याचे निष्पन्न झाल्याने प्रवेश रद्द करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## अष्टविनायक तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा तयार करण्याबाबत

**(६०) * ४४१९८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक ४२७९६ ला दिनांक १२ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या अष्टविनायक तीर्थक्षेत्राच्या सर्वांगिण विकासाकरीता तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, आंध्रप्रदेशच्या धर्तीवर राज्यातही मंदिर देवस्थापन हा अभ्यासक्रम सुरु करण्याचा प्रस्तावही शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने काही निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, अंशतः खरे आहे.
जिल्हाधिकारी, पुणे व रायगड (अलिबाग) यांनी अष्टविनायक परिमंडळाचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास करणेसाठी ७ तीर्थक्षेत्रांचे रुपये १४२.९७ कोटी इतक्या किंमतीचे आराखडे विभागास सादर केलेले आहेत.

तथापि, संबंधित शासन निर्णयानुसार एकाच आराखड्यात एकाच वेळी वरील निधी देणे शक्य नाही. तरी वरील तीर्थक्षेत्राबाबत (अष्टविनायकाबाबत) स्वतंत्र प्रकरण निहाय व गुणवत्तेनुसार “ब” वर्ग दर्जा देणे, “ब” वर्ग दर्जा दिलेला असल्यास निधी प्रस्तावित करणे इ. बाबींबाबत पत्रव्यवहार तथा कार्यवाही सुरु आहे.

(२) अशी बाब विभागस्तरावर विचाराधीन नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वाडिया रुग्णालयाची कोट्यवधीची रक्कम थकविल्याबाबत

**(६१) * ४५३९७ श्री.विलास पोतनीस, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाडिया रुग्णालयाचे रुपये ११६ कोटी आरोग्य विभाग व मुंबई महानगरपालिकेने थकविल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडिया रुग्णालयाची थकबाकी न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रक्कम वेळेत न मिळाल्यास रुग्णसेवेवर परिणाम होणार असल्यामुळे थकबाकीची रक्कम वाडीया रुग्णालयाला त्वरीत अदा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

बाई जेरबाई वाडिया चिल्ड्रन्स हॉस्पिटल, परळ या लहान मुलांच्या रुग्णालयास आरोग्य विभागाकडून सहाय्यक अनुदान दिले जात नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात जमिनीचे वाटप विना परवानगीने झाल्याबाबत

**(६२) * ४४८४८ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ६३ लाख हेक्टर जमिनीपैकी काही जमिनीचे वाटप विना परवानगीने झाले असल्याने त्याचा हिशेब जुळत नसताना गेल्या १५ वर्षात वनभंगाचे गुन्हे दाखल करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारचे गुन्हे मुख्य वनसंरक्षक अथवा प्रादेशिक वनसंरक्षकांना न्यायालयात दाखल करण्याचे अधिकार केंद्र शासनाने दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक वनसंरक्षकांनी असे गुन्हे न्यायालयात दाखल न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गुन्हे न्यायालयात दाखल न करणाऱ्या मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक वनसंरक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

राज्यातील वन विभागाच्या ताब्यातील वन क्षेत्र, भारतीय वन स्थिती अहवाल २०१७ मधील आकडेवारीनुसार एकूण ६१५०७९ चौ.कि.मी. इतके आहे. तसेच वन विभागाच्या उपलब्ध अभिलेखानुसार वन विभागाकडून वन जमिनीचे वाटप झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, राज्यातील काही वन जमिनी पूर्वीपासून महसूल विभागाच्या ताब्यात असून त्यापैकी काही वन जमिनी निर्वणीकरण न करता काही व्यक्ती/संस्था यांना वाटप झाल्याच्या घटना आढळून आल्या आहेत.

(२) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमावलीनुसार उक्त कायद्याचा भंग झाल्यास नियम ९(१) अंतर्गत प्राधिकृत केलेला अधिकारी संबंधितांविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी सक्षम असतो. सदर प्राधिकार सरसकट नसून प्रकरण निहाय केंद्र शासनाव्दारे प्रदान केले जातात. तसेच या संदर्भात वनभंगाच्या स्वरुपानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत केंद्र शासनाने दिनांक २९ जानेवारी, २०१८ अन्वये मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत.

(३) व (४) महसूल विभागाच्या ताब्यातील बहुतांशी वन जमिनीचे वाटप वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अस्तितत्वात येण्यापूर्वी झालेले आहे. महसूल विभागाच्या ताब्यातील वनक्षेत्र वन विभागाच्या ताब्यात देण्याबाबत वन विभागाकडून पाठपुरावा सुरु आहे. याबाबत दिनांक २ डिसेंबर, २०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये जमीन हस्तांतरण व वन जमिनींची नोंद अभिलेखात अद्यावत करण्याबाबत कालमर्यादा ठरवून दिली आहे. तसेच ज्या जमिनी वन विभागास वर्ग करणे काही कारणास्तव शक्य नसेल, अशा जमिनींची यादी करुन कारणमिमांसेसह शासनास अहवाल सादर करण्याबाबत व महसूल विभागाने विविध प्रयोजनासाठी पूर्वी वाटप केलेले वनक्षेत्र व अतिक्रमित वन क्षेत्र याबाबत वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव सादर करण्याबाबतच्याही सूचना सदर परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा व राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील नरभक्षक वाघिणीला जेरबंद करण्याबाबत

**(६३) * ४५०८५ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा व राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात माहे जुलै, २०१७ ते ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत नरभक्षक वाघिणीने अंदाजे २५ जणांचे प्राण घेतले असून बऱ्याच जनावरांना ठार केल्याने तिला शोधण्यासाठी अनेक

यंत्रणा वापरण्यात येत असूनही या नरभक्षक वाघिणीचा शोध लागला नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाघिणीमुळे प्राण गमावलेल्या २५ जणांच्या कुटुंबांना शासनाकडून कोणती आर्थिक वा अन्य स्वरुपाची मदत करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, वाघिणीला प्रथम बेशुध्द करा किंवा ठार मारा असे मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असतानाही त्याला पकडण्याचे प्रयत्न अयशस्वी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने वाघिणीमुळे प्राण गमावलेल्या २५ जणांच्या कुटुंबांना आर्थिक मदत देण्याबाबत व नरभक्षक वाघिणीला जेरबंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४) पांढरकवडा वन विभागातील पांढरकवडा व राळेगांव या तालुक्यांमध्ये दिनांक १ जून, २०१६ ते २८ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वाघाच्या हल्ल्यात एकूण १३ व्यक्तींचा मृत्यू झाला असून त्यापैकी माहे जुलै, २०१७ ते ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत वाघाच्या हल्ल्यात ९ जणांचा मृत्यू तर बऱ्याच पाळीव जनावरांचा मृत्यू झाला आहे.

वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या १३ व्यक्तींच्या कायदेशीर वारसास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

"नरभक्षक वाघणीस (टी-१) जेरबंद करणे/जेरबंद करणे शक्य न झालेस ठार मारणे व तिचे छाव्यांना जेरबंद करुन बचाव केंद्रात स्थलांतर करणे" असे आदेश मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी पारीत केले होते. सदर आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने योग्य ठरवून कायम केले आहेत.

सदर वाघणीस (टी-१) व तिच्या छाव्यांना जेरबंद करणे संदर्भात वन विभाग, वन विकास महामंडळ, वन्यजीव विभाग व विशेष व्याघ्र संरक्षण दलाचे जवान, पोलीस जवान, पशुवैद्यकीय अधिकारी, स्वयंसेवी संस्थेचे सदस्य व स्थानिक मजुर यांचेमार्फत जेरबंद करण्याची मोहिम राबविण्यात आली आहे.

दिनांक ०२/११/२०१८ रोजी बोराटी-वरुड-राळेगांव रस्त्याच्या कडेने गस्त करणाऱ्या वन विभागाच्या चमूकडून वाघिणीस बेशुध्द करुन जेरबंद करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि, वाघिणीने चमूवर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्यामुळे चमूतील सदस्यांकडून स्वसंरक्षणार्थ नरभक्षक वाघिणीस (टी-१) पारध करण्यात आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व पॅरावैद्यक शिक्षण मंडळ अवैधपणे अस्तित्वात आणल्याबाबत

**(६४) * ४५४१५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व पॅरावैद्यक शिक्षण मंडळाची स्थापना सन २०१३ मध्ये केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाने केंद्र शासन, लोकसभा व राज्यसभेची मान्यता न घेता तसेच "गॅझेट ऑफ नोटीफीकेशन" जाहीर न करताच महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व पॅरावैधक शिक्षण मंडळ अवैधपणे अस्तित्वात आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैधपणे चालणाऱ्या मंडळाच्या माध्यमातील अभ्यासक्रमांना प्रवेश घेणारे मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, शासनाने सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करुन विहित पध्दतीने महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व पॅरावैद्यक शिक्षण मंडळ २०१३ याची अधिसूचना दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूरच्या मेयो रूग्णालयास हाफकिन्सच्या कार्यप्रणालीमुळे निधी मिळण्याबाबत

**(६५) * ४५३५४ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मेयो रूग्णालयात येणाऱ्या रूग्णांच्या आजाराचे अचूक निदान करण्यासाठी शासनाने सिटीस्कॅन, एमआरआय आणि डिजिटल एक्स-रेसाठी ३५ कोटींचा निधी दिला असून हाफकिन्सच्या कार्यप्रणालीमुळे रूग्णालयाला निधी मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रूग्णांच्या आरोग्याचा आधार म्हणून मेडिकलसह मेयोची गणना होत असून या रूग्णालयात विदर्भासह मध्यप्रदेश व छत्तीसगडचे रूग्ण उपचारासाठी येत असतात मात्र येथील अपुऱ्या सोयी-सुविधा आणि अद्ययावत उपचार तंत्राच्या अभावामुळे रूग्णांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेयोत २५० खाटांच्या क्षमतेचे नवे रूग्णालय सुरू झाले असून अपघात विभाग नव्याने कार्यान्वित करण्यात आला, मात्र मेयोकडे एमआरआय हे अद्ययावत उपकरण नसल्याने रूग्णांना बाहेरून एमआरआय काढून आणावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे. सदर संस्थेतील रुग्णांना एमआरआय चाचणीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे पाठविले जाते.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात खाटांची संख्या वाढविण्याबाबत

**(६६) * ४५१२७ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात मंजूर करण्यात आलेल्या उपजिल्हा रुग्णालयात सध्या किती खाटांची व्यवस्था आहे, रुग्णांच्या संख्येपेक्षा खाटांची संख्या कमी असल्यामुळे रुग्णांची अत्यंत गैरसोय होत असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करून घेण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपजिल्हा रुग्णालयात खाटांची संख्या वाढविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

वसई येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास दिनांक ०९/०६/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यवाही जिल्हा शल्य चिकीत्सक, पालघर यांचेस्तरावर सुरु आहे.

उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित नसल्याने नवघर येथे ६ खाटांचे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असून त्याव्दारे बाहयरुग्ण/आंतररुग्ण सेवा पुरविण्यात येते व आवश्यकता भासल्यास रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात येते.

(२) उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित झाले नसल्याने खाटांच्या संख्येमध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विचारधीन नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(६७) * ४५६३६ श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील १२ मोठे, ६ मध्यम आणि ३८ लघु सिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी मराठवाडा विकास मंडळाने शासनाकडे २६७५ कोटी रुपयांचे प्रस्ताव पाठविले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यासाठी अतिशय महत्वाकांक्षी ठरणाऱ्या भीमा स्थिरीकरण योजनेचे काम सुरु झालेले नसून निधीअभावी मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडा विकास मंडळाने पाठविलेल्या प्रस्तावांवर शासनाने कार्यवाही करुन निधी वितरित केला आहे काय तसेच भीमा स्थिरीकरण योजनेच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही. तथापि, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी ७ मोठे, ६ मध्यम व २९ लपा प्रकल्पांसाठी रुपये ४६७० कोटीची अतिरिक्त निधीची मागणी शासनास सादर केली आहे.

(२) व (३) नाही. कृष्णा भीमा स्थिरीकरण योजनेंतर्गत सोमंथळी बॅरेजचे काम ९५% पूर्ण झाले आहे आणि उध्दट बॅरेज व नीरा-भीमा जोड बोगद्याची कामे प्रगतीपथावर आहेत. कृष्णा भीमा स्थिरीकरण योजनेवर सन २०१८-१९ या वर्षात सप्टेंबर, २०१८ अखेर पर्यंत रुपये ३१७.५० कोटी खर्च करण्यात आला

आहे. मा.राज्यपाल महोदयांचे निर्देश व राज्याची अर्थोपायाची स्थितीनुसार मराठवाड्यातील बांधकामाधीन एकूण ५७ (८ मोठे, ६ मध्यम व ४३ लघु) सिंचन प्रकल्पांसाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात रुपये १७७७.३८ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंगणवाड्यांसाठी विजेची विशेष तरतूद करण्याबाबत

**(६८) * ४४४८० श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गरीब कष्टकरी शेतमजूरांच्या ० ते ६ वयोगटातील मुलांना पोषण आहार, आरोग्य व पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी गावोगावी, खेड्यात व वस्तीत अंगणवाड्या सुरू करण्यात येवूनही अंगणवाड्यांसाठी विजेची विशेष तरतूद नसल्यामुळे बहुतांश अंगणवाड्या अंधारात भरत असल्यामुळे मुलांना असुविधेचा सामना करावा लागत असल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकात्मिक बालविकास प्रकल्प भारत सरकार यांच्या उपक्रमापैकी एक असून राज्य पुरूषातील महिला व बालविकास विभागातर्फे कार्यान्वित केला जात असून या अंगणवाड्यांकरीता विजेची तरतुद नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अंगणवाड्यांना वीज पुरवठा उपलब्ध होण्याकरीता शासन विशेष तरतूद करणार आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंगणवाड्यांना वीज पुरवठा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंगणवाड्या ह्या दररोज सकाळी १०.०० ते २.०० या कालावधीत भरत असतात. त्यामुळे अंगणवाड्या अंधारात भरत आहेत हे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

(२) ग्रामपंचायतीच्या स्वनिधीमधून अंगणवाडी केंद्राना विजेची सोय उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३), (४) व (५) राज्यातील बहुतांश अंगणवाड्यांना वीज पुरवठ्याची व्यवस्था स्थानिक ग्रामपंचायत पातळीवर करण्यात येते, तसेच पोषण अभियान कार्यक्रमांतर्गत जिल्हा अभिसरण कृती आराखड्यामध्ये अंगणवाडी केंद्राना विजेची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबतचा समावेश करण्यात आलेला आहे.

-----------------

## शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय (मेडीकल), नागपूर येथे काम करणाऱ्या डाटा एन्ट्री ऑपरेटर्सना पूर्ण वेतन देण्याबाबत

**(६९) * ४४०२५ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (मेडीकल), नागपूर येथे ऑनलाईन सिस्टम सुरु करण्याकरीता (मेडिकल हेल्थ इनफॉर्म सर्व्हिस मशीन) ६०० कॉम्प्युटर लावण्यात येवून त्याकरीता काम करणाऱ्या डाटा एन्टी ऑपरेटर्सना रुपये १४,०००/- वेतन असताना केवळ रूपये ८०००/- वेतन देण्यात येत असल्याचे दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने डाटा एन्टी ऑपरेटर्सना पूर्ण वेतन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) सदर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर व वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखाली करण्यात आलेल्या नाहीत. सदर कर्मचाऱ्यांची नियुक्ती संबंधित सेवा पुरवठादाराकडून करण्यात आलेली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) लागू नाही.

-----------------

## राज्यातील महिला स्वाधारगृहांचे मुल्यांकन न झाल्यामुळे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(७०) * ४४१४८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मागील तीन वर्षांपासून राज्यातील निराधार महिला व मुलींच्या स्वाधारगृहांना अनुदान न दिल्यामुळे सदर स्वाधारगृहे बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्वाधारगृहांना केंद्र शासनाकडून मिळणारे ६० टक्के अनुदान मिळाले असून राज्य शासनाकडून मिळणारे ४० टक्के अनुदान स्वाधारगृहांचे मुल्यांकन न झाल्यामुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील स्वाधारगृहांचे प्रलंबित असलेले मुल्यांकन पूर्ण करून प्रलंबित अनुदान देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात “नवीन स्वाधारगृह” योजनेस केंद्र: राज्य हिस्सा ६०:४० प्रमाणे दिनांक २३/०३/२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, केंद्र शासनाची मान्यता असलेल्या व राज्यात सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या संस्थांना सन २०१६-१७ व २०१७-१८ चे रुपये ९,०२,१३,७५१/- इतके अनुदान अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्राला कर वसुलीच्या तुलनेत केंद्र शासनाकडून कमी निधी मिळाल्याबाबत

**(७१) * ४३९७३ श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सर्व राज्यांना केंद्र शासनाकडून वसूल करण्यात येणाऱ्या कर आणि शुल्काच्या उत्पन्नातील ४२.५ टक्के निधी मिळत असून महाराष्ट्राला कर संकलनाच्या तुलनेत १० टक्के एवढाही निधी मिळत नाही तसेच गेल्या तीन वर्षात महाराष्ट्र राज्याकडून जवळपास ९ लाख कोटी रुपयांचा कर जमा झालेला असताना देखील केंद्र शासनाकडून महाराष्ट्र शासनास सुमारे ८१ हजार कोटी रुपयांचा निधी मिळाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्राची महसूल उत्पन्नापासून कर संकलनापर्यंत आर्थिक आघाड्यांवर झालेल्या दुरवस्थेची पहाणी करण्यासाठी १५ व्या वित्त आयोगाच्या अध्यक्षांसह एक शिष्टमंडळ दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजीपासून तीन दिवस महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले असून सदर दौऱ्यात शिष्टमंडळासोबत मा.मुख्यमंत्री, मा.वित्तमंत्री व इतर संबंधितासोबत दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत केंद्रीय करसंकलन निधीचे वाटप करताना ४२ टक्क्यांऐवजी ५० टक्के हिस्सा महाराष्ट्रास मिळावा व मुंबई महानगर प्रदेशातील प्रकल्पांसाठी ५० हजार कोटी, मराठवाडा-विदर्भातील प्रकल्पासाठी, २५ हजार कोटी, न्यायपालिका, पर्यावरण संवर्धन इत्यादीसाठी ५१०२ कोटी अशी एकूण ८० हजार १०२ कोटी रुपयांच्या विशेष अनुदानाची मागणी वित्त आयोगाच्या शिष्टमंडळाकडे राज्य शासनाकडून करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्रीय वित्त आयोगाने राज्य शासनाच्या मागणीबाबत काय कार्यवाही केली व याप्रकरणी सद्य: स्थिती काय आहे,

(४) तसेच, वित्त आयोगाकडून कोणतीही कार्यवाही झाली नसल्यास, याबाबत शासनाकडून कशाप्रकारे पाठपुरावा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) भारतीय संविधानाअन्वये केंद्रीय कराची आकारणी व वसुली केंद्र शासनाच्या संबंधित विभागांच्या आस्थापनाकडून करण्यात येते. केंद्रीय वित्त आयोगाकडून कराच्या निव्वळ उत्पन्नातील राज्यांना दयावयाचा कर हस्तांतरणाचा हिस्सा निश्चित केला जातो. १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांना केंद्रीय कराच्या निव्वळ उत्पन्नातील ४२ टक्के हिस्सा देण्याचे निश्चित केले आहे. राज्यांना मिळणाऱ्या या ४२ टक्के हिश्श्याचे राज्यांमध्ये परस्परात वितरण (Horizontal Devolution) करण्यासाठी केंद्रीय वित्त आयोगच निकष ठरवत असतो. १४ व्या वित्त आयोगाने निश्चित केलेल्या निकषानुसार आपल्या राज्याला सन २०१५-१६ ते २०१७-१८ या तीन वर्षांच्या कालावधीत केंद्र शासनाकडून कराच्या निव्वळ उत्पन्नातील रुपये ९९००५.५९ कोटी एवढी रक्कम राज्यास प्राप्त झाली आहे.

(२) केंद्रीय वित्त आयोग अहवाल तयार करण्यापुर्वी सर्व राज्यांच्या मागण्यांचा अभ्यास करण्यासाठी प्रत्येक राज्यांना भेटी देत असतात. या अनुषंगानेच महाराष्ट्र शासनाबरोबर चर्चा करण्यासाठी १५ व्या वित्त आयोगाच्या अध्यक्षांसह शिष्टमंडळ दिनांक १८ व १९ सप्टेंबर, २०१८ रोजी महाराष्ट्र राज्याच्या दौऱ्यावर आले होते. सदर दौऱ्यादरम्यान केंद्र शासनाकडून कराच्या निव्वळ उत्पन्नातील हिस्सा ४२ टक्क्यावरुन ५० टक्के मिळावा तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास क्षेत्राच्या पायाभूत सुविधा विकासाकरीता रुपये ५० हजार कोटी, प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी मराठवाडा-विदर्भासाठी रुपये २५ हजार कोटी, न्यायदान, वन, वन्यजीव आणि हरितच्छादित क्षेत्र, पर्यावरण संरक्षण व व्यवस्थापन, सांस्कृतिक वारस्याचे जतन इ. साठी रुपये ५१०२ कोटी अशी एकूण रुपये ८० हजार १०२ कोटी अनुदानाची मागणी वित्त आयोगाकडे निवेदनाव्दारे राज्य शासनाकडून करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) देशातील सर्व राज्यांनी केंद्रीय वित्त आयोगाकडे केलेल्या मागणीचा अभ्यास करुन आयोग त्यांचा अहवाल मा.राष्ट्रपती महोदयांकडे सादर करतात. सदर अहवाल अद्याप सादर केलेला नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य बाल हक्क व संरक्षण आयोगाकडे अनेक तक्रारी प्रलंबित असल्याबाबत

**(७२) * ४४२०१ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बालकांच्या हक्कांसाठी सर्वात महत्वाची जबाबदारी पार पाडणाऱ्या महाराष्ट्र राज्य बाल हक्क व संरक्षण आयोगाने सन २०१५ ते २०१८ या ३ वर्षात २८० पैकी फक्त ३३ तक्रारींवर निर्णय घेतल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान माहितीच्या अधिकारात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यात असलेल्या अधिकाराबाबत बालकांना वंचित ठेवण्यापासून ते लैंगिक अत्याचाराच्या अनेक प्रकरणांचा त्यात समावेश असल्याने बालकांचा हक्क न्यायाच्या प्रतिक्षेत असून २४७ प्रकरणे अजूनही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षांनी शासनाकडे खर्चासाठी मागणी केलेल्या रकमेपैकी कमी निधी दिल्याने व कर्मचाऱ्यांपैकी निम्म्याच संख्येस मान्यता दिल्याने सुमारे ५० लाखाहून अधिक रक्कमेचा धनादेश हा आयोगाकडून शासनास परत करण्याचा प्रकार निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी बालकांचे शैक्षणिक व इतर मूलभूत हक्कांवर शासनाकडून कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बालकांचे शैक्षणिक व इतर मूलभूत हक्कांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

१. सन २०१८-१९ मध्ये आयोगास रुपये १,०३,८६,०००/- पैकी ७०% रुपये ७२,७०,२००/- इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. उर्वरित ३०% निधी उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर वितरीत करण्यात येईल.

२. आयोगावरील एकूण १२ पदांपैकी ८ पदांवर अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून ४ पदे रिक्त आहेत.

३. RTE अंतर्गत माहे जानेवारी अखेर प्राप्त निधी आयोगाकडून माहे मार्च, २०१८ मध्ये अखेरच्या टप्प्यात प्राप्त झाल्याने त्यावर कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे व अपुऱ्या सोई-सुविधा असल्याबाबत

**(७३) * ४६०६१ श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे, अपुरा औषध पुरवठा, सोनोग्राफी मशीन्स बंद असल्यामुळे अशा विविध कारणांमुळे माता-बाल मृत्यूचे प्रमाण वाढले असल्याबाबतची तक्रार 'समर्थन' या संस्थेने मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.माहिला व बालविकास मंत्री, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हाधिकारी, रायगड, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक अधिकारी, रायगड तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, रायगड यांच्याकडे दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण, पुणे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड यांना दिनांक १२/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सखोल चौकशी करण्याबाबत कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांसह इतर कर्मचारी व सोयी-सुविधा नसल्याबाबत

**(७४) * ४५०४९ श्री.जयंत पाटील, श्री.अनिकेत तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा सामान्य रूग्णालयाची प्रशासकीय इमारत व कामकाज आधुनिक पध्दतीने होत असून वैद्यकीय अधिकाऱ्यांसह इतर कर्मचारी व सुविधांचा अभाव असल्यामुळे रूग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात तज्ञ डॉक्टरांची १९ पदे मंजूर असून त्यामधील १६ पदे रिक्त, वर्ग २ च्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची ४ पदे तसेच इतर कर्मचाऱ्यांसह एकूण १७९ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातून दररोज शेकडो रूग्ण उपचारासाठी जिल्हा सामान्य रूग्णालयात येत असतात, परंतु तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचा अभाव असल्याने रूग्णांना मुंबई मधील शासकीय अथवा खाजगी रूग्णालयामध्ये उपचाराकरीता जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णालयाच्या आवारात घाणीचे साम्राज्य, इमारतीवर झुडूपांचा विळखा असून औषधांचा तुटवडा असल्याने रुग्णांना औषधे उपलब्ध होत नसून त्यांना खाजगी मेडीकल दुकानातून औषधे खरेदी करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत व औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच इतर सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ५४००) संवर्गाचे मंजूर ३० पदे भरलेली आहेत. जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग, जि.रायगड येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण ४४४ पदे मंजूर असून २७७ पदे भरलेली आहेत व १६७ पदे रिक्त आहेत.

विशेषज्ञांची (ग्रेड पे ६६००/-) १६ पदे रिक्त असली तरी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ३ भूलतज्ञ, २ स्त्रीरोगतज्ञ, २ सर्जन, १ अस्थिव्यंगतज्ञ, २ भिषक, १ ईएनटी सर्जन व १ दंतशल्यचिकित्सक या विशेषज्ञांच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक त्या सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

रुग्णालयात नियमित साफसफाई करण्यात येते. तसेच रुग्णालयात आवश्यक तो औषधसाठा उपलब्ध आहे.

(५) वैद्यकीय अधिकारी, गट-अ (ग्रेड पे ६६००) मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ५४००/-) संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता कार्यवाही सुरु आहे.

गट क व ड संवर्गातील पदे महाभरती दरम्यान भरण्यात येतील.

सदर रुग्णालयात आवश्यक तो औषधसाठा उपलब्ध आहे.

-----------------

## सांगली जिल्हा नियोजन मंडळाने विविध विकास कामासाठी दिलेला निधी अखर्चित असल्याबाबत

**(७५) * ४५७७५४ श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा नियोजन मंडळाने विविध विकास कामासाठी दिलेला निधी ६ वर्षे झाले तरी अखर्चित असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टेडीयमचा विकास करण्यासाठी निधी देऊनही या स्टेडीयमचे काम अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत माजी खासदार श्री.प्रतिक प्रकाशबापू पाटील यांनी प्रस्तावित केल्यानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टेडीयम विकसित करणे या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक १२/०२/२०१४ रोजी देण्यात आला आहे. त्यानुसार स्टेडीयमच्या पूर्वेकडील भिंत व गेटचे काम पूर्ण झाले असून उत्तरेकडील गेटच्या ठिकाणी अतिक्रमण असल्यामुळे काम पूर्ण होऊ शकले नाही. सदर अतिक्रमण काढून घेतले असून स्टेडीयमचे काम डिसेंबर, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

-----------------

## परभणी येथे शासकीय वैद्यकिय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत

**(७६) * ४४९८५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत नागरिक व लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीची दखल घेऊन शासनाने त्रिसदस्य समिती स्थापन करुन त्या समितीद्वारे भौतिक सुविधा व इतर सर्व बाबींचा अहवाल शासनास सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, तसेच सदर अहवालात काय नमूद केले आहे व त्यानुसार शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या दिनांक २५/०९/२०१८ च्या आदेशान्वये त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली होती. समितीने आपला प्राथमिक अहवाल संचालनालयास सादर केला असून त्याची छाननी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महसूली उत्पन्न वाढविण्याबाबत

**(७७) * ४४०४७ ॲड.अनिल परब, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या महसूली उत्पन्नाचा वेग २०१४ पासून मंदावला असल्याने राज्याची आर्थिक स्थिती बिघडल्याबाबतचा अहवाल नुकताच वित्त आयोगाने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००९ ते २०१३ या काळात महसूली उत्पन्नाचा वेग १७.६९ टक्के असून २०१४-२०१७ या तीन वर्षात महसूली उत्पन्नाचा वेग ११.०५ टक्क्यांपर्यंत खाली आला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्याचे महसूली उत्पन्न घटण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर तूट भरुन काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशींचा कालावधी २००५ ते २०१० व २०१० ते २०१५ असा पाच वर्षांचा असतो. या पार्श्वभूमीवर राज्याच्या महसूली उत्पन्नाच्या वाढीचा वेग निश्चित करण्यासाठी २००९ ते २०१३ व २०१४ ते २०१७ याप्रमाणे कालावधीची वर्गवारी करणे तर्कसंगत ठरणार नाही.

मागील १० वर्षांच्या कालावधीचा विचार केल्यास राज्याच्या महसूली उत्पन्नातील वाढीचा नैसर्गिक दर साधारणपणे सरासरी ११ ते १२ टक्के इतका राहिला आहे. तथापि, सन २०१०-११ मध्ये विक्रीकर, मुद्रांक व नोंदणी शुल्क, मोटार वाहन कर व विद्युत शुल्क आकारणीच्या दरातील सुधारणांमुळे तसेच सन २०११-१२ मध्ये राज्य उत्पादन शुल्काच्या दरांतील वाढीमुळे तेवढया वर्षापुरतेच राज्याचे महसूली उत्पन्न नैसर्गिक वाढीपेक्षा जास्त दराने वाढले आहे. त्यामुळे सन २००९ ते २०१३ या काळात महसूली उत्पन्नाचा वेग सुमारे १५ ते १८ टक्के असल्याचे दिसून येते. मात्र त्यापुढे सन २०१३ ते २०१७ या कालावधीत राज्याच्या महसूली उत्पन्नाच्या वाढीचा वेग हा सर्वसाधारणपणे नैसर्गिक वाढीच्या सरासरी इतकाच राहिला आहे.

राज्याच्या विकासाची वाढती गरज पूर्ण करण्यासाठी महसूली उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने उपाययोजना करण्याकरीता शासन निर्णय, दिनांक १५/०४/२०१७ अन्वये उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. मागील १० वर्षात सन २००८-०९ मधील रुपये ८१,२७१ कोटी इतक्या महसूली उत्पन्नात सुमारे तीन पटीने वाढ होऊन सन २०१७-१८ मध्ये राज्याचे महसूली उत्पन्न रुपये २,४३,६७२ कोटी इतके झाले आहे.

-----------------

## सोलापूर जिल्हा परिषदेच्या निष्क्रिय कारभारामुळे निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(७८) * ४४५९९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्हा परिषदेच्यावतीने राबविण्यात येणारी "सिंचन विहिर योजना" कागदोपत्री असल्याचे व त्यानुषंगाने दरवर्षी साडेचार हजार विहिरींचे उद्दीष्ट देऊनही मागील पाच वर्षापासून सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मागणी करुनही विहिरी मिळाल्या नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७-१८ या वर्षात जिल्हा परिषद व महसूल विभागांतर्गत तलाठी कार्यालयाच्या समन्वयाअभावी सोलापूर जिल्ह्यात ४ हजार ९०० विहिरींची कामे सुरु झालेली नाहीत अथवा अपूर्णावस्थेत आहेत व संबंधित कार्यालयाच्या निष्क्रियतेमुळे विहिरींसाठी मिळालेला १५० कोटी रुपयांचा निधी वाया गेला असून शेतकऱ्यांना मात्र हक्काच्या विहिरीपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर्षी देखील माहे ऑगस्ट, २०१८ पर्यंत दोन हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांनी अहिल्यादेवी सिंचन योजनेंतर्गत विहिरींसाठी प्रस्ताव दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील सहा वर्षात सोलापूर जिल्ह्यात अंदाजे १५ हजार विहिरींचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते, दरवर्षी या विहिरींचे काम रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात येणार असल्याने व त्यासाठी मजूरांकडे जॉबकार्ड असणे अनिवार्य असून असे मजुर शोधणे आणि सहा महिन्यांत विहिरींचे काम पूर्ण करणे कठीण असल्याचे शेतकऱ्यांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित विभागाच्या समन्वयाने प्रस्तावांना मंजूरी देऊन शेतकऱ्यांना विहिरींचे अनुदान देण्याबाबत सदर योजनेचा निधी अखर्चित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) होय, यावर्षी प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

(४) नाही, हे खरे नाही.

(५) सिंचन विहीर ही योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राबविण्यात येत असून जसे काम होत जाईल तसा शासनाकडून निधी उपलब्ध केला जातो. यावर्षी प्राप्त प्रस्तावासंदर्भात भूजल दाखले प्राप्त करुन वैयक्तिक विहिरींना प्रशासकीय मंजूरी जिल्हा परिषदेमार्फत देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राळेगाव (जि.यवतमाळ) येथील शासकीय वास्तूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७९) * ४५१६३ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, अ‍ॅड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) शहरात व तालुक्यात कोट्यवधी रुपये खर्चून शासनाने महत्वपूर्ण वास्तू उभारल्या असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वास्तूंमध्ये वीज, पाणी, साहित्य व कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे उक्त वास्तू विना वापर पडून असल्याचेही माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील ट्रॉमा केअर सेंटर अनेक महिन्यांपूर्वीच बांधून पूर्ण झाले असून वीज व पदे भरले नसल्याने कार्यान्वित झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

राळेगाव, जि.यवतमाळ येथे ग्रामीण रूग्णालयाच्या ट्रॉमा केअर सेंटरच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून वीज, पाणी इ.सुविधा अद्‌याप पूर्ण केलेल्या नाहीत.

(२) हे खरे नाही.

सदर इमारतीचे उर्वरीत कामे बाकी असल्यामुळे इमारतीचा ताबा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्‌याप घेण्यात आला नाही.

(३) अंशत: खरे आहे.

बांधकाम अपूर्ण आहे, यास्तव पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) राळेगाव येथील ट्रॉमा केअर सेंटरचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर ट्रॉमा केअर सेंटरकरीता दिनांक १६/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये पदनिर्मिती करण्यात आली असून इमारत ताब्यात घेतल्यानंतर पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील प्रतिष्ठित संस्थेच्या बालगृहामध्ये अनाथ मुलांना बेकायदेशीररित्या ठेवण्यात आल्याबाबत

**(८०) * ४४१६३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एका प्रतिष्ठित संस्थेच्या “बालगृहा” मध्ये अनाथ मुलांना बेकायदेशीररित्या ठेवण्यात आल्याची बाब दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंधेरी येथील प्रतिष्ठित वसतिगृहातील १६ वर्षाची मुलगी अचानक बेपत्ता झाल्याने सदरील बाब निदर्शनास आल्यावर राज्यात कोण-कोणत्या ठिकाणी बेकायदा बालगृहे सुरु आहेत याची माहिती घेण्याचे काम बाल हक्क आयोगाने सुरु केले असून त्याचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेकायदा बालगृहे चालविणाऱ्या संस्थेवर व व्यवस्थापकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) नाही.

तथापि, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे दाखल तक्रार प्रकरण क्रमांक ६३/२०१७-१८ मध्ये पिडीत मुलीने पोलिसांना दिलेल्या निवेदनात तिला कोणीही पालक नसल्याचे म्हटले आहे. तसेच फातिमाश्रय कॉन्वेट, अंधेरी (पूर्व) या संस्थेने दाखल प्रतिज्ञापत्रामध्ये पिडीत मुलगी त्यांच्या संस्थेमध्ये सन २००३ पासून राहत असल्याचे नमुद केले आहे.

सदर प्रकरणी बाल न्याय अधिनियम अंतर्गत सदर संस्था नोंदणीकृत नसताना अनाथ मुलीस संस्थेत ठेवल्याची बाब महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगास निदर्शनास आल्याने त्यांनी त्याबाबत गंभीर दखल घेऊन संबंधित बाल कल्याण समिती व चाईल्डलाईन यांना संयुक्तरित्या चौकशीचे निर्देश दिले आहेत. त्याचा अहवाल शासनास अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(८१) * ४४९५२ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड (जि.रायगड) हा आदिवासी बहूल तालुका म्हणून ओळखला जात असून या तालुक्यात पाली व जांभुळपाडा ही दोन प्राथमिक आरोग्य केंद्र असून या अंतर्गत १४ उपकेंद्र आहेत. आरोग्य विभागातील रिक्त पदे व औषध पुरवठ्याअभावी येथील बालके, गर्भवती महिला व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य केंद्रात लोकसंख्येच्या तुलनेत एकूण ४ वैद्यकीय अधिकाऱ्यांची आवश्यकता असून ३ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर असून त्यापैकी केवळ १ वैद्यकीय अधिकारी सेवेत असून २ पदे रिक्त आहेत, त्यामुळे रुग्णांची व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रुपये ५४००/-) संवर्गाची प्रत्येकी २ पदे मंजूर असून दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रत्येकी १ पद भरलेले आहे. इतर संवर्गाची एकूण मंजूर पदांपैकी फक्त ४ पदे रिक्त आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रात व उपकेंद्रात रुग्णांना आवश्यक आरोग्य सेवा तात्काळ दिली जाते.

(३) वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने विभागीयस्तरावर भरण्यास परवानगी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोहदुरा (जि.भंडारा) येथे वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याबाबत

**(८२) * ४५१४७ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहदुरा (जि.भंडारा) येथे शासनाने लक्षावधी रुपये खर्च करुन आरोग्य केंद्राची सुसज्ज इमारत आणि कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी सदनिकेची व्यवस्था केली असून सुध्दा वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याने रुग्णांचे हाल होतअसून रुग्णांना उपचाराअभावी परत जावे लागत असल्याची बाब माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच भविष्यात असे प्रकार घडू नयेत म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भीमा नदीवरील उजनी लाभक्षेत्रातील शेतीसाठी पाणी परवाने सुरू करणेबाबत

**(८३) * ४४१३३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भीमा नदीवरील उजनी लाभक्षेत्रातील शेतीसाठी पाणी उपसा करण्यासाठीचे पाणी परवाने बंद आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणी परवाने किती दिवसांपासून बंद आहेत व पाणी परवाना बंद असलेल्या काळात सदर पाणी इतर योजनासाठी वापरण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पाणी परवाना भीमा नदीवरील मूळ लाभधारक असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी सुरु करण्याची मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भीमा नदीवरील उजनी लाभक्षेत्रातील शेतीसाठी नवीन पाणी परवाने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) भीमा नदीवरील उजनी लाभक्षेत्रातील भीमा नदीवरील ज्या को.प. बंधाऱ्यावरील देय क्षेत्र संपुष्टात आले आहे, तेथील पाणी परवाने बंद आहेत.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयात सिंचन विहिरींचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(८४) * ४४७१४ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३३२१३ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयात सिंचन सुविधा वाढविण्याच्यादृष्टीने मंजूर ४५०० विहिरींचे उद्दिष्ट दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दिनांकाच्या उद्दिष्टापर्यंत विहिरींचे बांधकाम पूर्णत्वास गेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विहीरींचे बांधकामांचे उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

गडचिरोली जिल्ह्यात ४५०० सिंचन विहिरीचे आदेश प्रदान करण्यात आलेले होते. त्यापैकी एकूण ४४८६ सिंचन विहिरी सुरु करण्यात आले. ३२८३ विहिरीची कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यात आलेली आहेत. २६२३ सिंचन विहिरीला पूर्णत्वाचे दाखले प्रदान केलेले आहेत. तसेच १२०३ विहिरीची कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) व (४) तांत्रिक व आवाक्या बाहेरील बाह्य कारणामुळे उद्दीष्ट गाठता आले नाही त्यामुळे कारवाई करण्याबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत बनावट जात प्रमाणपत्र सादर केल्याबाबत

**(८५) * ४५०३६ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत राखीव जागांचा लाभ घेण्यासाठी गैर आदिवासी विद्यार्थी यांच्याकडून बनावट जात प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक केल्याचा प्रकार माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, 'निट' परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अनेक विद्यार्थी बनावट जात प्रमाणपत्राच्या आधारे राखीव जागांवर प्रवेश घेऊन जात वैधता प्रमाणपत्र सादर करत नसल्याचा प्रकारही निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही, हे खरे नाही. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशांमध्ये अशा प्रकारची कोणतीही घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) नाही, हे खरे नाही. सन २०१८-१९ च्या नीट-युजी-२०१८ च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये सर्व मागासवर्गीय राखीव कोटयातील प्रवेशाकरीता उमेदवाराने प्रवेशाचे वेळेस जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केलेले आहे. उमेदवारांकडे वरील प्रमाणपत्रे नसल्यास त्यांना प्रवेश प्रक्रियेकरीता अपात्र ठरविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ट्रायसेम व मिनी आय.टी.आय. कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(८६) * ४४४२० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामविकास विभागांतर्गत ट्रायसेम व मिनी आय.टी.आय. कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचारी हे गेल्या २० ते २५ वर्षापासून दरमहा एकत्रित वेतनावर काम करीत असून त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ट्रायसेम व मिनी आय.टी.आय कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. तथापि, ट्रायसेम व मिनी आयटीआय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी सेवेत नियमित करण्याबाबत विविध न्यायालयात याचिका दाखल केलेल्या असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मराठवाड्यातील जायकवाडी धरण येथे पर्यटकांसाठी सोयी सुविधा पुरविण्याबाबत

**(८७) * ४४६८७ श्री.सुभाष झांबड, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात जायकवाडी, येलदरी, सिध्देश्वर, माजलगाव, विष्णुपूरीसह ११ जलप्रकल्प असून जायकवाडी हे सर्वाधिक मोठे धरण पर्यटकांसाठी बाराही महिने आकर्षणाचे केंद्र बिंदू ठरत असून तेथे पर्यटकांना सोयी-सुविधाअभावी अनेक अडचणींना तोंड दयावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात जलसंपदा विभागांतर्गत १३८ मोठे, २५५ मध्यम व २ हजार ८६२ लघुपाटबंधारे प्रकल्प असून यामध्ये अनेक धरणे ही निसर्गरम्य ठिकाणे आहेत त्यामुळे धरण परिसराचा बांधा-वापरा व हस्तांतरीत करा या तत्वानुसार विकास केल्यास मोठ्या प्रमाणात ग्रामीण विभागात पर्यटन विकसित होऊन स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने धरणांची व धरण परिसरात येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेबाबत तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) जायकवाडी प्रकल्प व इतर प्रकल्पांचे ठिकाणी पर्यटकांना धरण पाहाण्यासाठी नियंत्रित स्वरुपात सोय उपलब्ध आहे. पर्यटकांना आवश्यकतेनुसार सोयी-सुविधा पुरविणे, ह्याबाबतचे नियोजन पर्यटन विकास महामंडळामार्फत करण्यात येते. त्या अनुषंगाने शासनाने पर्यटन धोरण, २०१६ निश्चित केले आहे.

(२) होय.

(३) मोठ्या धरणांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणे शिवाय आवश्यकतेनुसार स्थानिक सुरक्षा यंत्रणांमार्फत व्यवस्था करण्यात येते. राज्यातील धरणस्थळे पर्यटनासाठी उपयुक्त असल्याने त्या करीता बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (BOT) या धर्तीवर राज्याचे एकात्मिक धोरण तयार करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १४/०८/२०१८ अन्वये समिती गठित केली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर याबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र या आरोग्य संस्थांच्या बृहत आराखड्याचे निकष बदलण्याबाबत

**(८८) * ४४८२९ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र या आरोग्य संस्थांच्या स्थापनेबाबतच्या सन २०१० व २०१७ च्या बृहत आराखड्यानुसार मार्गदर्शक सूचनाप्रमाणे रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामीण भागाकरीता लोकसंख्येचे निकष बदली करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) आरोग्य सेवा संचालयाने सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे जोड बृहत आराखडा तयार करताना लोकसंख्येचे/अंतराचे निकषामध्ये बदल केले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मु.पो.उमरठ (ता.पोलादपूर, जि.रायगड) या नरवीर तानाजी मालुसरे यांचा पुतळा उभारण्याबाबत

**(८९) * ४५९६० श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.उमरठ (ता.पोलादपूर, जि.रायगड) या नरवीर तानाजी मालुसरे यांच्या जन्मगावी त्यांचा पुतळा उभारुन सुशोभिकरण करण्याबाबत दिनांक ८ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.पर्यटन मंत्री यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांना प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, रायगड यांनी प्रस्ताव सादर केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माजलगांव (जि.बीड) येथील रस्त्याचे काम खाजगी तत्वावर कारखान्याला दिल्याबाबत

**(९०) * ४५३५० श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगांव (जि.बीड) येथील जयमहेश साखर कारखान्याच्या बाजूने पाटबंधाऱ्याची चारी असून या चारीच्या बाजूने जाणाऱ्या रस्त्याचे काम हे खाजगी तत्वावर चालत असलेल्या कारखान्याला देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटबंधारे विभागाने या रस्त्याचे काम गैरव्यवहार करुन खाजगी कारखान्याला दिले असल्याने या रस्त्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवून चारीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होवू शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत काही प्रकरणे न्यायप्रविष्ट असतानाही पाटबंधारे विभागाने या रस्त्याला परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यावर फसवणूक केल्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती यांना क्रिमिलेअरमधून वगळण्याबाबत

**(९१) * ४४०६५ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गास क्रिमिलेअर मर्यादेतून वगळण्याबाबतचा प्रस्ताव माहे जुलै, २०१७ पासून शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी राज्य मागासवर्ग आयोगाकडून स्वयंस्पष्ट अहवाल प्राप्त झाला असूनही याबाबत शासनाकडून जनतेच्या हरकती व सूचना मागविण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतर मागास वर्ग (ओबोसी) विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गास क्रिमिलेअर मर्यादेतून वगळण्याचा निर्णय झाला असतानाही सदर प्रकरण राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठवण्याचे कारण काय आहे,

(४) असल्यास, इतर मागास वर्ग (ओबीसी) क्रिमिलेअर मधून वगळण्याची तरतूद कायद्यात नसतानाही शासन सदर प्रकरण राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठवून वेळकाढूपणा करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त दोन्ही प्रवर्गांना क्रिमिलेअर मर्यादेतून वगळण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) राज्य मागासवर्ग आयोगाकडून प्राप्त झालेला अहवाल शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येऊन त्या आधारे प्राप्त झालेल्या हरकती/शिफारशी व तक्रारी याबाबत मागासवर्ग आयोगाचा अहवाल येणे क्रमप्राप्त आहे. मागासवर्ग आयोगाकडून अहवाल प्राप्त झाल्यावर अहवाल तपासून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## नंदुरबार जिल्हा रुग्णालय येथील नर्सिंग स्कुल कार्यान्वित करण्याबाबत

**(९२) * ४५३८१ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ४२५९४ ला दिनांक ५ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हा रुग्णालयाच्या नर्सिंग स्कुलची क्षमता तपासणीचा अहवाल वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडून वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडुन आवश्यक ते प्रमाणपत्र प्राप्त होऊन महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची सुसाध्य तपासणी होऊन शासनाकडून अंतिम मान्यता मिळून दिनांक १ ऑगस्ट, २०१८ पासून स्कुल कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनाने राज्यामध्ये पदविकास्तरीय परिचर्या अभ्यासक्रमास मान्यता देण्याच्या अनुषंगाने दिनांक १३/०७/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित केले असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरीवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या चारही बाजूंनी अनधिकृत झोपड्यांचे अतिक्रमण झाल्याबाबत

**(९३) * ४४८९८ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या चारही बाजूंनी अनधिकृत झोपड्यांचे अतिक्रमण झाल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या चारही बाजूंनी अनधिकृत झोपड्या निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनक्षेत्रावर अनधिकृत झोपड्यांचे अतिक्रम झाल्याची बाब यापूर्वीच सन १९९५ चे दरम्यान निदर्शनास आली आहे. वनक्षेत्रावरील अतिक्रमणाबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ३०५/९५ मध्ये दिनांक ०७/०५/१९९७ आणि दिनांक १७/०७/१९९९ रोजी दिलेल्या आदेशानुसार अतिक्रमकांचे उद्यानाबाहेर पुनर्वसन करण्याची प्रक्रिया कार्यान्वित आहे. तसेच नविन अतिक्रमण तात्काळ निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात येते.

सन २०१८-२०१९ मध्ये माहे सप्टेंबर, २०१८ पर्यंत ४२ अनधिकृत निवासी झोपड्या व व्यापारी बांधकामे निष्कासित केले असून, ०.१९१६ हेक्टर क्षेत्र मोकळे करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हदगाव (जि.नांदेड) तालुक्यातील बरड, शेवाळा व मानवाडी येथील झाडांची कत्तल केल्याबाबत

**(९४) * ४४९८४ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव तालुक्यातील (जि.नांदेड) बरड, शेवाळा व मानवाडी येथील रस्त्यालगतच्या झाडांची रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली बेसुमार कत्तल केली जात असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय महामार्ग ३६१ या प्रकल्पांतर्गत रस्ता रुंदीकरण क्षेत्रातील बाधित होणाऱ्या झाडांची वृक्षतोड परवानगी नियमाप्रमाणे दिलेली असून त्यानुसारच वृक्षतोड झालेली आहे. मौजे बरड व शेवाळा येथील रस्त्यांच्या हद्दीमध्ये बाधित होणाऱ्या झाडांची संख्या अनुसूचित गैरी-१५ व मौजे

मानवाडी फाटा येथील रस्त्यांच्या हद्दीमध्ये बाधित झाडांची संख्या १० असे एकूण २५ झाडे वनपरिक्षेत्र अधिकारी, हदगाव यांनी दिनांक १२/०३/२०१८ अन्वये दिलेल्या वृक्षतोड आदेशान्वये करण्यात आली आहे. सदर एकूण २५ झाडापासून निघालेला एकूण १२ घ.मी. मालास वाहतूक पास देऊन वाहतूक करण्यात आली आहे. सदर ठिकाणी रस्ता लगत इतर कुठल्याही प्रकारची अवैध वृक्षतोड झालेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## हिंगोली जिल्हयात स्वतंत्र स्त्री रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(९५) * ४४६३८ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयाच्या ठिकाणी स्वतंत्र स्त्री रुग्णालयाबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयाच्या निर्मितीपासून जिल्हयाच्या मुख्यालयी आरोग्य सुविधा नाममात्र असून जिल्हा सामान्य रुग्णालयाचे मागील दोन वर्षापासून विस्तारीकरण सुरु असून सदर रुग्णालयात अनेक सोयी सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, स्वतंत्र स्त्री रुग्णालयाबाबत प्रस्तावावर केव्हापर्यंत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

हिंगोली येथे १०० खाटांचे स्त्री रुग्णालय दिनांक १७/०१/२०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

हिंगोली येथे १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय सुरु आहे. या रुग्णालयाचे मागील दोन वर्षापासून विस्तारीकरण प्रगतीपथावर असून रुग्णांना सोयी सुविधा देण्यात येत आहेत.

(३) बांधकाम पूर्ण करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक स्तरावरुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे. सदर कामासाठी रुपये १०७१.७० लक्षपैकी आतापर्यंत रुपये ७७७.५३ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.
(४) अधीक्षक अभियंता, नांदेड यांच्याकडून स्त्री रुग्णालय, हिंगोलीच्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त होताच प्रशासकीय मान्यता देण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## नगरपरिषद व महानगरपालिकेतील शिक्षकांना जिल्हा परिषद शाळेमध्ये बदली मिळण्याबाबत

**(९६) * ४५३१६ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषदेतील शिक्षक परस्पर सहमतीने नगर परिषद, महानगरपालिका यांच्या आस्थापनेवर सेवावर्ग होवु शकतात असा शासन निर्णय दिनांक २६/२९ जून, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरपरिषद व महानगरपालिकेतील शिक्षक जर ग्रामविकासांतर्गत जिल्हा परिषदेमध्ये सेवावर्ग होण्यास तयार असतील तर त्यांच्यासाठी शासन निर्णय नाही, याबाबत शासनाची भुमिका काय आहे,
(३) असल्यास, दिनांक २६/२९ जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयाची राज्यामध्ये तसेच जिल्हास्तरावर अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दिनांक २६/२९ जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ च्या नियम ५(९) मध्ये राज्य शासनाच्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार प्रस्थापित झालेल्या कोणत्याही महानगरपालिका किंवा नगरपरिषदेच्या विवाहीत स्त्री कर्मचाऱ्याने विनंती अर्ज केल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, अशा कर्मचाऱ्याची राज्य शासन, महानगरपालिका किंवा यथास्थिती नगरपरिषद आणि जिल्हा परिषद यांच्यामध्ये परस्पर संमत होतील अशा अटी व शर्तींवर जिल्हा परिषद सेवेतील पदांवर नियुक्ती करु शकेल, अशी तरतूद करण्यात आली असून, सदरची सवलत ही केवळ विवाहीत स्त्री कर्मचाऱ्याकरीता आहे.

(३) व (४) अशी बाब शासनस्तरावर आढळून आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेर्डा (ता.जि.हिंगोली) येथील डिग्रसवाणी ते पळसोळा रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(९७) * ४५५७४ श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेर्डा (ता.जि.हिंगोली) येथील डिग्रसवाणी ते पळसोळा रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करुन रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून हिंगोली तालुक्यातील प्रजिमा ०२ ते डिग्रसवाणी पळसोना खानापुर बंगला या इतर जिल्हा मार्ग क्र. ४ चा भाग रस्ता आहे. या भाग रस्त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. असून त्यापैकी ०/०० ते २/०० कि.मी. या लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम मंजूर असून सदर काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत २/०० ते ४/०० कि.मी. लांबी वाहतुकीसाठी योग्य आहे.

प्रश्नांकित लांबीतील काम यापूर्वी झाले नसल्याने ठेकेदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुम (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील ईट प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(९८) * ४५८६२ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) ईट प्राथमिक आरोग्य केंद्रात २४ गावे येत असून तेथे १ वैद्यकीय अधिकाऱ्यासह १२ जागा रिक्त असल्याने येथील आरोग्य सेवेवर परिणाम होत असल्याची बाब दिनांक २० सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ईट प्राथमिक आरोग्य केंद्रात सध्या अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्यांना जास्त वेळ व अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ईट प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र ईट, ता.भुम, जि.उस्मानाबाद येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण १७ पदे मंजूर असून ८ पदे भरलेली व ९ पदे रिक्त आहेत.

सदर पदांमध्ये वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गाची २ पदे मंजूर असून १ पद भरलेले आहे.

(३) वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता विभागीयस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील कोपर ग्रामपंचायतीच्या विविध विकास कामांमध्ये गैरव्यवहार केल्याबाबत

**(९९) * ४६१४३ श्री.रमेश पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील कोपर ग्रामपंचायतीच्या विविध विकास कामांमध्ये गैरव्यवहार केल्याप्रकरणी तत्कालीन सरपंच साधना घरत व तत्कालीन ग्रामविकास अधिकारी डी.एल.पावशे यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी मागणी कोपरचे माजी सरपंच श्री.जगदीश पाटील यांनी आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली असल्याची बाब माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील कोपर ग्रामपंचायतीच्या विविध विकास कामांमध्ये गैरव्यवहार केल्या प्रकरणी तत्कालीन सरपंच साधना घरत व तत्कालीन ग्रामविकास अधिकारी डी.एल.पावसे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा अशी मागणी कोपरचे माजी सरपंच श्री.जगदीश पाटील यांनी आयुक्त, कोकण विभाग याचेकडे दिनांक ०८/०२/२०१८ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

(२) व (३) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी यांचेकडील चौकशी अहवालानुसार सदरील कामाबाबत गैरव्यवहार आढळून येत नाही परंतु अनियमितता झाली असल्याचे गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी यांचे उत्तरावरुन निदर्शनास येत आहे.

संबंधित ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांचेकडून झालेल्या अनियमिततेबाबत श्री.राकेश वसंत जोशी, ग्रामसेवक यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करणारी तात्पुरत्या स्वरुपात रोखण्याची शास्ती करण्यात आली असून श्री.डी.एल.पावसे, ग्रामविकास अधिकारी यांची अन्य जिल्ह्यात बदली झाल्याने एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करणारी तात्पुरत्या स्वरुपात रोखण्याची शास्ती करणेबाबत प्रस्तावित आहे. त्यानुसार संबंधित जबाबदार ग्रामविकास अधिकारी यांचेवर प्रशासकीय कारवाई करण्यात येत आहे. तसेच तत्कालीन सरपंच सौ.साधना श्रीकांत घरत ह्या सरपंच पदावर कार्यरत नसुन प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झाला नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच झालेल्या विलंबाबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी यांना कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली असून पुढील कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

## परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील रुई-दुधी ग्रामपंचायतीने आर.ओ. प्लान्ट बसविण्याच्या निर्णय घेतल्याबाबत

**(१००) * ४६२७० श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुई-दुधी ग्रामपंचायतीने (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) ग्रामस्थांना शुध्द पाणीपुरवठा व्हावा याउद्देशाने चौदाव्या वित्त आयोगातून आर.ओ. प्लान्ट बसविण्यासाठी रुपये २ लाख ९४ हजार इतकी रकमेचे आर.ओ. प्लान्टचे साहित्य दिनांक १६ मे ते ८ जून, २०१६ या कालावधीत खरेदी करण्यात आले असता प्रत्यक्षात प्लान्ट मात्र सन २०१८ मध्ये कार्यान्वित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, आर.ओ. प्लॉन्ट कार्यान्वित नसल्याबाबतच्या तक्रारी संबंधिताकडे प्राप्त होऊ लागल्यावर सरपंच व ग्रामसेवकांनी घाईने दोन प्लान्ट कार्यान्वित केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

उक्त प्रकरणी पंचायत समितीस्तरावरुन चौकशी करण्यात आली असून सदर चौकशीमध्ये संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांनी दिनांक १६ मे ते ०८ जून, २०१६ या कालावधीत रुपये २,९४,०००/- इतकी रक्कम उचलून आर.ओ. प्लान्ट कार्यान्वित न केल्याचे निदर्शनास आले असून रुपये ४०००/- इतकी रक्कम मुल्यांकनापेक्षा जादा उचल कलेली आहे. तसेच दिनांक १६ मे, २०१६ ते प्लान्ट कार्यान्वित होईपर्यंतच्या कालावधीचे उचल केलेल्या निधीवरील व्याजाची रक्कम रुपये ४९,३००/- अशी एकूण रक्कम रुपये ५३,३००/- (इतकी रक्कम) सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडून ५० टक्के प्रमाणे समप्रमाणात पूर्ण वसूल करण्यात आलेली आहे.

तसेच संबंधित दोषी ग्रामसेवक यांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात एक वर्षासाठी थोपविण्याची शास्ती करण्यात आलेली आहे. संबंधित दोषी सरपंच यांचेविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (१) नुसार कारवाई प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून मिळालेला निधी वापराविना असल्याबाबत

**(१०१) * ४५२३१ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विक्रम काळे, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ग्रामीण व शहरी भागात संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांसाठी मोठ्या प्रमाणात केंद्राकडून निधी उपलब्ध होत असूनही मागील चार वर्षात आरोग्य विभागाने त्यातील सुमारे रुपये ३ हजार २ कोटी वापरले नसल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय, त्यात कोणत्या बाबी स्पष्ट झालेल्या आहेत,

(३) असल्यास, सदरील निधीचा वापर करण्यास आरोग्य विभागातील उच्चपदस्थ अधिकारी व कर्मचारी यांनी दुर्लक्ष व अनास्था दाखविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधीचा योग्य विनियोग न करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही. हे खरे नाही.

(२) होय, आढाव्यात एकूण रुपये ६८६.६० कोटी निधी प्राप्त झाला व त्यापैकी रुपये ४३५.१२ कोटी खर्च झाल्याचे निदर्शनास आले.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासनाच्या अखत्यारीत असलेली महामंडळे तोट्यात असल्याबाबत

**(१०२) * ४४५७२ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ६६ महामंडळे असून सदरील महामंडळाचा एकूण तोटा ३७ हजार कोटीवर गेल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका आर्थिक वर्षात महामंडळांना १७ हजार कोटींपेक्षा जास्त तोटा सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या अखत्यारीतील तोट्यात असलेल्या २२ मंडळांपैकी फक्त दोन मंडळे बंद करण्यात आली असून उर्वरित २० मंडळे बंद करण्याची कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तोट्यात असलेली महामंडळे बंद किंवा पुनर्जिवीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) एकूण ६६ कार्यान्वित राज्य सार्वजनिक उपक्रमांपैकी ४२ उपक्रम नफ्यात चालत असून उर्वरीत २४ उपक्रम तोट्यात चालत आहेत. राज्यातील सर्व उपक्रमांचा एकत्रित संचित तोटा रुपये ३५,२२१.३५ कोटी इतका असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) एका आर्थिक वर्षात एकूण ६६ कार्यान्वित राज्य सार्वजनिक उपक्रमांपैकी ५० उपक्रमांना नफा झाला आहे आणि १६ उपक्रमांना तोटा झाला आहे व या सर्व उपक्रमांचा एकत्रित तोटा एकूण रुपये १७,३५४.५४ कोटी इतका असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) अकार्यान्वित असलेले प्रश्नाधीन २२ उपक्रम संपूर्णत: बंद झालेले नाहीत.

(४) विविध प्रशासकीय विभागाच्या अखत्यारीतील तोट्यात असलेल्या सार्वजनिक उपक्रमांनी त्यांचा संचित तोटा टप्प्याटप्प्याने कमी करुन नफ्यात येण्याबाबत उपाययोजना करण्याबाबत आणि जर नफ्यात येऊ शकले नाहीत तर संचित तोटा निरसित करुन ना-नफा ना-तोटा तत्वावर उपक्रम चालविण्याचा प्रयत्न करावा अशा सूचना प्रशासकीय विभागांना वेळोवेळी दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रेवली (ता.दापोली, जि.रत्नागिरी) धरणाच्या प्रलंबित कामाबाबत

**(१०३) * ४४५५८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेवली (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील शासनाने मंजूरी दिलेल्या धरणाच्या कामाची अंदाजित किंमत रुपये ९ कोटी ३२ लक्ष असून धरणाच्या कामास प्रत्यक्षात दिनांक २१ फेब्रुवारी, २००९ रोजी वा त्यासुमारास सुरूवात झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धरणामध्ये जमिनी गेलेल्या प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा एकूण ९ कोटी ६५ लाख मोबदला न मिळाल्यामुळे जोपर्यंत जमिनीचा मोबदला मिळत नाही तोपर्यंत धरणाचे काम होऊ देणार नाही असा पवित्रा घेतल्याने सन २०१३ पासून धरणाचे काम संपूर्णत: बंद पडलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, अर्धवट राहिलेल्या धरणाच्या कामाची किंमत रुपये ३५ कोटीच्या पुढे गेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने धरणाचे अर्धवट स्थितीत बंद पडलेले काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्याच्यादृष्टीने तसेच प्रकल्पग्रस्तांना मोबदला देणे संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

प्रकल्पग्रस्तांना भूसंपादनाची रक्कम प्राप्त न झाल्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी योजनेचे काम रोखून ठेवलेले होते. सद्य:स्थितीत रुपये १.७२ कोटीचा मोबदला वाटप करणेत आल्यामुळे प्रकल्पग्रस्तांचा विरोध कमी झाला आहे. योजनेचे भूसंपादन करणेसाठी आवश्यक रुपये ८.०१ कोटी निधी प्राप्त होताच भूसंपादनाच्या उर्वरित मोबदल्याचे वाटप करण्यात येईल.

(३) योजनेच्या संपादित क्षेत्राचा अंतिम निवाडा सन २०१४ मध्ये जाहीर झालेला आहे. तद्नंतर निधीच्या उपलब्धतेनुसार रुपये १.७२ कोटीचा मोबदला वाटप करण्यात आलेला आहे. निधी उपलब्ध होताच उर्वरित मोबदल्याचे वाटप करण्यात येईल.

(४) होय.

(५) सद्य:स्थितीत प्रकल्पग्रस्तांना भूसंपादनाप्रित्यर्थ रुपये १.७२ कोटीचे मोबदला वाटप करणेत आले आहे. भूसंपादनाची उर्वरित रक्कम निधी उपलब्धतेनुसार प्रकल्पग्रस्तांना देण्यात येईल. प्रकल्पाचे उर्वरित काम सन २०२० पर्यंत पूर्ण करणेचे नियोजित आहे.

-----------------

## आरोग्य संचालनालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१०४) * ४४५०१ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य सेवेची गती वाढविण्याबरोबरच प्रशासकीय कामकाज प्रभावी करण्यासाठी राज्यात दोन आरोग्य संचालक असावेत असा दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी निर्णय झालेला असतानाही आजमितीस ८ महिने उलटल्यानंतरही दुसऱ्या संचालकाची नियुक्ती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेंट जॉर्ज रुग्णालय येथील आरोग्य संचालनालयातील सहसंचालक, अतिरिक्त संचालक, उपसंचालक तसेच सहायक संचालकाची अनेक पदे रिक्त असल्याने आरोग्य विभागाच्या कामकाजावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुसरे संचालक पद न भरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आरोग्य संचालकाचे पद तसेच आरोग्य संचालनालयातील रिक्त पदे विनाविलंब भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

आरोग्य विभागातील सहसंचालक, अतिरिक्त संचालक, उपसंचालक तसेच सहायक संचालकांची पदे श्रेणीअवनत करुन भरण्यात आली आहेत.
(३) संचालकाच्या दोन पदापैकी एक पद नामनिर्देशनाने भरण्यात आले आहे. व दुसरे पद पदोन्नतीने भरण्यासाठीचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला आहे.
(४) आरोग्य सेवा संचालनालयातील अतिरिक्त संचालक, सहसंचालक, उपसंचालक ही पदे पदोन्नतीने भरण्यासाठीचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाकडून अद्ययावत गोपनीय अहवाल व इतर माहिती मागविण्यात आली आहे. त्यानुसार संचालनालयाकडून माहिती मागविण्यात आली आहे. तसेच जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ पदावर पदोन्नतीसाठीचा प्रस्तावही संचालनालयाकडून मागविण्यात आला आहे. व महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० ग्रेड पे रुपये ६६००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील नामनिर्देशनाची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून ३ वर्षासाठी (दिनांक ३०/०९/२०२१ पर्यंत) वगळून ती निवडमंडळामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात चालविण्यात येणाऱ्या विशेष दत्तक संस्थांची तपासणी करण्याबाबत

**(१०५) * ४४१५१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६३ दत्तक विधानांच्या संदर्भातील संस्थांची छाननी करुन चौकशी करण्याचे आदेश शासनाने माहे ऑगस्ट, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, सदरहू चौकशीच्या अनुषंगाने संबंधित संस्थावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) असल्यास, दत्तक विधानाला मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी व जिल्हा न्यायाधीश यांना देण्याचा शासनाचा विचार चालू असून या संदर्भात केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

"मिशनरीज ऑफ चॅरिटी" या स्वंयसेवी संस्थेमार्फत राज्यात चालवण्यात येणाऱ्या विशेष दत्तक संस्थांची तपासणी करण्याबाबत केंद्र शासनाचे ऑगस्ट, २०१८ मध्ये निर्देश होते.

(२) 'मिशनरीज ऑफ चॅरिटी' या स्वंयसेवी संस्थेस मुंबई उपनगर व अमरावती येथे विशेष दत्तक संस्था म्हणून मान्यता आहे. तथापि, संबंधित संस्थेने स्वत:हून दत्तक विधानाचे काम थांबविलेले आहे.

(३) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ कलम ६१ नुसार दत्तक आदेशाबाबतचे अधिकार जिल्हा न्यायालय यांचेकडे आहेत. याबाबत बदल करण्याचा अधिकार केंद्र शासनाकडे आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पाळणाघरांसाठी नियमावली जाहीर करण्याबाबत

**(१०६) * ४४२८२ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाल हक्कासाठी काम करणाऱ्या संस्थांकडून पाळणाघरांची नोंदणी सक्तीची करावी तसेच मुलांच्या सुरक्षेसाठी पाळणाघर चालकांनी नियमांचे पालन करण्याची मागणी शासनाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य महिला आयोगाने राज्यातील पाळणाघरांची सविस्तर नियमावली तयार करून दीड वर्षापूर्वी शासनाकडे सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नियमावलीचे थोडक्यात स्वरूप काय आहे, उक्त नियमावलीची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) राज्यात चालविण्यात येणाऱ्या सर्व पाळणाघरांसाठी कार्यपध्दती/कार्यनियमावली तयार करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून लवकरच सर्व समावेक्षक नियमावली लागु करण्यात येणार आहे. महिला आयोगाने पाळणाघरांसाठी नियमावली तयार केली होती, परंतु केंद्र शासनाने तयार केलेली राष्ट्रीय पाळणाघर योजनेची नियमावली सुलभ असल्यामुळे पुन्हा नव्याने नियमावली तयार करण्याची आवश्यक्ता दिसून न आल्यामुळे महिला आयोगाने तयार केलेली नियमावली लागु करण्यात आलेली नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील कळमेश्वर रेंजच्या सातनवारी बीट अंतर्गत सागवनाची अवैधरित्या वृक्षतोड करण्यात आल्याबाबत

**(१०७) * ४४८४९ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर रेंजच्या सातनवारी बीट अंतर्गत वन अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे ४०० च्यावर सागवनाची अवैधरित्या वृक्ष तोडण्यात आल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या झाडांची कत्तल करण्याचे अधिकार नसतानाही हिंगणा रेंज वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी झाडे तोडण्याची परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच भविष्यात असे प्रकार घडू नयेत म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) नागपूर विभागातंर्गत तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी, हिंगणा यांनी महाराष्ट्र वृक्षतोडीबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ अंतर्गत वृक्ष अधिकारी म्हणून एका प्रकरणी त्यांचे दिनांक ३१/०३/२०१७ चे आदेशानुसार नागपूर ग्रामीण तालुक्यांतर्गत मौजा माळेगांव (खुर्द) येथील ५९७ वृक्षांच्या तोडीबाबत परवानगी दिलेल्या ५९७ वृक्षांपैकी ३९४ वृक्ष हे लगतच्या कळमेश्वर वनपरिक्षेत्रातील सातनवरी नियतक्षेत्राचे संरक्षित वनापैकी होते. वृक्ष अधिकारी यांचे उक्त आदेशाचे अनुषंगाने संरक्षित वनक्षेत्रात ३९४ वृक्षांची अवैध वृक्षतोड झाल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये निदर्शनास आलेले आहे.

(२) महाराष्ट्र वृक्षतोडीबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ नुसार वृक्ष अधिकारी म्हणून फक्त वनेत्तर क्षेत्रात (नागरी क्षेत्र वगळून) वृक्षतोडीची परवानगी देण्याचे अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी यांना आहेत. तथापि, सदरची वृक्षतोड दोन वनपरिक्षेत्रांच्या सिमावर्ती भागात झालेली आहे. वृक्षतोडीचे आदेश निर्गमित करतांना खाजगी क्षेत्र व वनक्षेत्राच्या सीमेबाबत पूर्णपणे शहानिशा अभावी संरक्षित वनक्षेत्रातील वृक्षांची तोड झाली असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी हिंगणा, वनपाल, वनरक्षक व विभागीय वनसर्व्हेक्षक यांचेस्तरावर निष्काळजी झाली असल्यामुळे संरक्षित वनक्षेत्रातील ३९४ वृक्षांची अवैध वृक्षतोड झाली असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांचेविरुध्द उपवनसंरक्षक, नागपूर यांचेस्तरावरुन शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र वृक्षतोडीबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ अंतर्गत वृक्षतोडीची प्रकरणे हाताळत असताना खाजगी गटांना वनक्षेत्र लागून असल्यास वृक्षतोडीची परवानगी देण्यापुर्वी वनक्षेत्राच्या सीमेबाबत कटाक्षाने शहानिशा करुन घेणेबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी तथा वृक्ष अधिकारी यांना वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत.

-----------------

## मौजे आर्वी (जि.वर्धा) व मौजे बेंबाळ (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथील उपसा सिंचन योजना स्वंयचलित पध्दतीने राबविणेबाबत

**(१०८) * ४५४२७ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आर्वी (जि.वर्धा) व मौजे बेंबाळ (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथील उपसा सिंचन योजना पूर्णत: स्वयंचलित सुक्ष्म सिंचन पध्दतीचा अवलंब करुन राबविण्याचा निर्णय माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात येऊन त्याकरीता रुपये १०० कोटीचा निधीही राखून ठेवण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेंबळा सिंचन प्रकल्पाची सिंचन क्षमता ४७ हजार एवढी असतानाही प्रत्यक्षात फक्त दोन ते अडीच हजार एवढेच सिंचन होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही ठिकाणची सिंचन योजना कार्यान्वित करण्यात आली आहे काय व त्यावर आतापर्यंत किती निधी खर्च करण्यात आला आहे तसेच सदर योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित न होण्याची व शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त सिंचन योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदर योजना योग्यरितीने कार्यान्वित होण्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) निम्न वर्धा प्रकल्पास सन २०१८-१९ साठी मंजूर रुपये २२६ कोटी मधून रुपये ५० कोटी इतकी तरतुद आर्वी उपसा सिंचन योजनेसाठी करण्यात आली आहे. बेंबळा प्रकल्पाचे उपलब्ध तरतुदीतून रुपये ५० कोटी इतकी तरतुद डेहणी उपसा सिंचन योजनेसाठी केली आहे.
(२) हे खरे नाही.

बेंबळा प्रकल्पाची सिंचन क्षमता ४७,००० हेक्टर होती, परंतु सुधारित फेर जल नियोजनानुसार ४५४५५ हेक्टर पर्यंत मर्यादित करण्यात आली आहे. डेहणी उपसा सिंचन योजनेची सिंचन क्षमता ६९६८ हेक्टर असून आतापर्यंत एकूण ४२३८८ हेक्टर (बेंबळा-३६६२० + डेहणी-५७६८) सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे.

बेंबळा प्रकल्पांतर्गत सन २०१६-१७ मध्ये १४,८१० हेक्टर व सन २०१७-१८ मध्ये १०,९९१ हेक्टर प्रत्यक्ष सिंचन झाले आहे. सन २०१८-१९ (सप्टेंबर, १८) मध्ये कालव्याला सिंचनाकरीता पाणी चालू असून सद्य:स्थितीत खरीप हंगाम चालू आहे व खरीप हंगामात प्रत्यक्ष सिंचनाची मोजणी सुरु आहे. रब्बी हंगामात पाणी सोडण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे.
(३) निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत आर्वी उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी दिनांक १८/०६/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आाला असून पूर्णत्वाचा कालावधी २ वर्षे आहे.

तसेच सद्य:स्थितीत डेहणी उपसा सिंचन योजनेची कामे प्रगतीपथावर असून त्यावर आतापर्यंत ४०२.७४ कोटी खर्च झालेला आहे. सदर योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित न होण्याची कारणे पुढीलप्रमाणे :-

१) शेतकऱ्यांच्या शेतात पीक असल्याने कामे करण्याकरीता मार्च ते जून असा अत्यल्प कालावधी उपलब्ध होतो,

२) ठिबक सिंचनाकरीता शेतकऱ्यांचा १० टक्के वाटा असून शेतकरी वाटा भरण्यास उत्सुक नाही,

३) मुख्य कंत्राटदार आय.व्ही.आर.सी.एल. आर्थिक टाळेबंदीच्या अडचणीत असल्यामुळे मागील हंगामापासून कामे बंद आहे.

(४) व (५) बेंबळा नदी प्रकल्प PMKSY अंतर्गत असून डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

आर्वी उपसा सिंचन योजनेचे काम निधीचे उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम ठरवून पूर्ण करण्याचे नियोजन आहे. डेहणी उपसा सिंचन योजनेबद्दल कारणे मुद्दा क्र. ३ मधील उत्तराप्रमाणे आहे. तसेच नियोजनाप्रमाणे सदर योजना पूर्ण होण्यास डिसेंबर, २०१९ पर्यंतचा कालावधी अपेक्षित आहे.

-----------------

## मग्रारोहयोच्या कामाची कुशल देयके प्रलंबित असल्याबाबत

**(१०९) * ४४९६७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकलठाण (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) या गावात ग्रामपंचायतीने मग्रारोहयोंतर्गत सन २०११-१२ यावर्षी सिमेंट नाला बांध व रोपवाटीकेचे काम केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिकलठाण ग्रामपंचायतीच्या सदर कामाचे कुशल देयके सन २०११-१२ पासून शासनाकडे रुपये ९५१०४३.००/- प्रलंबित असून सदर देयके मिळण्यासाठी ग्रामपंचायतीने सन २०११-१२ पासून पाठपुरावा करत असून त्यांना देयके दिली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर थकित कुशल देयके देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, कुशल देयके न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

सदर देयके शासनाकडे प्रलंबित नाहीत. सदर प्रकरणी रुपये ७९७३७२/- इतका निधी आयुक्त नरेगा नागपूर यांच्याकडून EFMS द्वारे ग्रामपंचायत चिकलठाण यांना वर्ग करण्यात आला आहे. उर्वरीत निधीची अदायगी काही तांत्रिक कारणामुळे प्रलंबित आहे ही तांत्रिक अडचण दुर झाल्यानंतर तात्काळ निधी वितरीत करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हा सामान्य रूग्णालयात रक्त तपासणी व सिटीस्कॅन मशीन बंद असल्याबाबत

**(११०) * ४४३५७ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हा सामान्य रूग्णालयात रक्त तपासणी मशीन दोन महिन्यापासून तर सिटीस्कॅन मशीन गेल्या दोन वर्षापासून बंद असल्याचे दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या जिल्हयात टायफाईड, मलेरिया, डेंग्यू या सारखे इतर आजाराची साथ मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने रूग्णांना बाहेरून रक्त तपासणी करावी लागत असल्यामुळे आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने रक्त तपासणी मशीन व सीटीस्कॅन मशीन दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

रक्त तपासणी मशीन (ब्लड सेल काऊन्टर,इ) सुरु आहे. तथापि, एचपीएलसी मशीन व सी.टी.स्कॅन मशीन बंद आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हा रूग्णालय, गडचिरोली करीता नवीन सी.टी.स्कॅन मशीन उपलब्ध होईपर्यंत रूग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता खाजगी स्थानिक रूग्णालयाबरोबर रूग्णनिहाय सी.टी.स्कॅन सेवा घेण्याचा करार करण्यात आला असून रूग्णांच्या आवश्यकतेनुसार त्यांच्याकडून सी.टी. स्कॅन करून घेण्यात येत आहे. यावर होणारा खर्च रूग्ण कल्याण समिती व महात्मा फुले जीवनदायी योजनेंतर्गत भागविण्यात येत येत आहे.

(३) सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे नविन सी.टी.स्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांनी दिनांक २३/१०/२०१८ रोजी पुरवठा आदेश निर्गमित केले आहेत. जिल्हा रुग्णालय, गडचिरोली येथील नादुरुस्त एचपीएलसी मशीन मे.फेबर सिंदुरी मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा.लि. यांच्याकडून दुरुस्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत क्षय रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याबाबत

**(१११) * ४४१८८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्रीमती स्मिता वाघ, श्री.प्रविण दरेकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्षयरोग निर्मुलनासाठी विविध उपाययोजना केल्या जात असल्या तरी मुंबईत या आजारांवर नियंत्रण मिळविण्यात अपयश आले असून चालू वर्षात क्षयरोगाचे प्रमाण १० टक्क्यांनी वाढल्याचे प्रजा फाऊंडेशन यांनी काढलेल्या आरोग्यविषयक श्वेतपत्रिकेनुसार माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्षयरोग निर्मुलनासाठी शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या वैद्यकीय उपचार (डॉट) घेणाऱ्या रुग्णसंख्येत घट होत असून उपचार सुरु असताना १५ टक्के रुग्णांनी उपचार अर्धवट सोडून दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहरातील क्षयरोगावर नियंत्रण मिळविण्यासाठी महानगरपालिकेच्या व शासनाच्या आरोग्य विभागाने कोणत्या उपाययोजना राबविल्या आहेत वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई महानगरपालिका व शासनाच्या आरोग्य विभागामार्फत सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविला जात असून महापालिकेतर्फे मिशन फॉर टीबी कंट्रोल अभियानांतर्गत शासकीय तसेच खाजगी वैद्यकीय संस्थामार्फत क्षयरुग्णांवर औषधोपचार केला जातो. औषधोपचार पूर्ण करण्यासाठी Treatment Supporter नेमण्यात आले असून TISS प्रकल्पांतर्गत १०७ व मुंबई महानगरपालिकाकरीता ५० समुपदेशकांमार्फत समुपदेशन करण्यात येते.

- ३३ जिल्हा क्षयरोग केंद्र व ४६ शहर क्षयरोग केंद्रे स्थापण करण्यात आली आहे, असून ५१७ क्षयरोग पथके कार्यरत आहेत.
- राज्यात १५२० सूक्ष्मदर्शी केंद्रे स्थापित असून मुंबईत १३४ केंद्रे आहेत. राज्यात १२ व मुंबई महानगरपालिकेत ५ Culture D.S.T. प्रयोगशाळांना मान्यता दिली आहे. राज्यात ११७ व मुंबई २२

CBNAAT यंत्रे क्षयरोग निदानासाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

- MDR/XDR रुग्णांच्यासाठी राज्यात ५० उपचार केंद्रे कार्यरत असून त्यापैकी १४ मुंबईत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पांगरे-चिंचवाडी येथील पंचक्रोशीतील गावांना पाणी मिळण्याबाबत

**(११२) * ४६३१६ ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पांगरे-चिंचवाडी येथे लघुपाटबंधारे विभागामार्फत बांधण्यात आलेल्या धरणातील पाणी कालव्याद्‌वारे पंचक्रोशीतील गावांना मिळणार असून संबंधित विभागाकडून गावामध्ये सर्व्हे करण्यास सुरुवात करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पंचक्रोशीतील पाणी टंचाई दूर करण्याकरीता सदरहू धरणातील पाणी कालव्याद्‌वारे ग्रामस्थांना पाणीपुरवठा करण्याचे काम केव्हापर्यंत पूर्ण करणार आहे, तसेच उर्वरित गावांचा सर्व्हे केव्हा पूर्ण करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

सदर प्रकल्पाचे बंदिस्त नलिका वितरण प्रणालीद्‌वारे सिंचनासाठी पाणीपुरवठा करण्याच्या कामासाठी निविदा निश्चितीची कार्यवाही पूर्ण झाली आहे. सद्य:स्थितीत जागेवर प्रत्यक्ष काम सुरु करण्याच्यादृष्टीने संरेखा आखणी संबंधात लाभक्षेत्रातील सर्व गावांच्या सर्व्हेचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(२) सदरचे काम निधी उपलब्धतेनुसार जून, २०२० पर्यंत पूर्ण करुन लाभक्षेत्रातील ग्रामस्थांना सिंचनासाठी पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जलसंपदा विभागाच्या पुणे कार्यालयाने विनावापर पडून असलेली यंत्रे न वापरता भाडे तत्वावर नवी यंत्रे आणल्याबाबत

**(११३) * ४६१०६ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील जलसंपदा विभागाच्या कार्यालयाने सांगोला येथील कालव्यातील गाळ काढण्याकरीता उत्खनन करणारी दोन यंत्रे व चार डंपर्स भाडे तत्वावर घेण्यासाठी रुपये २७ लाखांची निविदा व नीरा उजव्या कालव्यातील गाळ काढण्याच्या कामाकरीता पाच लोडर्स भाडे तत्वावर घेण्यासाठी रुपये १५ लाखांची निविदा काढण्यात आल्याचे दिनांक २९ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या जिल्ह्यातील जलसंपदा विभागाच्या कार्यालयात असलेली यंत्रे तसेच जलयुक्त शिवाराच्या कामांसाठी वापरण्यात आलेली यंत्रेही विनावापर पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर काढण्यात आलेली निविदा रद्द करुन विनावापर पडून असलेली यंत्रे गाळ काढण्याच्या कामाकरीता वापरण्यात यावी तसेच या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी सजग नागरिक मंचाने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) नाही.

(३) होय.

(४) उपरोक्त दोन्ही निविदा तांत्रिक कारणास्तव रद्द करण्यात आल्या आहेत. याबाबत मुख्य अभियंता (यांत्रिकी) यांच्याकडून अहवाल शासनास दिनांक १३/११/२०१८ रोजी प्राप्त झाला असून सदर अहवालाची शासनस्तरावर छाननी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम व फर्निचरची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(११४) * ४५०१३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या सहा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम व फर्निचरची कामे अपूर्ण असल्याने तसेच साखला प्लॉट, ज्ञानेश्वर नगर भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याची तक्रार परभणी येथील लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निविदेतील नमुद केलेला कालावधी पूर्ण होऊनही बांधकाम अपूर्ण राहणे व फर्निचरचे काम पूर्ण होत नसल्याने संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करुन प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये केंद्रनिहाय दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) लेखी निवेदन दिले, हे खरे आहे, परंतु रुग्णांची गैरसोय होते हे खरे नाही.

(२) सांखला प्लॉट, ज्ञानेश्वर नगर येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, खंडोबा बाजार येथील इमारतीचे बांधकाम प्रगती पथावर आहे. फर्निचर खरेदी करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे. विद्युती करण्याचे काम बाकी आहे.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, इनायत नगर येथील इमारत बांधकाम पूर्ण झालेले आहे. संरक्षण भिंतीचे अंशत: बांधकाम बाकी आहे. फर्निचरचे काम बाकी आहे. विद्युती करणाचे काम बाकी आहे.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, खानापूर येथील इमारत बांधकाम पूर्ण झाले आहे. संरक्षण भिंतीचे बांधकाम बाकी आहे. फर्निचरचे काम बाकी आहे. विद्युती करण्याचे काम बाकी आहे.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, सयद तुराबुल हक दर्गा, दर्गा परिसर येथील इमारतीचे बांधकाम प्रगती पथावर आहे. फर्निचरचे काम बाकी आहे.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, शंकर नगर येथे जागा उपलब्ध नसल्याने बांधकाम सुरु झाले नाही. आता "धार रोड" येथे जागा उपलब्ध झाली आहे, याठिकाणी इमारत बांधकाम चालू करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कामगार रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(११५) * ४४१०४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५ कामगार रुग्णालयात (ईएसआय) डॉक्टर, परिचारिका आणि व्यवस्थापनाची १२०० पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून पदे रिक्त असल्याने त्याचा परिणाम रुग्णसेवेवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयांत २०६ डॉक्टर, ३६८ परिचारिका, २५४ निमवैद्यक आणि ३६३ इतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने अपुऱ्या कर्मचाऱ्यांअभावी रुग्णालये बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत राज्य कामगार विमा योजनेत एकूण ११ रुग्णालये कार्यान्वित आहेत. डॉक्टर, परिचारिका व व्यवस्थापनाची एकूण ८६७ पदे रिक्त असून नोव्हेंबर, २०१७ मध्ये गट-क संवर्गातील परिचारिकांची ३७२ पदे व समवैद्यकीय पदांची ११६ पदे महाऑनलाईनमार्फत पदभरतीची प्रक्रिया राबवून सदर पदे भरण्यात आलेली आहेत. तसेच गरजेनुसार विशेषज्ञांची पदे १ वर्षाच्या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने वेळोवेळी नियुक्ती करण्यात येते.

गट-अ व गट-ब संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. गट-ड संवर्गातील बिंदुनामावली प्रमाणित करण्याची कार्यवाही करण्यात येत असून ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर गट-ड संवर्गातील पदे भरती करणे शक्य होईल.

सन २०१७-१८ मध्ये राकावियो रूग्णालयामार्फत ६,१४,१५७ बाहयरूग्णांना व ५४९६१ आंतररूग्णांना उपचार/सुविधा पुरविण्यात आल्या असून, २६३० मोठ्या शस्त्रक्रिया, ७०३० लघुशस्त्रक्रिया करण्यात आल्या तसेच ७२७ प्रस्तुती करण्यात आल्या आहेत. सबब, अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे रूग्णसेवेवर विपरीत परिणाम होत नाही. त्यामुळे रूग्णालये बंद होण्याच्या मार्गावर आहे हे खरे नाही.

-----------------

## उत्तर सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी उपस्थित राहत नसल्याबाबत

**(११६) * ४४४४७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उत्तर सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील कोंडी, तिऱ्हे, कळमण व मार्डी या चारही आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी उपस्थित राहत नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर आरोग्य केंद्रात आपल्या सोयीनुसार सेवा देणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) सदर दिवशी वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते व त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात आलेल्या रुग्णांची तपासणी केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे नायगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील पर्यटक निवास बांधकामाबाबत

**(११७) * ४३९७१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नायगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) हे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव असून येथील पर्यटक निवास बांधकामासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत दिनांक ३१ डिसेंबर, २०११ रोजी पर्यटक निवास बांधणेकरीता रुपये ५०० लक्ष इतका निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर निधीमधून रुपये ३०० लक्ष निधी पर्यटन विकास महामंडळाकडे वितरीत केला आहे व रुपये २०० लक्ष निधी देणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त पर्यटक निवास बांधकामाचे उर्वरित रुपये २०० लक्ष निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय.

(२) व (३) सदर कामास शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या रुपये ३००.०० लक्ष निधी व्यतिरिक्त महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या संकलित व्याजातून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने रुपये १००.०० लक्ष असा आतापर्यंत एकूण रुपये ४००.०० लक्ष निधी सदर कामास उपलब्ध करुन दिला आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून उर्वरित निधीची मागणी प्राप्त झाल्यास निधीच्या उपलब्धतेनुसार सदर कामासाठी उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंबडोस (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील वहाळवाडी ते रवळनाथ मंदिरापर्यंत जोडरस्ता व पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(११८) * ४५२८५ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबडोस (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील वहाळवाडी ते रवळनाथ मंदिरापर्यंत ग्रामस्थांना ये-जा करण्यासाठी पायवाट असून याठिकाणी मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. परंतु सदर मंदिरामध्ये जाण्यासाठी पावसाळयात नाल्यामध्ये मोठ्या प्रमाणात वहाळाचे पाणी येत असल्याने रस्ता वाहतूकीस व येण्याजाण्यास चांगला नसल्याने याठिकाणी जोडरस्ता व पुलाचे काम करुन मिळण्याबाबत मागील ३ वर्षापासून स्थानिकांनी मा.ग्रामविकास मंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सिंधुदुर्ग यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आंबडोस, वहाळवाडी ते रवळनाथ मंदिरापर्यंत ग्रामस्थांना ये-जा करण्यासाठी जोडरस्ता व पुलाचे बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, खरे आहे.

(२) सदर प्रश्नामध्ये नमूद रस्त्याचे व पुलाचे संयुक्त काम करण्यासाठी मोठ्या स्वरुपात निधीची आवश्यकता आहे. पुलाचे काम हाती घेण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांच्याकडून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी यांना कळविण्यात आले आहे. तसेच रस्त्याच्या कामांसाठी जि.प.कडे उपलब्ध होणाऱ्या रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रम/जिल्हा वार्षिक योजना इत्यादी मधून निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा प्रयत्न राहील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नवीन पेन्शन योजनेची रक्कम मिळण्याबाबत

**(११९) * ४४२६२ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नवीन अंशदान पेन्शन योजनेची खाती उघडण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खात्यात खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची हिश्श्याची रक्कम व व्याज जमा करण्यात आले असून, विमुक्त जाती व भटक्या जमाती विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रक्कम व व्याज जमा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमुक्त जाती व भटक्या जमाती विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नवीन पेन्शन योजनेची रक्कम व व्याज जमा करुन हिशेब चिठ्या देण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कर्मचाऱ्यांची रक्कम व व्याज देऊन त्यांना हिशेब चिठ्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, राज्यात सदरहू योजना दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पासून लागू करण्यात आली आहे.

(२) होय. तथापि, यासाठी लेखाशीर्ष मिळाल्यावर कर्मचाऱ्यांच्या हप्त्याच्या हिश्श्याएवढा शासनाचा हिस्सा जमा करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.

(३) होय.

(४) व (५) सदरहू प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालय तसेच औरंगाबाद व नागपूर खंडपीठामध्ये विविध न्यायालयीन प्रकरणे दाखल झालेली आहेत. मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिका क्र. ३६९२/२०१७ मध्ये दिनांक १० जुलै, २०१७ रोजी अंतरिम आदेश दिले आहेत. यानुसार विजाभज आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांकडून या योजनेंतर्गत कर्मचाऱ्यांच्या हप्त्याच्या हिश्श्याएवढ्या रक्कमेची कपात न करण्याचे निर्देश दिले आहेत. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तथापि, राज्य शासनाच्या हिश्श्याची व त्यावरील व्याजाचे प्रदान करण्यासाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुदखेडा (ता.चाळीसगांव, जि.जळगांव) येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदल्याची रक्कम देण्याबाबत

**(१२०) * ४४८६३ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुदखेडा (ता.चाळीसगांव, जि.जळगांव) येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदल्याची रक्कम न दिल्याने मा.न्यायालयाने तापी पाटबंधारे महामंडळाची बँक खाते सिल करण्याचे आदेश दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामंडळाचे खाते सिल केल्याने महामंडळाचे आर्थिक व्यवहार ठप्प झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदल्याची रक्कम रुपये ४० कोटी देण्यास दुर्लक्ष करीत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करुन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची थकित रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

मा.वरिष्ठस्तर न्यायालय, जळगाव यांच्या दिनांक १७/०९/२०१८ च्या आदेशान्वये बँक खाते सिल करण्यात आलेले होते.

तथापि, मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या दिनांक १६/१०/२०१८ च्या आदेशान्वये या आदेशास स्थगिती मिळाली आहे. त्यामुळे व्यवहार ठप्प नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जिल्हास्तरावर नेत्र बँक उभारण्याबाबत

**(१२१) * ४५०४० श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३५ पैकी १३ जिल्हयांमध्ये एकही नेत्र बँक नसल्याने मरणोत्तर नेत्रदानात अडथळा निर्माण होत असल्याचा प्रकार माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला असून जिल्हास्तरावर नेत्र बँक उभारण्याबाबत शासनस्तरावर उदासीनता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हास्तरावर नेत्र बँक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय अंधत्व व दृष्टी क्षीणता नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरावर नेत्र बुब्बळे काढण्यासाठी प्रशिक्षित नेत्रचिकित्सा अधिकारी उपलब्ध असून त्यांचेमार्फत नेत्र बुब्बळे काढून त्यांचे संकलन करुन गरजेनुसार केराटोप्लास्टी सेंटर्सना पुरवठा केला जातो.

(२) ज्या जिल्ह्यामध्ये नेत्रपेढया उपलब्ध नाहीत. तेथील नेत्रदान केलेले नेत्र बुब्बळे ही एम के मिडीयाद्वारे संरक्षित करुन सरासरी ४ ते ५ तासात जवळच्या जिल्ह्यातील नेत्रपेढीमध्ये पोहचवतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोट (जि.अकोला) येथील पोपटखेड टप्पा-२ च्या धरणाच्या अहवालाबाबत

**(१२२) * ४४४८१ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोट (जि.अकोला) येथील पोपटखेड टप्पा-२ च्या धरणाच्या भिंतीमधून गळती सुरु असतानाही सद्य:स्थितीत धरणास कोणताही धोका नाही, धरण पूर्णतः सुरक्षित असल्याचा अहवाल जिल्हाधिकारी व अधीक्षक अभियंत्यांकडे पाठविण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सप्टेंबर महिन्यात ३१ तारीख नसतानासुध्दा या अहवालामध्ये ३१/०९/२०१८ रोजी धरणाच्या पाण्याची पातळी ८६.४० मी. असताना सदर पाझर हा ३.० एवढा असल्याचे नमुद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकारी व अधीक्षक अभियंत्यांची दिशाभूल करुन सादर करण्यात आलेल्या अहवालाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, अकोला यांनी त्यांचे पत्र दिनांक १८/०९/२०१८ अन्वये अधीक्षक अभियंता, अकोला सिंचन मंडळ, अकोला यांचेकडे याबाबत अहवाल सादर केला आहे.

(२) सदर अहवालामध्ये दिनांक ३१/०८/२०१८ ऐवजी दिनांक ३१/०९/२०१८ अशी टंकलेखनातील चुक आहे. दिनांक ३१/०८/२०१८ रोजी धरणाच्या पाण्याची पातळी ८६.४० मी. असताना पाझर हा ३.०० लिटर/प्रति सेकंद एवढा होता व दिनांक ३१/०८/२०१८ ते दिनांक १८/०९/२०१८ दरम्यान धरणातील पाणी पातळी ८८.२५ मी. (१.८५ मी.) वाढली आहे. परंतु पाण्याचा होणारा पाझर हा ३.०० लिटर/प्रति सेकंद वरुन २.१० लिटर/प्रति सेकंद एवढा कमी झाला असल्याचे अहवालात नमूद आहे.

(३) व (४) निचरा चाऱ्यांमधून होणारा पाण्याचा पाझर हा धरण सुरक्षिततेच्यादृष्टीने योग्य असून यामुळे धरणातील अंतर्गत दबाव नियंत्रणात असतो. तसेच धरणातील पाझराबाबत दिनांक ०१/०९/२०१८ पासून नियमित निरीक्षण करुन याबाबत दैनंदिन नोंद ठेवण्यात आली आहे. यावरुन असे निदर्शनास येते की, धरणाची पाण्याची पातळी दिनांक १२/११/२०१८ रोजी ८८.१० मी. (१.७० मी.वाढ) असून सद्य:स्थितीत पाझर हा ०.१६ लिटर/प्रति सेकंद इतका आहे. धरणाची पातळी वाढून देखील आरंभीचा पाझर (दिनांक ३१/०८/२०१८) ३.०० लिटर/प्रति सेकंद वरुन दिनांक १२/११/२०१८ रोजी ०.१६ लिटर/प्रति सेकंद इतका कमी झाला आहे. या कारणास्तव सदर प्रकरणाचा चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हरिहरेश्वर (जि.रायगड) मधील पांडव प्रदक्षिणा मार्गातील संरक्षक कठडे व इतर दुरुस्त्या तसेच सौंदर्यीकरणासाठी निधी मंजूर करण्याबाबत

**(१२३) * ४४८१७ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरिहरेश्वर (जि.रायगड) हे स्थान दक्षिण काशी म्हणून प्रसिध्द असून येथील पांडव प्रदक्षिणा मार्गाची दुरवस्था झाली असून संरक्षक कठडे तुटल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गाचे सौंदर्यीकरण व योग्य देखभाल दुरुस्ती करण्यासाठी कोकण ग्रामीण विकास पर्यटन योजनेतून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तीर्थक्षेत्राच्या पांडव प्रदक्षिणा मार्गाची दुरवस्था दूर करण्यासाठी ग्रामीण विकास पर्यटन योजनेतून निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.

मा.आ.ॲड.श्री. निरंजन वसंत डावखरे, वि.प.स. यांनी त्यांचे पत्र दिनांक ५/१०/२०१८ अन्वये रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वर मधील पांडव प्रदक्षिणा मार्गातील संरक्षक कठडे, इतर दुरुस्त्या तसेच सौंदर्यीकरण करण्यासाठी कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम अंतर्गत समावेश करून निधी उपलब्ध करून देऊन पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविलेले आहे.
(३) हरिहरेश्वर मधील पांडव प्रदक्षिणा मार्गातील संरक्षक कठडे, इतर दुरुस्त्या तसेच सौंदर्यीकरण करण्यासाठी कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम अंतर्गत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीवर्धन यांच्याकडून जि.प. रायगड यांनी प्रस्ताव मागविला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील गावांमध्ये स्मशानभूमी बांधून देण्याबाबत

**(१२४) * ४५३५६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील १५०० गावांपैकी सुमारे १२४२ गावांत स्मशानभूमी नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंत्यसंस्कारासाठी जागा उपलब्ध होत नसल्यामुळे ग्रामस्थांना नेहमीच अडचणींचा सामना करावा लागत असून पावसाळ्यामध्ये अग्निसंस्कार करतांना मोठ्या अडचणी निर्माण होतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्मशानभूमी बांधून देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) होय.

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत व शासन निर्णय क्र. ददभु-२०१०/प्र.क्र.६२/पंरा-६, दिनांक १६ सप्टेंबर, २०१० व शासन निर्णय क्र. डिएपी १०१४/प्र.क्र.२९५/का.१४८१, दिनांक १७ डिसेंबर २०१४ अन्वये स्मशानभुमी बांधकाम करण्यात येते. या प्रकरणी निधी उपलब्धतेनुसार कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रॅगिंग झाल्याबाबत

**(१२५) * ४४३७४ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (मेडिकल) वसतिगृहात निवासी डॉक्टरांवर रॅगिंग झाल्याचा प्रकार माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एच ओ हॉस्टेलमधील प्रकरणाबाबत वार्डनकडून अहवाल मागवून चौकशी करून कार्यवाही करणार असल्याचे अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय यांनी सांगितले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) रॅगिंगची घटना झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि, कनिष्ठ निवासी डॉक्टरांना दमदाटी करणे व सहायक वसतिगृह प्रमुखांशी गैरवर्तन यासंदर्भात तक्रार प्राप्त झाली होती.
(२) व (३) सदर तक्रारीस अनुसरुन चौकशी करण्यासाठी अधिष्ठाता, श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांचेकडून चौकशी समिती गठीत करुन अहवाल मागविण्यात आला होता. महाविद्यालयातील चौकशी समितीच्या अहवालानुसार निवासी डॉक्टरांना दमदाटी करुन दहशत पसरविणे अशी गैरवर्तणुक झाल्याबाबतची घटना घडली नसल्याचे चौकशी अहवालामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार व शिंदखेडा या दोन्ही तालुक्यातून जाणारा तापी-बुराई ह्या कल्याणकारी प्रकल्पाचे काम धीम्यागतीने सुरु असल्याबाबत

**(१२६) * ४५३९२ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८५१४ ला दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार व शिंदखेडा या दोन्ही तालुक्यातून जाणारा तापी-बुराई हा कल्याणकारी प्रकल्प गेल्या ५ ते ७ वर्षापासून शासनाने मंजूर केलेला असतानाही त्या प्रकल्पाचे काम हे अत्यंत धीम्यागतीने सुरु असल्यामुळे त्या भागातील गोर-गरीब शेतकऱ्यांना दुष्काळाचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) सदर योजनेच्या टप्पा क्र. १ ते ४ पैकी टप्पा क्र. १ व २, मे, २०१९ पर्यंत व टप्पा क्र. ३ व ४, मे, २०२० अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रकल्पाचे काम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी अर्थसहाय्य मिळणेसाठी केंद्र/राज्य शासनाच्या विविध योजना (आदिवासी उपयोजना, नाबार्ड, बळीराजा जल संजीवनी) मध्ये समावेशाबाबत प्रस्तावित करणेत आले आहे. निधी उपलब्धतेनुसार योजना पूर्ण करणेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## टाटा विद्युत प्रकल्पाचे पाणी दुष्काळग्रस्त भागाकडे वळविण्याबाबत

**(१२७) * ४४८९४ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाटा विद्युत प्रकल्पासाठी दिला जाणारा पाणीपुरवठा दुष्काळग्रस्त भागाकडे वळविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी करुन राज्यातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यात पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) टाटा विद्युत प्रकल्पासाठी दिला जाणारा पाणीपुरवठा दुष्काळग्रस्त भागाकडे वळविण्यासाठीचा अभ्यास करणेचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(२) कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समुहातून वीज निर्मितीसाठी कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या कोकण खोऱ्यात/भागात वळविण्यात येणारे पाणी टप्प्याटप्प्याने कमी करण्याकरीता अभ्यास करणेसाठी शासनाने दिनांक ०२/०८/२०१८ चे शासन निर्णयाद्वारे श्री.अ.पां.भावे, निवृत्त सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना केली आहे.

सदर अभ्यास गटाने त्यांचा अहवाल तीन महिन्यात शासनास सादर करावयाचा असून, अभ्यास गटाच्या अहवालातील शिफ़ारशीनुसार पुढील कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवखा (ता.जि.हिंगोली) गावास नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१२८) * ४४६६० श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि.हिंगोली) तालुक्यातील नवखा हे गाव हिंगोली महसूल विभागात येत असून ग्रामपंचायत क्षेत्र औढा नागनाथ तालुक्यात येत असल्याने तेथील नागरीकांना शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावात शंभर कुटुंब वास्तव्य करीत असून पांगरा-टेंभूरदरा-नवखा या गट ग्रामपंचायतीमधील गावांमध्ये कोणतीही विकास कामे झालेली नसून गावात नागरी सुविधाही उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. अनु.जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे, आमदार निधी व मागास क्षेत्र विकास अनुदान निधी अंतर्गत सिमेंट रस्ते करण्यात आले आहेत. तसेच चौदावा वित्त आयोग अंतर्गत सौर लाईट इत्यादी कामे केली आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सहावा वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम मिळण्याबाबत

**(१२९) * ४५३२३ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २००६ मध्ये शासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व कर्मचाऱ्यांची सन २००८-०९ पर्यंतच्या वेतन फरकाची रक्कम त्यांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक मिळालेला नाही अशा कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम कशा प्रकारे मिळणार आहे तसेच, ज्याचे D.C.P.S. क्रमांक आहे परंतु अद्यापही वेतन फरकाची रक्कम त्यांच्या खात्यामध्ये जमा झाली नाही अशा कर्मचाऱ्यांना कशा स्वरुपात रक्कम मिळणार आहे,
(४) असल्यास, या सर्व कर्मचाऱ्यांना वेतन फरकाची रक्कम थेट देयकाद्वारे शासन देणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.
(२) वित्त विभाग, शासन अधिसूचना क्र. वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दिनांक २२ एप्रिल, २००९ अन्वये दिनांक १/१/२००६ पासून राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणीचे लाभ मंजूर करण्यात आले आहेत.

त्यानुषंगाने दिनांक १ एप्रिल, २००९ पासून सदर लाभ रोखीने देण्यात आले आहेत व दिनांक १/१/२००६ ते दिनांक ३१ मार्च, २००९ या कालावधीतील थकबाकीची रक्कम पुढील पाच वर्षात समान हप्त्यात भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(३) वित्त विभागाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ अन्वये राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे. त्यामुळे त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजनेच्या तरतुदी शासन सेवेत दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू होणार नाहीत असा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यामुळे ज्या कर्मचाऱ्यांना D.C.P.S लागू आहे व त्यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अनुज्ञेय आहे अशा कर्मचाऱ्यांच्याबाबतीत थकबाकीची रक्कम त्यांच्या परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेच्या खात्यामध्ये जमा करण्याचे आदेश उपरोक्त अधिसूचनेन्वये देण्यात आले आहेत.

(४) ज्या कर्मचाऱ्यांना D.C.P.S लागू आहे व त्यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अनुज्ञेय आहे अशा कर्मचाऱ्यांच्याबाबतीत थकबाकीची रक्कम त्यांच्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या खात्यामध्ये जमा करण्याचे आदेश वित्त विभाग, शासन अधिसूचना क्र. वेपुर१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दिनांक २२ एप्रिल, २००९ अन्वये देण्यात आले आहेत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना वेतन फरकाची रक्कम थेट देयकाद्वारे देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुलदली ते बेलखेडा (ता.सेनगाव, जि.हिंगोली) या गावांच्या दरम्यान नाल्यावरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१३०) * ४५५७५ श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुलदली ते बेलखेडा (ता.सेनगाव, जि.हिंगोली) या गावांच्या दरम्यान नाल्यावर बांधण्यात आलेल्या पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे पुलाची दुरवस्था होऊन पुल वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करुन पुलाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
सदर पुलाचे बांधकाम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत योग्य गुणवत्तेचे झाले असून सदर कामाच्या गुणवत्तेची तपासणी राज्य गुणवत्ता निरीक्षक व वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी केली असून त्यांनी काम समाधानकारक असल्याचा शेरा दिला आहे. तसेच पुलावरुन वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जि.प.च्या महिला व बालविकास विभागातील कर्मचाऱ्यांना लाच घेताना अटक करण्यात आल्याबाबत

**(१३१) * ४५८७२ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना वाशी तालुक्यात घरपोच पोषण आहार योजनेंतर्गत काम करणाऱ्या महिला बचत गटाची देयके काढणे, प्रलंबित गहू मिळविण्यासाठी मदत करणे, पोषण आहाराचे नमुने यावर कार्यवाही होऊ नये यासाठी मदत करणे इत्यादी कामासाठी लाच घेताना दिनांक ३१ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास अटक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

श्री.गोवर्धन निलकंठ लांडगे, सहाय्यक प्रशासन अधिकारी व श्री.उमेश भगवानराव पवार, वरिष्ठ सहाय्यक (लि.व), महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी लाच घेताना पकडल्याने अटक करण्यात आली आहे.
(२) या प्रकरणात संबंधितांना जिल्हा परिषदेने दिनांक १९/०९/२०१८ च्या आदेशान्वये निलंबित केलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कुष्ठरोगींचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१३२) * ४६२७१ श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राष्ट्रीय कुष्ठरोग निमुर्लन कार्यक्रमांतर्गत दिनांक २४ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत राबविण्यात आलेल्या कुष्ठरोग शोध अभियानात २ हजार १२८ नवे कुष्ठरोगी आढळले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अभियानात पालघर जिल्ह्यात सर्वाधिक २३९ रुग्ण आढळले असून चंद्रपूर जिल्ह्यात २०० रुग्णांची नोंद झाली आहे तर उस्मानाबाद जिल्ह्यात मागील पाच वर्षात रुग्णसंख्येत दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुष्ठरोग रुग्णसंख्येत एवढया मोठ्या प्रमाणात वाढ होण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या रुग्णांवर औषधोपचार करण्यासोबतच सर्वाधिक रुग्ण आढळलेल्या पालघर, चंद्रपूर, नाशिक, नागपूर व उस्मानाबाद जिल्ह्यात विशेष लक्ष केंद्रीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

शोध अभियानात ४८९४ कुष्ठरोगी आढळले आहेत.

(२) हे खरे आहे.

या अभियानात पालघर जिल्ह्यात ४०१ रुग्ण, चंद्रपूर जिल्ह्यात ३८२ रुग्ण व उस्मानाबाद जिल्ह्यात १५४ नविन कुष्ठरुग्णांची नोंद झाली आहे.

(३) कुष्ठरोग शोध अभियानात १०० टक्के ग्रामीण लोकसंख्येची तपासणी करण्यात आली. प्रत्येक कुटुंबातील सर्व सदस्यांची तपासणी केल्याने लपून राहिलेले कुष्ठरोग्यांचे निदान झाल्याने रुग्णसंख्येत वाढ झाली आहे.

(४) शोधमोहिमेत निदान झालेल्या सर्व रुग्णांना मोफत बहुविध औषधोपचार मोहिमेंतर्गत आखून दिलेल्या कृती आराखड्यानुसार करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** | **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** | **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.